# पेड न्यूज आणि संबंधित बाबी
# यां विषयक अनुदेशांचा
# सारसंग्रह

## (फेब्रुवारी-२०१४)

**भारत निवडणूक आयोग**

---

# पेड न्यूज आणि संबंधित बाबी

# यां विषयक अनुदेशांचा

# सारसंग्रह

# (फेब्रुवारी २०१४)

---

## भारत निवडणूक आयोग

## प्राक्कथन

निवडणूकांच्या क्षेत्रात पेड न्यूज सारख्या नकारात्मक घटनांनी नेमका केव्हा प्रवेश केला हे सांगणे कठीण आहे. परंतु, २००९ च्या लोकसभा निवडणुकानंतर, ज्यांना मुक्त आणि नि:पक्ष निवडणुका, नैतिक पत्रकारिता आणि लोकशाहीच्या सर्वकष व्यवस्थेबाबत चिंता वाटते, मोठया प्रमाणवरील सुजाण लोकांनी पेड न्यूजच्या प्रथेविरुध्द निषेधाचा आवाज उठवला. त्यांच्यापैकी काहींनी, ज्यांत राजकीय नेते,वरिष्ठ पत्रकार, प्रसिद्धी माध्यम संघटना आणि नागरी समाज गट यांचा समावेश आहे, आपली चिंता आयोगापर्यंत पोहचवली. संसदेत सरकारमध्ये आणि प्रसारमाध्यमांच्या गोटात, पेड न्यूजमुळे झालेल्या हानीबाबत चर्चा झाल्या. राजकीय पक्षाबरोबरच्या आयोगाच्या बैठकीमध्ये सातत्याने त्यावर उपायत्मक कारवाईची विनंती केली जात आहे. आयोगाला भारतीय वृत्तपत्र परिषदे कडूनही शिफारशी प्राप्त झाल्या आहेत.

मुक्त आणि नि:पक्ष निवडणूका घेणे आणि समान संधीस कोणत्याही प्रकारे बाध न आणू देणे किंवा निवडणूक कायद्यांचे कोणत्याही प्रकारे उल्लघन होऊ न देणे या आपल्या आदेशाच्या आधारे, भारताच्या निवडणूक आयोगाने, २०१०च्या सार्वत्रिक निवडणुकांत पेड न्यूजच्या विरुध्द प्रथम निश्चयपूर्वक पाऊले उचलण्यास सुरूवात केली. तेव्हा पासून प्रत्येक निवडणुकांत आम्ही या उपाययोजना बळकट करण्याचा आणि राजकीय पक्ष, उमेदवार, प्रसारमाध्यमांत काम करणारे आणि जनता यासह सर्व हित संबंधितांना मोठया प्रमाणावर माहिती देण्यासाठी उपक्रम हाती घेतले आहेत. निवडणुकांमध्ये पेड न्यूजची प्रकरणे हाताळताना ही एक उत्क्रांत होणारी प्रक्रिया आहे आणि त्यासाठी सर्व मिळून सहकार्य करणे आवश्यक ठरेल, यात कोणतीही शंका नाही.

पेड न्यूजचे संदिग्ध स्वरूप लक्षात घेता, या पुस्तकात भारतातील निवडणुकांशी या समस्येचा असलेला संबंध आणि आतापर्यत भारताच्या निवडणूक आयोगाने ती समस्या हाताळण्यासाठी अवलंबलेले मार्ग यांचे यथार्थ दर्शन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

( अक्षय रौत )
महा संचालक

# <u>अनुक्रमणिका</u>



| अनु. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | सूचनांचा सारांश | ३ |
| ३. | दूरचित्रवाणी वाहिनी व केबल नेटवर्क यांवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिराती संबधातील सर्वोच्च न्यायालयाचा दि. १३ एप्रिल, २०१३ चा आदेशबाबत आयोगाचे पत्र क्र.५०९/७५/२००४/जे.एस.एक दिनांक १५ एप्रिल, २००४. | ७ |
| ४. | जाहिरातीच्या प्रमाणनाकरिता अर्ज | १८ |
| ५. | प्रसारणाकरिता जाहिरातीचे प्रमाणन | २० |
| ६. | दूरचित्रवाणी व केबल नेटवर्क यावरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरांतीशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक १५.०४.२००४ चे आदेशाच्या संदर्भातील आयोगाचे क्र.५०९/७५/२००४/जे एस-एक दि.२२ जुलै, २००४ | २१ |
| ७. | दूरदर्शन वाहिनी आणि केबल नेटवर्क यावरील राजकीय स्वरुपाच्या जाहिराती-विस्तारीत रेडीओ-संबंधातील आयोगाचे पत्र क्र.५०९/७५/ २००४/जेएस-एक खंड दोन/आरसीसी दि.२१ नोव्हेंबर, २००८. | २२ |
| ८. | दूरचित्रवाणी वाहिन्या व केबल दूरचित्रवाणी प्रसारण आणि आकाशवाणीवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिराती स्पष्टीकरणाबात आयोगाचे पत्र क्र ५०९/७५/२००४-जेएस-एक/आरसीसी/खंड-दोन दि.१५मार्च, २००९. | २५ |
| ९. | दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क आणि रेडीओवरील राजकीय स्वरुपातील जाहिरातींबाबत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.३/ईआर/२००९/एसडीआर, दिनांक १९ मार्च २००९ | २७ |
| १०. | निवडणूक काळात “पेड न्यूज” म्हणजेच माध्यमातील विशिष्ट प्रकारच्या बातम्यांची जाहिरात तपासण्यासाठी उपाय योजनांबाबतचे आयोगाचे पत्र क्र.४९१/प्रसिद्धि माध्यम /२०१०, दि.८ जून , २०१०. | २९ |
| ११. | निवडणूकी दरम्यान “पेड न्यूज” वर लक्ष ठेवण्यासाठी उपाययोजना म्हणजेच प्रसार माध्यमावरील बातम्यांमधील जाहिरातीवर लक्ष ठेवणे. पेड न्यूजबाबतची पीसीआय मार्गदर्शक तत्वे यासंदर्भातील आयोगाचे पत्र क्र.४९१/प्रसार माध्यम धोरण/२०११ दिनांक २३ सप्टेबर, २०१०. | ३२ |

| | | |
|---|---|---|
| १२. | लोकप्रतिनिधित्व अधिनियम आणि निवडणूक घेण्याबाबत नियम १९६१ यांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव या संदर्भातील आयोगाचे पत्र क्र. ०३.०१.२०११/एसडीआर, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०११. | ४३ |
| १३. | निवडणूक कालावधीत "पेड न्यूज" म्हणजेच प्रसार माध्यमातील बातम्यांच्या स्वरुपातील जाहिराती रोखण्यासाठी उपाययोजना आणि राज्यस्तरीय प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती घटीत करणे आणि संज्ञासूची यासंदर्भातील आयोगाचा पत्र क्र. ४९१/प्रसार माध्यम/ २००९, दि.१८ मार्च , २०११ | ४८ |
| १४. | निवडणूक कालावधीत राजकीय पत्र किंवा त्यांचे कार्यकर्ते/पदाधिकारी यांच्या मालकीच्या दूरदर्शन/ केबल वाहिन्यांवरील उमेदवारांच्या जाहिरांतीचा परामर्श घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना या संदर्भातील आयोगाचे पत्र क्र. ४९१/ प्रसार माध्ये/२०११/(जाहिरात), दि.१६ ऑगस्ट, २०११. | ४९ |
| १५. | राज्य मुख्य निवडणूक अधिकारी/ प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडून प्राप्त झालेल्या पेड न्यूज बाबतच्या तक्रारी/ संदर्भ तपासण्याच्या दृष्टीने भारताच्या निवडणूक आयोगाच्या स्तरावर समिती स्थापन करण्यासंदर्भातील आयोगाचा आदेश क्र. ४९१/पेड न्यूज/२०१२ माध्यम दिनांक १५ मार्च, २०१२. | ५१ |
| १६. | पेड न्यूज संदर्भात आयोगाची व्यापक मार्गदर्शक तत्वे क्र.४९१/पेड न्यूज/२०१२/माध्यम, दिनांक २७ ऑगस्ट, २०१२. | ५३ |
| १७. | आयोगाचे पत्र क्र. ४९१/पेड न्यूज/२०१२/प्रसार माध्यम, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२- नोटीशीला उत्तर देण्यासाठी उमेदवारांना देण्यात आलेला कालावधी. | ५९ |
| १८. | आयोगाचे पत्र क्र. ४९१/पेड न्यूज/२०१२/ प्रसार माध्यम दि.१५ ऑक्टोबर, २०१२-विद्यमान माध्यमांव्यतिरिक्त चित्रपट गृहात जाहिराती दाखविणे यासह स्पष्टीकरण. | ६० |
| १९. | प्रसार माध्यमांच्या प्रसारकांसह पेड न्यूजच्या प्रकरणात आवश्यक कार्यवाही करण्याबाबत न्युज ब्रॉड कास्टर्स असोसिएशन ला विनंती करणारे आयोगाचे पत्र क्र. ४९१/पेड न्यूज/ प्रसार माध्यम/२०१३, दि. १२ /२/ २०१३ | ६१ |
| २०. | आयोगाचे पत्र क्र. ४९१/प्रसार माध्यम धोरण/२०१३, दि.१० ऑक्टोबर, २०१३- सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येणाऱ्या जाहिरांतीच्या प्रमाणनाबाबत स्पष्टीकरण. | ६३ |

| | | |
|---|---|---|
| २१ | निवडणूक प्रचारात सोशल मिडीयाच्या वापराच्या संदर्भात आयोगाचे अनुदेश , दि.२५ ऑक्टोबर, २०१३. | ६४ |
| २२ | साप्ताहिक तत्वावर सादर करायच्या पेड न्यूज प्रकरणांचा नमुना. | ६८ |
| २३ | निवडणूका संपल्यानंतर सादर करावयाचा प्रसार माध्यम गृह, उमेदवार यांचे नाव आणि अंतर्भूत खर्च इत्यादी दर्शविणारा पेड न्यूज च्या प्रकरणांचा नमूना. | ७१ |
| २४ | विविध राज्य विधान सभा निवडणूकांदरम्यान नोंदवण्यात आलेली पेड न्यूजची प्रकरणे . | ७२ |
| २५ | पेड न्यूज वरील वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफ.ए.क्यू) | ७४ |
| २६ | जाहिराती व प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती यांच्या प्रमाणनावरील वारंवार विचारले जाणारे प्रश्न ( एफ.ए.क्यू) | ७७ |
| २७ | पेड न्यूज वरील शिफारशी | ८१ |
| २८ | संशयित पेड न्यूजची उदाहरणे | ८३ |

# <u>प्रस्तावना</u>

राष्ट्र उभारणीमध्ये आणि लोकशाहीच्या संवर्धनामध्ये प्रसार माध्यमांनी बजावलेल्या महत्त्वाच्या भूमिकेसाठी भारताचा निवडणूक आयोग त्यांचा गुणगौरव करतो. मागील सहा दशकामध्ये भारतीय प्रसार मध्यमे ही आयोगाच्या शक्तिशाली सहयोगीं पैकी एक बनली आहेत. ती या क्षेत्रांतील त्यांचे डोळे व कान आहेत आणि आयोगाच्या संवैधात्मिक अधिकारांचे पाठीराखे आहेत. निवडणुकींच्या काळात निवडणुकांशी संबंधित माहितीचा प्रसार करण्यात विविध प्रकारची उल्लंघने निदर्शनास आणून देण्यात व मतदारांच्या लाभासाठी राजकीय चर्चा घडवून आणण्याच्या कामी प्रसार महाध्यमांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. अलीकडच्या काळात, प्रसार माध्यमांनी काही जनहिताची कामे जोमाने हाती घेतली आहेत. तथापि, अलीकडच्या काळात निवडणुकीच्या क्षेत्रांमधील प्रसार माध्यमांच्या कामाशी संबंधित विशिष्ठ संदिग्धता निर्माण झाली आहे. त्याच्या कडे लक्ष वेधण्याची गरज आहे.

पेड न्यूजच्या घटनांमध्ये, निवडणुकीतील गंभीर स्वरुपाचा गैरव्यवहार म्हणून चिंताजनक प्रमाणात वाढ झाली आहे आणि म्हणूनच मुक्त व निष्पक्ष निवडणुका घेण्याच्या संदर्भात आयोगाच्या दृष्टीने तो एक चिंतेचा विषय ठरला आहे. त्यामुळे निवडणुकीचा खर्च मर्यादेपेक्षा जास्त होतो. समान संधीमध्ये व्यत्यय येतो आणि ते योग्य माहिती मिळण्याच्या मतदारांच्या हक्काच्या विरुध्द ठरते. पेड न्यूजची व्याख्या प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पुढीलप्रमाणे केली आहे. <u>पैशाच्या मोबदल्यात किंवा विशेष मेहरनजरेच्या मोबदल्यात कोणत्याही प्रसिध्दी माध्यमात (मुद्रित व इलेक्ट्रॉनिक) आलेले कोणतीही बातमी किंवा विश्लेषण.</u> राजकीय पक्ष प्रसिध्दी माध्यमांचे गट आयोगाच्या भेटी घेऊन अशा बातम्यांच्या (पेड न्यूज) विरुध्द कठोर पाऊले उचलण्याची विनंती करत आहेत. दि. ४ ऑक्टोबर, २०१० आणि दि. ९ मार्च २०११ ला आयोगाबरोबर झालेल्या बैठकीत, पेड न्यूज विरुध्द कडक उपाययोजना करण्यात याव्यात यावर सर्व राजकीय पक्षांचे एकमत झाले होते. अशा बातम्यांवर (पेड न्यूजवर) जास्त नजर ठेवण्यासाठी आणि अशा गैरमार्गांना प्रतिबंध करण्यासाठी आयोगाने विविध प्रयत्न केले आहेत आणि विविध मार्गदर्शक तत्वे आणि आदेश जारी केले आहेत. जून २०१० पासून,भारताच्या निवडणूक आयोगाने राज्य आणि जिल्हा अधिकाऱ्यांना काळजीपूर्वक तयार केलेल्या यंत्रणेमार्फत आणि प्रक्रियेमार्फत अशा पेड न्यूजच्या प्रकरणांची छाननी करण्याच्या, त्या शोधून काढण्याच्या व त्या कळवण्याच्या सूचना द्यायला सुरुवात केली आहे.

२०१० मध्ये आयोगाने, जिल्हा स्तरावर आणि राज्य स्तरावर जाहिरातींचे प्रमाणन (सध्याचे काम) आणि तसेच पेड न्यूज आणि इतर उल्लंघने यासाठी प्रसिध्दी माध्यमांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रसिध्दीमाध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समिती नियुक्ती केली आहे. सध्याच्या व्यवस्थेनुसार बातम्यांच्या वार्तांकनाच्या रुपातील राजकीय जाहिरातींचा शोध घेण्याच्या उद्देशाने जिल्हा समिती, सर्व वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक्स प्रसिध्दी माध्यमांची छाननी करते. उमेदवाराच्या निवडणूक खर्च खात्यामध्ये प्रसिध्द केलेल्या मजकुरावरील प्रत्यक्ष खर्चाचा समावेश करण्यासाठी किंवा डिआयपीआर / डिएव्हीपी च्या दरांवर आधारित काल्पनिक खर्चाचा समावेश करण्यासाठी, मग ही समिती, उमेदवाराने दूरदर्शन वाहिनी /वृत्तपत्रांना प्रत्यक्षात कोणतीही रक्कम प्रत्यक्षात दिली आहे किंवा नाही हे लक्षात न घेता उमेदवाराला नोटीस बजावण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याला सूचना देते. नोटीस बजावल्यानंतर ४८ तासांच्या आत उमेदवाराकडून जिल्हा प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्यास, प्रसिध्दी माध्यम, प्रमाणन

व संनियंत्रण समितीचा निर्णय अंतिम असेल. जिल्हा प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती आलेल्या उत्तरावर शीघ्रतेने निर्णय घेईल आणि आपला अंतिम निर्णय उमेदवार / पक्षाला कळवेल. जर जिल्हा प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचा निर्णय उमेदवारास स्वीकार्य नसेल तर, जिल्हा प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व संनियंत्रणला माहिती देऊन, तो / ती निर्णय कळल्यापासून ४८ तासांच्या आत राज्य स्तरीय प्रसिध्दी माध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समिती कडे अपील करु शकतो / शकते. राज्य स्तरीय प्रसिध्दी माध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समिती अपील प्राप्त झाल्यापासून ९६ तासांच्या आत निर्णय विरुध्द अपील केलेल्या पेड न्यूजच्या सर्व प्रकरणांची आणि स्वाधिकारे हाती घेता येतील अशा सर्व प्रकरणांची, ज्यात समिती उमेदवारावर नोटीस बजावण्याचे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला निर्देश देते, तपासणी करते उमेदवार या समितीकडून आदेश मिळाल्यानंतर ४८ तासांचा आत राज्य स्तरीय प्रसिध्दी माध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समिती निर्णयाविरुध्द भारताच्या निवडणूक आयोगाकडे अपील करुन शकतो आयोगाचा निर्णय अंतिम आहे.

पेड न्यूजच्या प्रकरणांशी संबंधित असलेल्या मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक प्रसार मध्यमांच्या संदर्भात, आवश्यक कारवाई करण्यासाठी आयोग, निर्णय दिलेली प्रकरणे अनुक्रमे प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया आणि न्यूज ब्रॉडकास्टर्स असोसिएशन कडे संदर्भासाठी पाठवेल.

पेड न्यूजच्या विरोधातील उपाय योजनांच्या अंमलबजावणीमधून २०१० च्या बिहार विधानसभा निवडणुकांमध्ये आयोगाने प्रथमच १२१ संशयित प्रकरणांमध्ये नोटिसा बजावल्या. यांपैकी १५ प्रकरणे पैशांच्या मोबदल्यात देण्यात आलेल्या बातम्यांची म्हणजेच पेड न्यूजची प्रकरणे म्हणून अंतिमत: निश्चित करण्यात आली. २०११ मधील निवडणुकांमध्ये पेड न्यूज म्हणून निश्चित झालेली अशी प्रकरणे केरळात ६५, पुडुचेरीत ३, आसाम मध्ये ४६, पश्चिम बंगाल मध्ये ८ आणि तामिळनाडुत २२ इतकी होती. २०१२ मधील निवडणुकांत, पेड न्यूजची निश्चित करण्यात आलेली प्रकरणे – उत्तर प्रदेशामध्ये ९७, उत्तराखंडमध्ये ३०, पंजाबमध्ये ५२३, गोव्यामध्ये ९, गुजरातमध्ये ४१४ आणि हिमालच प्रदेशात १०४ इतकी होती. तर २०१३ मध्ये, कर्नाटक विधानभा निवडणुकीत पेड न्यूजची ९३ निश्चित प्रकरणे आढळली. तथापि, मेघलय, नागालॅन्ड आणि त्रिपुरा विधानसभा निवडणुकांमध्ये पेड न्यूजचे एकही प्रकरण आढळले नाही. आयोगाने लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मध्ये सुधारणा प्रस्तावित केली आहे.

ज्याद्वारे त्यात अशी तरतूद करण्यात येईल की, कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीतील भवितव्याला चालना देण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीतील भवितव्याला बाधा पोहचवण्यासाठी पैशांच्या मोबदल्यात बातमी प्रसिध्द करणे किंवा अशा बातम्या प्रसिध्द होण्यास प्रोत्साहन देणे, हा लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या भाग-सात च्या प्रकरण-तीन अन्वये किमान दोन वर्ष तुरुंगवासाची शिक्षा असणारा निवडणुक विषयक गुन्हा ठरविण्यात यावा. हा मुद्दा भारत सरकार कडे प्रलंबित आहे.

अशाप्रकारच्या निवडणूकविषयक गैरव्यावहारात गुंतू नये म्हणून प्रसिध्दी माध्यम प्रतिनिधी आणि राजकीय पक्षांना सजग करण्यासाठी आयोग वेळोवेळी विविध राज्यांत कार्यशाळांचे आयोजन करत असते.

सर्व हितसंबंधितांना, पेड न्यूजची समस्या व निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये या समस्येचा परामर्श घेण्यासाठी असलेल्या उपाय योजना व यंत्रणा समजण्यासाठी या सारसंग्रहाची मदत होईल.

## <u>सूचनांचा सारांश</u>

### १. राजकीय स्वरुपाच्या जाहिरातीचे प्रमाणन

**(एक) दूरदर्शन वाहिन्या आणि केबल नेटवर्क या वरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातीच्या प्रमाणनासंबंधीत सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक १३ एप्रिल २००४ चा आदेश.**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने २००४ चा एसएलपी (सी) क्र. ६६७९ मध्ये (माहिती व प्रसारण मंत्रालय) विरुध्द मेसर्स जेमिनी टीव्ही प्रा. लि व इतर या प्रकरणामध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३ एप्रिल २००४ ला असा आदेश दिला आहे की, कोणत्याही नोंदणीकृत राजकीय पक्षाने / कोणताही गट किंवा संघटना / संघ / वैयक्तिक उमेदवार यांनी दूरदर्शन वाहिन्या आणि केबल नेटवर्कवर द्यावयाच्या सर्व प्रस्तावित राजकीय जाहिराती ह्या भारताच्या निवडणुक आयोगाने विविध स्तरांवर स्थापन करावयाच्या निर्देशित प्रमाणन समितीद्वारे पूर्व प्रमाणित केलेल्या असल्या पाहिजेत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायानिर्णयाचा परिणाम म्हणून निवडणूक आयोगाने त्याच्या दि. १५ एप्रिल २००४ च्या पत्रान्वये सर्व राज्यांच्या संघराज्याक्षेत्रांच्या मुख्य निवडणुक अधिकाऱ्यांना अशा समित्या स्थापन करण्याचा आदेश दिला.

**(दोन) दूरदर्शन वाहिन्या व केबल नेटवर्क यांवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातीचे प्रमाणन — रेडिओ व सिनेमागृहांना लागू होणे.**

रेडिओवरील वाणिज्यिक जाहिरात संहितेतील सुधारणेचा परिणाम म्हणून भारताच्या निवडणूक आयोगाने असा आदेश दिला आहे की, दूरदर्शन वाहिन्या / केबल नेटवर्कवरील राजकीय जाहिरातींची छाननी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समित्या हया, खाजगी एफएम वाहिन्यांसह वरील राजकीय जाहिरातींची देखील छाननी करतील. दूरदर्शन वाहिन्या / केबल नेटवर्क आणि एफएम वाहिन्यांसह रेडिओ यांखेरीज सिनेमागृहांचा समावेश करुन आयोगाने प्रमाणन क्षेत्राचा विस्तार केला आहे.

**(तीन) दिल्ली येथे मुख्यालय असलेल्या कोणत्याही राष्ट्रीय पक्षाचे / राज्य पक्षाचे वेगवेगळया भाषांमधील आणि प्रादेशिक भाषेमधील राजकीय जाहिरातीचे प्रमाणन**

(क) जाहिरातीच्या प्रमाणनाच्य संदर्भात आयोगाने आणखी असे स्पष्ट केले आहे की, मुख्यालय व केंद्रित कार्यालय दिल्ली येथे असणारे कोणतेही राष्ट्रीय पक्ष किंवा राज्य पक्ष एकाच जाहिरातीसाठी अनेक भाषांमध्ये (हिंदी / इंग्रजी) आणि प्रादेशीक भाषा, प्रमाणन मागत असल्यास, प्रमाणित प्रतिलेखासह प्रत्येक भाषेमधील जाहिरातीचे साहित्य मुख्य निवडणूक अधिकारी, दिल्ली यांच्या कार्यालयात समितीकडे सादर केले पाहिले मुख्यालय व केंद्रिय कार्यालय, दिल्ली येथे असणाऱ्या राष्ट्रीय पक्षाची किंवा राज्य पक्षाची (जाहिरातीचे हिंदी / इंग्रजी भाषांतर नसताना) कोणत्याही प्रादेशिक भाषेमधील जाहिरातींचे प्रमाणन मागण्याची इच्छा असल्यास प्रमाणनाचे आवेदन पत्र, संबंधित राज्याच्या (म्हणजेच प्रादेशिक भाषा आहे ते राज्य) मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालय समितीकडे सादर केला पाहिजे. (पृ. क्र. २५-२८)

(ख) नोंदणीकृत राजकीय पक्ष / गट / संघटना / संघ ज्यांचे मुख्यालय एनसीटी दिल्ली मध्ये नाही. परंतु त्यांना त्यांची जाहिरात दिल्लीमध्ये दूरदर्शनावर दाखविण्याची ध्वनिक्षेपित करण्याची इच्छा आहे, अशा बाबतीत, जाहिरातीचे प्रमाणन, ज्या राज्यात पक्ष निवडणूक लढवत आहे त्या राज्यातील प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने करावे, या बाबतीत एनसीटी दिल्ली. (पृ. क्र. ६३)

**(चार) सार्वजनिक ठिकाणी राजकीय जाहिरातीचे दृकश्रव्य प्रदर्शन**

(ग) सार्वजनिक ठिकाणी राजकीय जाहिरात मोहीम साहित्याच्या दृकश्राव्य प्रदर्शनासाठी आयोगाच्या विद्यमान आदेशांनुसार निर्देशित समितीने करावयाचे प्रमाणन आवश्यक असेल. (पृ. क्र. ६३)

**२. पेड न्यूज**

पेड न्यूज संदर्भात निवडणूक आयोगाने प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने दिलेली व्याख्या स्वीकारली आहे. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पेड न्यूजची व्याख्या, “मोबदला म्हणून रोख रक्कम किंवा वस्तु देऊन कोणत्याही प्रसार – माध्यमामध्ये (मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक) देण्यात येणारी कोणतीही बातमी किंवा विश्लेषण” अशी केली आहे (पृ.क्र. ३६ )

**(एक) पेड न्यूज हा निवडणूकविषयक अपराध ठरवण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मध्ये सुधारणा करण्यासाठी आयोगाचा प्रस्ताव.**

कोणत्याही उमेदवाराच्या निवडणूकविषयक आकांक्षा वाढीला लावणारी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणूकविषयक आकांक्षांवर बाधक रीतीने परिणाम करणारी पेड न्यूज प्रसिध्द करणे आणि ती प्रसिध्द करणेस अपप्रेरणा देणे, हे लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ भाग सात प्रकरण तीन अन्वये हा, किमान दोन वर्षाच्या कारावासासह निवडणूकविषयक अपराध ठरविण्याची तरतूद करण्यासाठी, त्या अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचे आयोगाने, विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे प्रस्तावित केले आहे. हा प्रश्न भारत सरकारकडे प्रलंबित आहे. (पृ.क्र. ४३-४५)

**(दोन) राज्य स्तरीय व जिल्हा स्तरीय प्रसिध्दी माध्मम, प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यासाठी आयोगाने निदेश.**

आयोगाने प्रसिध्दी माध्यमांमधील पेड न्यूजच्या घटनांचे संनियंत्रण करण्यासाठी, सर्व राज्यांच्या / संघराज्य क्षेत्रांच्या मुख्य निवडणुक अधिकाऱ्यांना जिल्हा स्तरिय व राज्य स्तरिय प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्याबाबत निदेश दिले आहेत. (पृ.क्र. ३२-३३ आणि ४८)

**(तीन) उमेदवाराच्या निवडणूक खर्चलेख्यामध्ये माध्यमगृहांच्या प्रमाण दरांनुसार पेड न्यूजच्या कल्पित खर्चाचा समावेश करणे.**

राजकीय पक्ष किंवा त्यांचे पदाधिकारी/पदधारक यांची मालकी असलेल्या दूरचित्रवाणीवरील केबल दूरचित्रवाणी नेटवर्कवरील पेड न्यूज व जाहिराती यांच्या संबंधात एकरुपता आणण्यासाठी लोकसभा किंवा यथास्थिती राज्य/संघराज्यक्षेत्र विधानसभा समाप्तीच्या नियत दिनांकाच्या सहा महिने आधी अशा

राज्य/संघराज्य क्षेत्रामध्ये प्रसारित होणाऱ्या दूरदर्शन वाहिन्या रेडिओ चॅनल यांची सूची, वितरीत होणारी वर्तमानपत्रे, व त्यांचे प्रमाण दरपत्रक मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने प्राप्त करावे व आयोगाकडे पाठवावे, असे आयोगाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना निदेश दिले आहेत. जिल्हा स्तरावरील व राज्यस्तरावरील प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही उमेदवारांशी संबंधित सर्व राजकीय जाहिरातींचे एकतर उघडपणे किंवा गुप्तपणे संनियंत्रण करेल आणि उमेदवाराने प्रत्यक्ष खर्चाची कागदपत्रे सादर केलेली नसतील तर अशा बाबतीत प्रमाण दरपत्रकानुसार उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामध्ये कल्पित खर्चाचा समावेश करण्याकरिता उमेदवारांना नोटीस देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळविल. (पृ.क्र. ४९-५०)

**(चार) पेड न्यूजच्या प्रकरणांची तपासणी करण्यासाठी शासनाच्या निवडणूक आयोगाच्या स्तरावरील समिती.**

आयोगाने पेड न्यूजच्या संदर्भात राज्यस्तरीय प्रसिध्दी माध्यम प्रमाणत आणि संनियंत्रण समितीकडून प्राप्त झालेल्या प्रकरणांची तपासणी करण्यासाठी आणि जी कोणतेही राज्य/ संघराज्य क्षेत्र विशिष्ट नाहीत अशा आयोगाकडे थेटपणे प्राप्त झालेल्या प्रकरणांची तपासणी करण्यासाठी व त्यावर शिफारस करण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाच्या स्तरावर देखील एक समिती स्थापन केली आहे. (पृ.क्र. ५१-५२)

**(पाच) पेड न्यूजवरील आयोगाची दि.२७.८.२०१२ ची सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वे**

पेड न्यूजच्या प्रकरणांचे प्रभावीपणे संनियंत्रण करण्यासाठी आयोगाने सर्व राज्ये/ संघराज्य क्षेत्र यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना **सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वे** जारी केली आहेत. या मार्गदर्शक तत्वांनुसार बातमीच्या वार्तांकनामधील राजकीय जाहिरात निश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती, जिल्हा स्तरावर सर्व वर्तमानपत्रे व इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांची छाननी करेल. पेड न्यूजचे संशयास्पद प्रकरण समितीच्या निदर्शनास आल्यानंतर लवकरात लवकर निवडणूक निर्णय अधिकारी योग्य नोटीस बजावेल उमेदवाराला अशी नोटीस बजावल्यापासून 48 तासांच्या आत त्याचे उत्तर द्यावे लागेल. असे करण्यात तो अपयशी ठरल्यास समितीचा निर्णय अंतिम राहिल. जिल्हास्तरीय प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या निर्णयाविरुध्दचे अपील राज्यस्तरीय प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडे जिल्हास्तरीय प्रसिध्दी माध्यम व सनियंत्रण समितीचा निर्णय झाल्यापासून ४८ तासांच्या आत अपील करता येईल. असे अपील प्राप्त झाल्यापासून ९६ तासांच्या आत राज्यस्तरीय प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती त्यावर निर्णय देईल. उमेदवार राज्यस्तरीय प्रसिध्दी माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्याय निर्णयाविरुध्द या समितीकडून आदेश प्राप्त झाल्यापासून ४८ तासांच्या आत भारताच्या निवडणूक आयोगाकडे अपील करु शकतो. आयोगाचा निर्णय अंतिम असेल. (पृ.क्र. ५३-५८)

**(सहा) मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसाठी पेड न्यूजचे वृतांतलेख नमुने**

आयोगाला पेड न्यूजची प्रकरणे कळविण्यासाठी आयोगाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्यासाठी दोन नमुने तयार केले आहेत. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी नामनिर्देशनाच्या छाननीच्या दिनांकापासून

साप्ताहिक अहवाल नमुन्यामध्ये आणि निवडणूका संपल्यानंतर लगेचच पेड न्यूजच्या निश्चित केलेल्या सर्व प्रकरणांचा अंतिम तपशिलवार अहवाल नमुना २ मध्ये सादर केलाच पाहिजे. (पृ.क्र. ६८-७१)

**(सात) पेड न्यूजच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या मुद्रित माध्यम व इलेक्ट्रॉनिक माध्यम यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यासाठी अनुक्रमे प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया व न्यूज ब्रॉडकास्टर्स असोशिएशन**

वरील अहवालाच्या आधारे पेड न्यूजच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या मुद्रित माध्यमांची व इलेक्ट्रॉनिक माध्यमांची नावे आवश्यक कार्यवाहीसाठी अनुक्रमे प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया व न्यूज ब्रॉडकार्स असोसिएशन यांच्याकडे पाठविण्यात येतील. (पृ.क्र. ५७ आणि ६१-६२)

## ३. सोशल मीडिया

**(एक) निवडणूक प्रचार मोहिमेत सोशल मीडियाचा वापर करण्याच्या बाबतीत आयोगाच्या सूचना**

आयोगाने २५ ऑक्टोबर, २०१३ रोजी सोशल मीडिआसंबंधी तपशिलवार मार्गदर्शक तत्वे जारी केली असून त्यामध्ये नामनिर्देशन करताना उमेदवारांनी सोशल मीडियाच्या लेख्यांचा तपशील सादर करण्याविषयी नमूद केले आहे. सोशल मीडियाच्या संकेतस्थळावर द्यावयाच्या राजकीय जाहिराती देखील आयोगाने पूर्वप्रमाणनाच्या कक्षेत आणल्या आहेत. आयोगाने आणखी अशाही सूचना दिल्या आहेत की, उमेदवार व राजकीय पक्ष खर्चाचा अचूक लेखा ठेवणे व खर्चाचे विवरणपत्र सादर करणे या दोन्हींसाठी सोशल मीडियावरील जाहिरातीच्या खर्चासह प्रचाराचा सर्व समाविष्ट करतील. (पृ.क्र. ६४-६७)

**भारत निवडणूक आयोग**

**निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली — ११० ००१**

**क्र.५०९/७५/२००४/जेएसएक** **दिनांक १५ एप्रिल, २००४**

प्रति,
सर्व राज्ये/संघराज्य क्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

विषय :- दूरचित्रवाणी वाहिनी आणि केबल नेटवर्क यावरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींसंबंधातील सर्वोच्च न्यायालयाचा दि.१३ एप्रिल, २०१३ चा आदेश

महोदय,

यासोबत २००४ च्या एस.एल.पी. (सी) क्र.६६७९ मध्ये (माहिती व प्रसारण मंत्रालय विरुध्द मेसर्स जेमिनी टिव्ही प्रा.लि.व इतर) यामध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या दि.१३ एप्रिल, २००४ आदेशानुसार आयोगाने अग्रेषित केलेल्या दि.१५ एप्रिल, २००४ च्या ओदशाची प्रत जोडण्याचे मला ओदश आहेत.

२. एनसीटी, दिल्ली येथे मुख्यालय असणाऱ्या कोणत्याही नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या किंवा कोणत्याही गटाच्या किंवा संस्थेच्या/संघटनेच्या/संघाच्या दूरचित्रवाणी वाहिनी आणि केबल नेटवर्कवर प्रसारित करावयाच्या जाहिरातींच्या पूर्वविलोकनाकरिता, छाननीकरिता आणि प्रमाणीकरणाकरिता मुख्य निवडणूक अधिकारी, दिल्ली यांनी आदेशाच्या परिच्छेद ६ (एक) मधील निदेशांनुसार एक समिती स्थापन करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत याची नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे इतर राज्ये/संघराज्यक्षेत्र यांचे मुख्य निवडणूक अधिकारी त्यांच्या राज्यात /संघराज्यक्षेत्रात मुख्यालय असणाऱ्या राजकीय पक्षांनी आणि इतर संघटनांची/गटांनी केलेल्या अर्जांवर परिच्छेद ६ (तीन) अनुसार कार्यवाही करण्यासाठी एक समिती स्थापन करतील. आदेशाच्या परिच्छेद ६ (पाच) अनुसार, संबंधित मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तिगत उमेदवाराच्या जाहिरातींचे पूर्वालोकन, छाननी आणि प्रमाणन याकरिता प्रत्येक लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकाऱ्याला पदनिर्देशित अधिकारी म्हणून जाहिर करण्यात आले आहे. आंध्रप्रदेश, कर्नाटक, ओरिसा आणि सिक्कीम या राज्यांच्या विधानसभेची सध्याची सर्वसाधारण निवडणूक लढविणाऱ्या आणि काही राज्यातील पोटनिवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांकरिता संबंधित विधानसभा मतदारसंघाचा समावेश असणाऱ्या मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी हा जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठीचे अर्ज विचारार्थ स्वीकारेल.

३. सर्व राज्ये/संघराज्यक्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहिरातींच्या प्रमाणनासाठीच्या अर्जावरील समितीच्या/पदनिर्देशित अधिकाऱ्यांच्या निर्णयासंबंधीच्या तक्रारी /गाऱ्हाणी सोडविण्याकरिता आणखी एक समिती स्थापन करणे देखील आवश्यक आहे.

४. प्रमाणनासाठीचा प्रत्येक अर्ज हा आदेशाच्या जोडपत्र-अ सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार असलेल्या विवरणपत्रात संबंधित समिती किंवा संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. जाहिरातीच्या प्रसारणासाठीचे प्रमाणपत्र हे आदेशास जोडलेल्या जोडपत्र-ब मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार समिती/पदनिर्देशित अधिकारी यांनी द्यावयाचे आहे. अर्जदाराने प्रस्तावित जाहिरातीच्या इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील दोन प्रती तिच्या साक्षांकित प्रतिलेखासह सादर करणे आवश्यक आहे.

५. प्रमाणनाकरिता प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची एका नोंदवहीत योग्यरित्या नोंद घेण्यात यावी. प्रत्येक अर्जाला अनुक्रमांक देण्यात यावा व हा अनुक्रमांक इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील दोन प्रतींवरसुध्दा देण्यात यावा आणि प्राप्तकर्त्या अधिकाऱ्याने इलेक्ट्रॉनिक प्रतीवर त्याची स्वाक्षरी करावी. प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, प्रसारणासाठी प्रमाणित करण्यात आलेली जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक प्रत समिती/पदनिर्देशित अधिकाऱ्याने स्वत:कडे ठेवावी.

६. सर्व मुख्य निवडणूक अधिकारी त्यांच्या राज्यातील/संघराज्य क्षेत्रातील समित्या आणि पदनिर्देशित अधिकारी यांना जाहिरातींच्या पूर्वालोकनाकरिता आणि छाननीकरिता आवश्यक असेल असा दूरचित्रवाणी संच, व्हीसीआर, व्हीसीडी इत्यादी सारख आवश्यक साधने/सामग्री/ पायाभूत सोईसुविधा भाड्याने घेऊन किंवा खरेदी करुन संपादित करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करतील. केलेली कोणतीही खरेदी ही अशा बाबींकरिता राज्य सरकारने मान्य केलेल्या दर व पध्दतीनुसार असेल.

७. आयोगाच्या आदेशाला व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी आणि तो विशेषकरुन सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी/जिल्हा दंडाधिकारी, निर्वाचन अधिकारी, दूरचित्रवाणी वाहिन्या, केबलचालक आणि राजकीय पक्ष यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

८. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,
सही/-
**( के.एफ.विल्फ्रेड )**
**सचिव**

**भारत निवडणूक आयोग**

**निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली- ११०००१**

क्रमांक : ५०९/७५/२००४/जेएस-आय दिनांक : १५ एप्रिल, २००४

**आदेश**

१) ज्याअर्थी, केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ याच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद आहे की, कोणतीही व्यक्ती, कोणतीही जाहिरात अशी जाहिरात विहित जाहिरात संहितेशी अनुसरुन नसेल तर केबल सेवेच्या माध्यमाद्वारे त्या जाहिरातीचे पारेषण किंवा पुन:पारेषण करणार नाही आणि

२) ज्याअर्थी, उपरोल्लिखित कलम ६ नुसार जाहिरात संहितेमध्ये निर्धारित केलेल्या केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) नियम १९९४ याच्या नियम ७ च्या पोटनियम (३) मध्ये अशी तरतूद आहे की, "ज्या जाहिरातीचा उद्देश पूर्णपणे किंवा मुख्यत्वे धार्मिक किंवा राजकीय स्वरुपाचा आहे, अशा कोणत्याही जाहिरातीस परवानगी दिली जाणार नाही. जाहिराती या कोणत्याही धार्मिक किंवा राजकीय हेतूने निर्देशित असता कामा नये" आणि

३) ज्याअर्थी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने डब्ल्युपीएमपी क्र.५२१४/२००४ मधील दिनांक २३.३.२००४ च्या आपल्या न्यायनिर्णयाद्वारे व आदेशाद्वारे, (जेमिनी टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड विरुध्द भारतीय निवडणूक आयोग व इतर) केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) नियम १९९४ च्या नियम ७ (३) च्या उपरोल्लिखित तरतूदी स्थगित (अनिर्णित) ठेवल्या आहेत आणि

४) ज्याअर्थी, माननीय सर्वोच्च न्यायालयाने, आव्हानाधीन आदेशाच्या बदली, एसएलपी (दिवाणी) क्रमांक ६६७९/२००४ (माहिती व प्रसारण मंत्रालय विरुध्द मेसर्स जेमिनी टीव्ही व इतर) यामधील दिनांक २.४.२००४ च्या आपल्या अंतरिम आदेशाद्वारे खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

(एक) **जी जाहिरात देशाच्या कायद्यानुसार अनुरुप नाही आणि जी नीतीमत्ता, सभ्यता यांस बाधक आहे आणि भावना दुखावणारी किंवा जी तिरसर, घृणा व तिटकारा उत्पन्न करणारी आहे, अशा कोणत्याही जाहिरातीचे प्रक्षेपण कोणताही केबल परिचालक (ऑपरेटर) किंवा दूरदर्शन वाहिनी करणार नाही.**

**(दोन) प्रक्षेपणाचे संनियंत्रण भारतीय निवडणूक आयुक्ताद्वारे करण्यात येईल.**

(तीन) **उमेदवाराने अशी जाहिरात समाविष्ट करण्यावरील केलेला खर्च अंतर्भूत करावा किंवा अंतर्भाव करु नये किंवा कसे याबाबतच्या प्रश्नावर दि.५ एप्रिल, २००४ रोजी विचार करण्यात येईल आणि**

(चार) **अशा जाहिराती कायद्यास अनुरुप आहेत किंवा कसे याबाबतच्या कार्यपध्दती भारताच्या निवडणूक आयुक्ताकडून निर्धारित करण्यात येतील.**

(पाच) ज्याअर्थी,भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने,आपल्या एसएलपी (दिवाणी) क्रमांक: ६६७९/२००४ मधील दिनांक १३ एप्रिल, २००४ च्या आणखी एका आदेशाद्वारे पुढीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

“आम्ही आदेश देण्यापूर्वी केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ (संक्षेपात “अधिनियम”) याच्या वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे विवक्षित तरतुदी आणि त्याखाली तयार केलेले नियम लक्षात आणून देणे महत्वाचे ठरेल. या अधिनियमाचा उद्देश हा देशातील केबल टेलिव्हिजन नेटवर्कच्या कामकाजाचे विनियमन करणे हा आहे. अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद आहे की कोणतीही व्यक्ती कोणत्याही जाहिरातीचे अशी जाहिरात विहित जाहिरात संहितेशी अनुरुप असल्याखेरीज, केबल सेवेच्या माध्यमाद्वारे पारेषण किंवा पुन: पारेषण करणार नाही. अधिनियमाच्या कलम ११ मध्ये अशी तरतूद आहे की, कोणत्याही केबल परिचालकाने अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे किंवा करीत आहे असे मानण्यास कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यास संयुक्तिक कारण असेल तर तो, केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करण्यासाठी असा केबल परिचालक वापर करीत असलेली सामग्री ताब्यात घेईल. अधिनियमाच्या कलम १२ मध्ये, अधिनियमाच्या तरतुदींचा कोणताही भंग होईल त्यावेळी सामग्रीच्या अधिहरण करण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, सामग्रीच्या जप्तीसाठीची किंवा अधिहरणासाठीची आणि शिक्षेची तरतूददेखील आहे. कलम १६ मध्ये आणखी अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाकरिता शिक्षेची तरतूद आहे. कलम १९ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, प्राधिकृत अधिकाऱ्यास कोणतीही जाहिरात, जी विहित कार्यक्रम संहितेशी व जाहिरात संहितेशी अनुरुप नाही आणि जिच्यामुळे धर्म, वंश, भाषा, जात किंवा समाज किंवा इतर कोणत्याही कारणावरुन विविध धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गटांमध्ये किंवा जातींमध्ये किंवा समाजामध्ये अशांती किंवा शत्रुत्वभाव, द्वेष किंवा तणाव निर्माण होण्याचा संभव आहे किंवा सार्वजनिक प्रशांततेचा भंग होण्याचा संभव आहे असे वाटत असेल तर तो लोकहिताच्या दृष्टीने त्यास तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे वाटल्यास अशा कोणत्याही जाहिरातीचे पारेषण करण्यास किंवा पुन: पारेषण करण्यास केबल परिचालकांना आदेशाद्वारे मनाई करु शकेल या अधिनियमाच्या कलम २२ द्वारे केंद्र सरकारला या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्यासाठी नियम तयार करण्याचा अधिकार प्रदान केला आहे. अधिनियमाच्या कलम २२ द्वारे केंद्र सरकारला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, केबल टेलिव्हिजन नेटवर्क नियम, १९४४ (थोडक्यात "नियम") म्हणून संबोधले जाणारे नियम तयार करण्याचा अधिकार केंद्र सरकारला प्रदान केलेला आहे. नियम १९९४ च्या नियम ७ मध्ये अशी तरतूद आहे की, जेथे केबल सेवेमध्ये जाहिरात दाखविण्यात येते तेथे ती देशाच्या कायद्यास अनुरुप असेल त्याप्रमाणे तयार करण्यात येईल आणि ती, वर्गणीदारांची नीतीमत्ता, सभ्यता यांचे उल्लंघन करणार नाही व धार्मिक भावना दुखावणार नाही. इतर गोष्टींबरोबरच, उप-नियम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, जी जाहिरात कोणत्याही वंशाचा, जातीचा, वर्णाचा, पंथाचा आणि

राष्ट्रीयत्वाचा उपहास करत असेल, जी भारताच्या संविधानाच्या कोणत्याही तरतुदीच्या विरुध्द असेल आणि जी गुन्हा करणे, शांतताभंग किंवा हिंसा किंवा कायदेभंग करणे किंवा हिंसेचा अतिगौरव करणे किंवा कोणत्याही प्रकारची अश्लिलता यासाठी लोकांना चिथावणी देण्याकडे झुकत असेल त्या जाहिरातीस परवानगी दिली जाणार नाही. उप-नियम (३) मध्ये अशी आणखी तरतूद आहे की, पूर्णपणे किंवा मुख्यत्वे धार्मिक किंवा राजकीय स्वरुपाची आहे असा जिच्यावर आक्षेप आहे अशा कोणत्याही जाहिरातीस परवानगी दिली जाणार नाही. जाहिरातीमध्ये कोणत्याही धार्मिक किंवा राजकीय हेतूबाबत निदेश देताच कामा नये. या पार्श्वभूमीवर आम्ही आता पुढील आदेश देण्याचे प्रस्तावित करतो :

दूरदर्शन वाहिनी आणि / किंवा केबल नेटवर्क यावर जाहिरात देण्याचे प्रस्तावित करणारा प्रत्येक नोंदणीकृत राष्ट्रीय व राज्य राजकीय पक्ष व प्रत्येक निवडणूक लढविणारा उमेदवार यांना अशा जाहिरातीच्या प्रक्षेपणाच्या प्रस्तावित प्रारंभाच्या दिनांकापूर्वी तीन दिवसांच्या आत निवडणूक आयोग / पदनिर्देशित अधिकारी (निवडणूक आयोगाने पदनिर्देशित केल्याप्रमाणे) यांच्याकडे अर्ज करावा लागेल. इतर कोणत्याही व्यक्तीच्या किंवा नोंदणीकृत नसणाऱ्या राजकीय पक्षांच्या बाबतीत, त्यांना प्रक्षेपणाच्या दिनांकापूर्वी सात दिवसांच्या आत अर्ज करावा लागेल. अशा अर्जासोबत इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील प्रस्तावित जाहिरातीच्या दोन प्रती, यथोचितरीत्या साक्षांकित केलेल्या त्याच्या प्रतिलेख्यांसह जोडण्यात येतील. निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याच्या बाबतीत, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत तो निकालात काढण्यात येईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईपर्यंत, दिनांक २ एप्रिल, २००४ चा आमचा आदेश लागू असेल. निवडणुकीच्या नंतरच्या टप्प्याच्या बाबतीत, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तो तीन दिवसांच्या आत निकालात काढण्यात येईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईपर्यंत, दिनांक २ एप्रिल, २००४ चा आमचा आदेश लागू असेल असे अर्ज निकालात काढताना, निवडणूक आयोगास / पदनिर्देशित अधिकाऱ्यास जाहिरातीचा कोणताही भाग थेट वगळता येईल / त्यात फेरबदल करता येईल.

प्रमाणनासाठीच्या अर्जात पुढील तपशीलांचा अंतर्भाव असेल :

(क) जाहिरातीच्या निर्मितीचा खर्च;

(ख) जाहिरात किती वेळा द्यावी त्या संख्येच्या विभागणीसह आणि प्रत्येक वेळी ती देण्यासाठी आकारावयाच्या प्रस्तावित दरासह दूरदर्शन वाहिनीवर किंवा केबल नेटवर्कवर अशा जाहिरातीच्या प्रस्तावित प्रक्षेपणाचा अंदाजे खर्च;

(ग) उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) / पक्षांच्या निवडणुकीच्या पूर्वेक्षणाच्या फायद्याकरिता जाहिरात देण्यात आली आहे किंवा कसे याबाबतचे निवेदनही त्यात अंतर्भूत असेल;

(घ) जर जाहिरात राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने दिली असेल तर, ती व्यक्ती, सदर जाहिरात ही राजकीय पक्ष किंवा उमेदवार याच्या लाभासाठी नाही आणि ती उक्त जाहिरात कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने

पुरस्कृत किंवा कार्यादिष्ट केलेली नाही किंवा त्याकरिता रक्कम चुकती केलेली नाही असे शपथेवर नमूद करील; आणि

(ङ) सर्व प्रदान धनादेश किंवा दर्शनी धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) याद्वारे करण्यात येईल, असे निवेदन.

आम्हास असे दिसून येते की, अधिनियमाच्या कलम २ (क) मध्ये प्राधिकृत अधिकारी याची व्याख्या त्याच्या स्थानिक अधिकारितेच्या सीमांतर्गत, (क) जिल्हा दंडाधिकारी, (ख) उप विभागीय दंडाधिकारी किंवा (ग) पोलीस आयुक्त म्हणून केली आहे. त्याचप्रमाणे, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम २८ क मध्ये अशी तरतूद आहे की, कोणत्याही निवडणुकांचे आयोजन करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व या भागाअन्वये नियुक्त केलेला अन्य कोणताही अधिकारी आणि कोणत्याही राज्य शासनाने त्यावेळेपुरता पदनिर्देशित केलेला कोणताही पोलीस अधिकारी निवडणूक जाहीर करणाऱ्या अधिसूचनेच्या दिनांकास व तेव्हापासून आणि अशा निवडणुकीचे निकाल जाहीर करणाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी निवडणूक आयोगावर प्रतिनियुक्त असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार, असे अधिकारी त्या कालावधीत, निवडणूक आयोगाचे नियंत्रण, अधीक्षण व शिस्त यांच्या अधीन असतील.

विविध केबल नेटवर्क व दूरदर्शन वाहिन्यावरील सर्व जाहिरातींची प्रीसेन्सॉरशिप (पूर्वअभ्यवेक्षण) करणे निवडणूक आयोगाला प्रत्यक्षपणे शक्य होणार नसल्यामुळे, निवडणूक आयोगास याबाबतीतील त्याचे अधिकार उप-विभागीय दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या सर्व राज्यांच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे किंवा राज्य प्रांतिक नागरी सेवेच्या सदस्याकडे सोपविण्यासाठी प्राधिकृत करणे आवश्यक ठरते. निवडणूक आयोगाने काढलेल्या सर्वसाधारण आदेशाद्वारे हे करता येईल. हे अधिकारी, निवडणूक आयोगाच्या नियंत्रण, अधीक्षण व शिस्त यांच्या अधीन काम करतील. निवडणूक आयोग त्यात बदल करुन प्रत्येक राज्य किंवा, यथास्थिती, संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे त्याचे अधिकार सोपवील.

प्रत्येक राज्याच्या किंवा संघराज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास, जाहिरातीचे प्रमाणपत्र देण्याच्या किंवा नाकारण्याच्या निर्णयाबाबत कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवार किंवा इतर कोणतीही व्यक्ती याच्या तक्रारी किंवा गाऱ्हाणी हाताळण्यासाठी एक समिती नियुक्त करता येईल अशा रीतीने नियुक्त केलेली समिती, त्याचा निर्णय निवडणूक आयोगाला कळवील.

अशारीतीने घटित केलेली समिती, भारतीय निवडणूक आयोगाच्या एकूण अधीक्षण, निदेशन व नियंत्रण याखाली कार्य करील.

समितीने दिलेला निर्णय हा बंधनकारक असेल आणि वर काय नमूद केले आहे त्यास अधीन राहून, इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातींसाठी अर्ज करणारे राजकीय पक्ष, उमेदवार किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांच्याकडून त्याचे अनुपालन करण्यात येईल.

संबंधित राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवार किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती यांस वगळण्यासाठी किंवा यथास्थिति फेरबदल करण्यासाठी व्यक्त केलेले मत आणि प्रतिपादन बंधनकारक असेल आणि त्यांच्याकडून असा पत्रव्यवहार त्यांना प्राप्त झाल्यापासून चोवीस तासांच्या आत अनुपालन करण्यात येईल आणि अशारीतीने सुधारण्यात आलेली जाहिरात पुनर्विलोकनासाठी व प्रमाणनासाठी पुन:सादर करण्यात येईल.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२६ च्या तरतुदी, या आदेशाद्वारे समाविष्ट केलेल्या जाहिरातींना लागू होतील असे आम्ही स्पष्ट करतो.

जर कोणताही राजकीय पक्ष, उमेदवार किंवा अन्य कोणतीही व्यक्ती, एकतर समितीने किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्याने /निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयाने बाधित झाला असेल तर त्यांना स्पष्टीकरणासाठी किंवा समुचित आदेशासाठी केवळ मा.न्यायालयात जाण्यास मुभा राहील, आणि अशा जाहिराती बरहुकूम तक्रारी संबंधातील कोणताही विनंतीअर्ज अन्य कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण विचारार्थ/स्वीकारणार नाही. हा आदेश दि.१६ एप्रिल, २००४ पासून अंमलात येईल आणि तो दि.१० मे, २००४ पर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

हा आदेश, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे आणि तो सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती, व्यक्तींचा गट किंवा केंबल नेटवर्क आणि किंवा दूरदर्शन वाहिन्या तसेच केबल परिचालक (ऑपरेटर्स) यांच्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये जाहिरातीचा समावेश करण्याचे ज्याने प्रस्तावित केले आहे ते विश्‍वस्त मंडळ यांना बंधनकारक असेल.

अशा जाहिरातींच्या प्रसारणावर संनियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असेल अशा कर्मचारीवर्गाची मागणी करण्याची निवडणूक आयोगाला मुभा असेल. जेथे निवडणूक आयोगाला, या आदेशाचे किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतूदींचे उल्लंघन झाले असल्याबद्दल खात्री पटली असेल तेथे आयोग असे उल्लंघन तात्काळ थांबविण्याचा आदेश, उल्लंघन करणाऱ्याला देईल आणि आयोगाला साधनसामग्री थेट जप्त करण्याची मुभा देखील राहील. ज्या व्यक्तीवर (व्यक्तींवर) असा आदेश बजावण्यात आला असेल ती व्यक्ती (त्या व्यक्ती) प्रत्येक आदेशाचे तत्परतेने अनुपालन करील/करतील.

निवडणूक आयोगास जाहिरातींच्या संनियंत्रणावरील खर्च भागविण्यासाठीचा निधी भारताच्या संघ राज्याकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. भारतीय संघराज्याद्वारे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि वृत्तपत्र माध्यमे यांच्याकडून या आदेशाला पुरेशी प्रसिध्दी देण्यात येईल.

**हा आदेश, या न्यायालयाने दि. २ एप्रिल २००४ रोजी दिलेल्या आदेशानुसार असून तो अंतरिम उपायोजना म्हणून दि. १० मे,२००४ पर्यंत अंमलात राहील.**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, दिनांक २३ मार्च,२००४ चा आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय स्थगित राहील या अधिनियमाच्या तरतुदींचा भंग केल्याच्या संबंधात केंद्र सरकारच्या अधिकाराचे अल्पीकरण करुन नाही तर त्यात भर घालून हा आदेश मंजूर केला आहे.″**

६. म्हणून आता, सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निदेशांच्या अनुषंगाने निवडणुक आयोग याद्वारे पुढीलप्रमाणे निदेश देत आहे :-

(एक) परिच्छेद (दोन) मध्ये नमूद केलेल्या राजकीय पक्षांनी किंवा संघटनांनी केलेल्या अर्जांवर कार्यवाही करण्यासाठी पुढील व्यक्तींचा समावेश असलेली एक समिती घटीत करण्याचा निदेश, मुख्य निवडणुक अधिकारी दिल्ली यांना याद्वारे देण्यात येत आहे, यामध्ये खालील व्यक्तींचा समावेश असेल :-

क) सह मुख्य निवडणुक अधिकारी-- अध्यक्ष
ख) दिल्लीतील कोणत्याही संसदीय मतदारसंघाचा निवडणुक निर्णय अधिकारी
ग) माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून मागविण्यात येणारा वर्ग -१ च्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारा एक तज्ञ अधिकारी.

( दोन ) उपरोक्त समिती दूरदर्शन वाहिनी किंवा केबल नेटवर्क मध्ये समाविष्ट करावयाच्या कोण्यत्याही जाहीरातीचे प्रमाणित करण्याकरिता पुढील व्यक्तींकडून अर्ज स्वीकारील :

क ) राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्र, दिल्ली येथे ज्यांची मुख्यालये आहेत ते सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष.

ख ) राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्र, दिल्ली येथे ज्यांची मुख्यालये आहेत असे सर्व गट किंवा संघटना किंवा संघ किंवा व्यक्ती.

( तीन ) प्रत्येक अन्य राज्याच्या / संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला परिच्छेद (चार) मध्ये नमूद केलेल्या राजकीय पक्षांनी व संघटनांनी केलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी पुढील समिती घटित करण्याचा निदेश याद्वारे देण्यात येत आहे, ही समिती खालील प्रमाणे असेल : -

क) अपर / सह मुख्य निवडणूक अधिकारी – अध्यक्ष
ख) राज्याच्या राजधानीत स्थित असलेल्या कोणत्याही संसदीय मतदान संघाचा निवडणूक निर्णय अधिकारी .
ग) माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून मागविण्यात येणारा वर्ग – १ च्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारा एक तज्ञ अधिकारी.

(चार) वरील परिच्छेद (तीन) मधील घटित करण्यात आलेली समिती, दूरदर्शन वाहिनीवरील व केबल नेटवर्कवरील जाहिरातीचे प्रमाणन करण्यासाठी पुढील व्यक्तींकडून अर्ज स्वीकारील :-

क) त्या राज्यात / संघ राज्यक्षेत्रात ज्यांची मुख्यालये आहेत असे सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष.

ख) त्या राज्यात / संघ राज्यक्षेत्रात ज्यांची नोंदणीकृत कार्यालये आहेत अशा सर्व संघटना किंवा व्यक्तींचा गट किंवा संघ.

(पाच) जेथे पदनिर्देशित अधिकारी संसदीय मतदार संघाचा निवडणूक निर्णय अधिकारी आहे आणि निवडणूक लढविणारा उमेदवार हा , त्या संसदीय मतदार संघातील विधानसभा मतदार संघामध्ये येत असेल तेथे अशा संसदीय मतदार संघातून वैयक्तिक निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारद्वारे केबल नेटवर्क किंवा दूरदर्शन वाहिनीवर प्रसारित करावयाच्या प्रस्तावित जाहिरातीचे प्रमाणन करण्यासाठीचा अर्ज स्वीकारण्याकरिता देशातील प्रत्येक संसदीय मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास, याद्वारे पदनिर्देशित अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. उक्त निवडणूक अधिकाऱ्यास, राज्य प्रादेशिक नागरी सेवेतील विभागीय दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या कोणत्याही सहायक निवडणूक अधिकाऱ्यास त्याच्या अर्ज प्रमाणन करण्याच्या कामासाठी सहाय्य करण्यासाठी स्वीकृत करता येईल.

७. जाहिरातीचे प्रमाणन मान्य करण्याच्या किंवा नाकारण्याच्या निर्णयाच्या संबधात कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या तक्रारी / गाऱ्हाणी स्वीकारण्यासाठी प्रत्येक राज्याचा / संघ राज्यक्षेत्राचा मुख्य निवडणूक अधिकारी पुढीलप्रमाणे समिती घटित करील : -

एक) मुख्य निवडणूक अधिकारी — अध्यक्ष

दोन) भारताच्या निवडणूक आयोगाने नियुक्त केलेला कोणताही निवडणूक निरीक्षक

तीन) वरील परिच्छेद ६ (एका) व परिच्छेद ६ (तीन) मध्ये नमूद केलेल्या एका तज्ञाखेरीज समितीकडून स्वीकृत करावयाचा अन्य एक तज्ञ.

८. प्रत्येक नोंदणीकृत राजकीय पक्ष व निवडणूक लढविणारे प्रत्येक उमेदवार यांच्याकडून कोणत्याही जाहीरातीच्या प्रमाणनासाठीचे अर्ज, वरील परिच्छेद ६ (एक) व ६ (दोन) मध्ये नमूद केलेल्या समितीकडे, किंवा यथास्थिती वरील परिच्छेद ६ (चार) मध्ये नमूद केलेल्या पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे, अशा जाहीरातींच्या प्रसारणाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ३ (तीन) दिवसांच्या आत करण्यात येतील. असे अर्ज निवडणूकीच्या पहिल्या टप्पात ते प्राप्त झाल्यापासून २(दोन) दिवसांत निकालात काढण्यात आले असतील आणि त्यावर निर्णय घेण्यात येईपर्यंत, सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक २-४-२००४ चा आदेश, लागू होईल.

९. कोणत्याही अन्य व्यक्तीला किंवा नोंदणीकृत नसलेल्या राजकीय पक्षाला जाहीरातीच्या प्रमाणनाचा अर्ज करावयाचा असेल तर तो जाहिरात प्रसारीत करण्याच्या दिनांकापूर्वी सात दिवसांच्या आधी करावा लागेल.

१०. **जोडपत्र — क** मध्ये विहीत करण्यात आलेल्या नमुन्यातील अशा प्रत्येक अर्जासोबत पुढील गोष्टी जोडण्यात येतील त्या :-

एक) प्रस्तावित जाहिरातीच्या इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील दोन प्रती व त्यासोबत त्याची यथोचितरीत्या साक्षांकित केलेली नक्कल.

दोन) प्रमाणनाच्या अर्जामध्ये पुढील तपशील अंतर्भूत असेल:-

क) जाहिरातीच्या निर्मितीचा खर्च;

ख) जाहिरात किती वेळा द्यावी त्या संस्थेच्या विभागणीसह आणि प्रत्येक वेळी ती देण्यासाठी आकारावयाच्या प्रस्तावित दरासह दूरदर्शन वाहिनीवर किंवा केबल नेटवर्कवर अशा जाहिरातीच्या प्रस्तावित प्रक्षेपणाचा अंदाजित खर्च;

ग) उमेदवाराच्या (उमेदवारांच्या ) / पक्षांच्या निवडणूकीच्या पूर्वेक्षणाच्या फायद्याकरीता जाहिरात देण्यात आल आहे किंवा कसे याबाबतचे निवेदनही त्यात अंतर्भूत असेल;

घ) जर जाहिरात, राजकीय किंवा उमेदवार यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने दिली असेल तर, ती व्यक्ती, सदर जाहिरात ही, राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्या लाभासाठी नाही आणि ती उक्त जाहिरात, कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने पुरस्कृत किंवा कार्यादिष्ट केलेली नाही किंवा त्याकरिता रक्कम चुकती केलेली नाही असे शपथेवर नमूद करील;

ङ) सर्व प्रदान धनादेश किंवा दर्शनी धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) यांद्वारे करण्यात येईल असे निवेदन ;

११. जाहिरातीच्या प्रमाणना संबंधीच्या अर्जावर निर्णय घेताना, जाहिरातीचा कोणताही भाग थेट वगळण्याची / त्यामध्ये फेरबदल करण्याची मुभा, वरील परिच्छेद-६ (एक) व ६ (तीन) द्वारे घटित केलेल्या समितीला किंवा वरील परिच्छेद ६ (पाच) मधील पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा वरील परिच्छेद ७ द्वारे घटित केलेल्या पुनर्विलोकन समितीला असेल. वगळण्यासाठी व फेरबदल करण्यासाठी मत व्यक्त करणारा व प्रतिपादन करणारा असा प्रत्येक आदेश, संबंधित राजगीय पक्ष किंवा निवडणूक लढविणारा उमेदवार आणि कोणत्याही अन्य व्यक्ती यांना बंधनकारक असेल आणि त्यांच्याकडून असा पत्रव्यवहार त्यांना प्राप्त झाल्यापासून २४ तासांच्या आत अनुपालन करण्यात येईल. अशाप्रकारे फेरबदल केलेली जाहिरात पुर्नविलोकन व प्रमाणनासाठी पुन: सादर करण्यात येईल.

१२. जेथे वरील परिच्छेद ६ (एक) व ६ (तीन) द्वारे घटित केलेल्या समित्या किंवा पदनिर्देशित अधिकारी किंवा यथास्थिती, वरील परिच्छेद ७ द्वारे घटित केलेली पुर्नविलोकन यांची, सदर जाहिरात, कायद्याच्या आवश्यक बाबींची पूर्तता करते आणि वरील परिच्छेद ४ व ५ मध्ये अंतर्भूत असलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशांनुसार देण्यात आली आहे याबाबत खात्री पटली असेल तेथे, त्यांनी, संबंधित जाहिरात प्रसारीत करण्यास योग्य आहे अशा अर्थाचे प्रमाणपत्र दिले पाहिजे. प्रमाणपत्राचा नमुना **जोडपत्र ख** मध्ये देण्यात आला आहे.

१३.	दिनांक १३ एप्रिल, २००४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या निदेशांचे संबंधित व्यक्तीकडून काटेकोर अनुपालन करण्यात येईल आणि सदर निदेश दिनांक १० मे, २००४ पर्यंत अंमलात राहतील आणि ते केबल नेटवर्क आणि /किंवा दूरदर्शन वाहिनी तसेच केबल ऑपरेटर यांसह इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये जाहिरात देण्याचे ज्याने प्रस्तावित केलेले आहे ते सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्तींचे गट किंवा विश्वस्तमंडळ यांना बंधनकारक असतील.

आदेशानुसार,

सही/-

**(के. एफ. विल्फ्रेड )**
**सचिव**

**जोडपत्र —क**

## जाहिरातीच्या प्रमाणनाकरिता अर्ज

**एक**

(एक) अर्जदाराचे नाव आणि संपूर्ण पत्ता

(दोन) जाहिरात राजकीय पक्ष निवडणूक लढविणारा उमेदवार / इतर कोणतीही व्यक्ती/ व्यक्तींचे गट/ संघ / संघटना / विश्वस्त मंडळ (नाव द्यावे) यानी दिलेली आहे किंवा कसे ?

(तीन) (क) राजकीय पक्षाबाबत, पक्षाचा दर्जा (मान्यता प्राप्त / राष्ट्रीय / राज्यस्तरीय / अमान्यताप्राप्त पक्षा आहे किंवा कसे ?

(ख) उमेदवाराच्या बाबतीत जेथून निवडणूक लढवत आहे त्या लोकसभा / विधानसभा मतदार संघाचे नाव

(चार) राजकीय पक्ष व्यक्तींचा गट किंवा निकाल / संघ / संघटना/ विश्वस्त मंडळ याच्या मुख्यालयाचा पत्ता

(पाच) ज्या वाहिन्यांवर / केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करण्याचे प्रस्तावित आहे त्या वाहिन्या / केबत नेटवर्क

(सहा) (क) कोणत्याही उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) निवडणूकीच्या भविष्यातील लाभाकरिता जाहिरात आहे का ?

(ख) असल्यास, अशा उमेदवाराचा (उमेवारांचा) संपूर्ण पत्ता आणि मतदारसंघाचे (मतदारसंघाची) नाव (नावे) यांसह नाव (नावे) द्यावे (द्यावीत).

(सात) जाहिरात सादर करण्याचा दिनांक

(आठ) जाहिरातीमध्ये वापरलेली भाषा (वापरलेल्या भाषा) (यथोचितरित्या सांक्षांकित केलेल्या प्रतिलेखासह इलेक्ट्रॉनिक फॉर्ममधील दोन प्रतींसह जाहिरात सादर करावयाची आहे.)

(नऊ) जाहिरातीचे शीर्षक

(दहा) जाहिरात निर्मिती खर्च

(अकरा) जाहिरातीच्या संख्येची विभागणी आणि अशा प्रत्येक जाहिरातीच्या प्रस्तावित दरासह प्रस्तावित प्रसारणाचा अदमासे खर्च.

(बारा) एकूण समाविष्ट खर्च (रुपयांमध्ये).

**दोन**

मी, श्री. / श्रीमती ------------------------------------------------, यांचा मुलगा/ मुलगी / पत्नी..........................................................................., (पूर्ण पत्ता)

-------------------------------------------------------------------------------------

या जाहिरातीची निर्मिती आणि प्रसारण यांच्याशी संबंधित असलेले सर्व प्रदान धनादेश / दर्शनी धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) द्वारे करण्यात येईल, अशी हमी देतो / देते.

**ठिकाण :** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**दिनांक :**

**तीन**

(राजकीय पक्ष किंवा उमेदवार या व्यतिरिक्त असलेल्या व्यक्ती / व्यक्तींद्वारे करण्यात येणाऱ्या जाहिरातीकरिता अर्ज )

मी, श्री. / श्रीमती -----------------------------------------------, यांचा मुलगा/ मुलगी / पत्नी..............................................................................., (पूर्ण पत्ता)

-------------------------------------------------------------------------------------

याद्वारे असे नमूद करतो आणि प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, यासोबत सादर करण्यात आलेली जाहिरात/ जाहिराती या कोणत्याही राजकीय पक्ष किंवा कोणत्याही उमेदवार याच्या लाभाकरिता नाहीत आणि ही जाहिरात (जाहिराती) कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने पुरस्कृत केलेली (केलेल्या नाही / सोपवलेली नाही किंवा त्यासाठी रक्कम चुकती केलेली नाही.

**ठिकाण :** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**दिनांक :**

<u>**जोडपत्र-ख**</u>

**प्रसारणाकरिता जाहिरातीचे प्रमाणन**

**एक.**

(एक) अर्जदाराचे / राजकीय पक्षाचे / उमेदवाराचे / व्यक्तीचे / व्यक्तीव्या गटाचे / संघाचे / संघटनेचे / विश्वस्त मंडळाचे नाव आणि पत्ता.

(दोन) जाहिरातीचे शीर्षक

(तीन) जाहिरातीचा कालावधी

(चार) जाहिरातीमध्ये वापरलेली भाषा (वापरलेल्या भाषा)

(पाच) जाहिराती सादर केल्याचा दिनांक

(सहा) प्रसारणाकरिता प्रमाणनाचा दिनांक

<u>दोन.</u>

प्रमाणित करण्यात येते की, वरील जाहिरात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने विहित केलेल्या मार्गदर्शकतत्वांनुसार प्रसारणाकरिता योग्य आहे.

समितीचा अध्यक्ष/समितीचे सदस्य /
पदनिर्देशित अधिकारी यांचा स्वाक्षरी

..............................

...............................

................................

ठिकाण :

दिनांक :

सर्व राज्य आणि संघराज्य क्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयुक्तांचे पत्र क्रमांक ५०९/७५/२००४ जे-एक, दिनांक २२-०७-२००४.

**विषय :- दूरचित्रवाणी वाहिनी आणि केबल नेटवर्क यावरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींशी संबंधित आयोगाचे दि. १५-०४-२००४ चे आदेश.**

उल्लेखित विषयावरील आयोगाचे सम क्रमांकाचे १५.०४.२००४ चे पत्र आणि त्या सोबत जोडलेला त्याच दिनांकाचा आदेश निर्देशित करण्याचा मला आदेश आहे.एसएसपी (सी) क्रमांक ६६७९/०४ मधील दि. १३.०४.२००४ च्या सर्वोच्च न्यायालयाने संमत केलेल्या अंतरिम आदेशानुसार उक्त आदेश काढण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दि. ०५-०७-२००४ च्या आदेशान्वये असे आदेश दिले आहेत की, पुढील आदेश मिळेपर्यंत त्यांचा दि. १३-०४-२००४ चा आदेश अंमलात असल्याचे चालू राहील. दि. ०५.०७.२००४ च्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

२. त्यानुसार, पुढील सूचना मिळेपर्यंत आयुक्तांचा आदेश क्रमांक ५०९/७५/२००४-जेएस एक दिनांक १५.०४.२००४ अंमलात असल्याचे चालू राहील. या संबंधात पुढील सूचना मिळेपर्यंत पुढील निवडणुकीमध्ये उक्त आदेशातील निदेश काटेकोरपणे अनुसरण्यात यावेत.

३. कृपया पोच द्यावी.

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्राांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयुक्तांचे पत्रा क्र. ५०९/७५/२००४/जे एस-एक/खंड-दोन/आरसीसी दि. २१ नोव्हेंबर,२००८.

**<u>विषय:- आकाशवाणी वरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींबाबत.</u>**

माहिती व प्रसारण मंत्रालयाने, पत्र क्र.१/०४/२००४ बीसी/१ पाच दि. २० नोव्हेंबर,२००८, नुसार राजकीय पक्ष/ उमेदवार/व्यक्ती यांच्याकडून आकाशवाणीवरूनही अत्यल्प कालावधीच्या आणि छोट्या सांगितिकांच्या स्वरुपात दिल्या जाणाऱ्या जाहिरातींकरीता व्यावसायिक जाहिरात संहितेमध्ये, सुधारणा करण्यात आली असल्याचे कळविले आहे. परिणामी आयोगाने, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात दुरचित्रावाणी वाहिन्या/केबल प्रसारण यंत्रणा यावरील राजकीय जाहिरातींची छाननी करण्यासाठी समित्या स्थापन करण्यात याव्या अशा अर्थाचे आदेश काढले आहेत. त्या समित्या लोकसभा व विधानसभेच्या सर्वसाधारण निवडणूकांच्या संबंधात लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेच्या कालावधी दरम्यान, राजकीय पक्ष/उमेदवार/इतर व्यक्ती यांनी दिलेल्या जाहिरातींची प्रसारणपूर्व छाननी करण्यासाठीच्या अर्जाबाबतसुध्दा कार्यवाही करतील. आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

या आदेशाची प्रत, सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या राज्य शाखांसह आपल्या राज्यात/संघराज्यक्षेत्राात, मुख्यालय असणाऱ्या, सर्व राजकीय पक्षांना देण्यात यावी. इतर संबंधित प्राधिकरणे आणि सर्वसामान्य जनतेच्या माहितीस्तव यास विस्तृत प्रसिध्दी द्यावी. कृपया या पत्राची पोच द्यावी.

प्रत-उक्त संदर्भित आदेशाच्या प्रतीसह सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्यस्त्रीय राजकीय पक्षांना माहितीस्तव.

सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रांतील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ५०९/७५/२००४/जे एस-एक/खंड-दोन/आरसीसी दि. २१ नोव्हेंबर,२००८.

# आदेश

**विषय:- दूरचित्रवाणी वाहिन्या आणि केबल दूरचित्रावाणी प्रसारण यंत्राणायांवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींसंबंधातील दि. १५ एप्रिल, २००४ चे आयोगाचे आदेश------- आकाशवाणी संबंधातही विस्तारित करणेबाबत.**

१. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या, एस एल पी (दिवाणी) क्र.६६७९/२००४ (माहिती व प्रसारण मंत्रालय दि. मे. जेमिनी टिव्ही आणि इतर) यामध्ये दिलेल्या आदेशाअनुसार निवडणूक आयोगाने त्यांच्या आदेश क्र. ५०९/७५/२००४/जे एस-एक दि. १५ एप्रिल, २००४ नुसार दूरचित्रवाणी वाहिन्या आणि केबल दूरचित्रावाणी प्रसारण यंत्राणायांवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींसंबंधात निदेश दिले आहेत.

२. माहिती व प्रसारण मंत्रालयाने, पत्रा क्र. १/०४/२००४ बीसी/१ पाच दि. २० नोव्हेंबर,२००८अन्वये 'आकाशवाणीवरील व्यावसायिक ताहिरात संहितेचा' खंड-दोन (४) यांमध्ये खालील परंतुक जादा दाखल करुन, सुधारणा करण्यात आल्याचे कळविले आहे:-

"परंतु, राजकीय पक्ष/उमेदवार/इतर कोणतीही व्यक्ती यांच्याकडून केवळ लोकसभेच्या सर्वसाधारण निवडणुका/विधानसभे सर्वसाधारण निवडणुका/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्चयया सर्वसाधारण निवडणुकांच्या संबंधात जेव्हा आदर्श आचारसंहिता लागू असेल त्या कालावधीदरम्यान विहित शुल्क प्रदान केल्यानंतर अत्यल्प कालावधीच्या आणि छोट्या संगितिकांच्या स्वरुपातील जाहिराती स्वीकारल्या जातील. अशा जाहीराती, या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणूकांच्या बाबतीत भारतीय निवडणूक आयोग/ भारतीय निवडणूक आयोगांतर्गत असलेले प्राधिकारी यंनी, आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाने केलेल्या प्रसारणापूर्व छाननीच्या अधीन राहून स्वीकारल्या जातील."

३. वरील बाब विचारात घेऊन, निवडणूक आयोगाने त्यांच्या दि. १५ एप्रिल, २००४ चा दूरचित्रावाणी वाहिन्या आणि केबल दूरचित्रावाणी यंत्राणेवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींसंबधातील आदेश हा आता कोणत्याही राज्य/संघराज्यक्षेत्रातील लोकसभा किंवा विधानसभेच्या सर्वसाधारण निवडणुकांच्या बाबतीत लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेच्या कालावधी दरम्यान खाजगी एफ एम वाहिन्यांसह आकाशवाणीवरील जाहिरातींना सुध्दा लागू असेल असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, राजकीय स्वरुपाची कोणतीही जाहिरात प्रसारीत आकाशवाणीवर करण्यासाठी प्रसारण प्रमाणपत्रासाठी अर्ज संबंधित राज्यातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात

प्रसारणपूर्व छाननीकरीता आणि जाहिरातीच्या प्रसारणास प्रमाणित करण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या समितीकडे सादर करावा. हा अर्ज दूरचित्रावाणी वाहिनी/केबल/प्रसारणयंत्राणेवरील जाहिरातींसाठीच्या दि.१५.०४.२००४ च्या आदेशातील विहित नमुन्यात, प्रस्तावित जाहिरातीच्या टेप/सीडी आणि एका साक्षांकित प्रतिलेखासह सादर केला पाहिजे. जाहिरातीच्या प्रमाणिकरणाचा नमनना देखीलसुध्दा दि. १५.०४.२००४ च्या आदेशात विहित केल्याप्रमाणे असावा. या नमुन्यांमधील ‘ दूरचित्रावाणी प्रसारण’ या संज्ञेच्या संदर्भात ती आकाशवाणीवरील जाहिरातींच्या प्रयोजनार्थ ‘ध्वनीक्षेपण’ असा समावेश करुन वाचण्यात यावी.

४. असे प्रमाणित करण्यात येते की, दि १५.०४.२००४ च्या आदेशात विर्निदिय्ट केलेल्या इतर सर्व अटी आणि निर्देश आणि विषयाशी संबंधित सुचना, बाकाशवाणीवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींच्या बाबतीत लागू असतील.

**भारत निवडणूक आयोग**

**निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११०००१**

दिनांक – १८ मार्च २००९

क्र. ५०९/७५/२००४ – जे एस-एक/आर सी सी/खंड दोन

प्रति,

सर्व राज्य/संघ राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय - दूरचित्रवाणी वाहिन्या व केबल दूरचित्रवाणी प्रसारण आणि आकाशवाणीवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिराती स्पष्टीकरणाबाबत.**

महोदय/महोदया,

कृपया, दूरचित्रवाणी वाहिन्या व केबल दूरचित्रवाणीवरील प्रसारणाकरिता प्रमाणपत्रासाठी अर्जांच्या छाननी संबंधी, दि.१५ एप्रिल २००४ चा आयोगाचा आदेश क्रमांक ५०९/७५/२००४/ जेएस-आय पहावा.आयोगाच्या दि. २१ नोव्हेंबर २००८ च्या आदेशानंतरच्या आदेशानुसार उक्त आदेशामधील निदेश सर्वसाधारण निवडणुकींच्या कालावधीमध्ये आकाशवाणीवरील जाहिरातीसाठी, लागू करण्यात आले आहेत.

२. दि. १५ एप्रिल २००४ च्या वरील निर्दिष्ट आदेशानुसार मुख्य निवडणूक अधिकारी, दिल्ली यांच्या कार्यालयात स्थापन करण्यात आलेली समिती सर्व राजकीय पक्षाच्या अर्जावर कार्यवाही करीत आहे. सर्व ७ राष्ट्रीय पक्ष आणि काही राज्यातील पक्षांची कार्यालये दिल्लीमध्ये आहेत.स्वतंत्र राज्यावर लक्ष देण्यासाठी या पक्षांच्या राज्य शाखा अर्ज प्रयोजितही करु शकतील. अशा प्रकरणामध्ये, असे स्पष्ट करण्यात येते की, राष्ट्रीय पक्षाच्या राज्य शाखेकडील अर्ज संबंधीत राज्यातील समितीकडे सादर करु शकतील. तथापि, दिल्लीतील मुख्यालयासह, राष्ट्रीय आणि राज्य पक्षाच्या केंद्रीय कार्यालयाकडील अर्जांची छाननी दिल्लीतील समितीव्दारे सुरु राहील. राज्याच्या पक्षाच्या बाबतीत ज्या पक्षांची मुख्यालये दिल्लीत आहेत अशा पक्षांव्यतिरिक्त राज्यातील पक्षांच्या शाखांकडील अर्जांवर, जेथे राज्य शाखा अर्ज सादर करतील, अशा राज्यांच्या संबंधित समितीव्दारे कार्यवाही करण्यात येईल.

३. असेही स्पष्ट करण्यात येते की, व्यक्तिगत उमेदवाराकडून दूरदर्शन आणि आकाशवाणी या दोन्हीवरील जाहिरातीसाठींचे अर्ज संबंधित मतदारसंघाच्या निर्वाचन अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील समितीकडे करता येतील.

४. आयोगाने असेही निदेश दिले आहेत की, जेव्हा, समितीव्दारे दूरचित्रवाणी प्रसारण/ध्वनीक्षेपण यासाठी प्रमाणपत्र देण्यात येईल तेव्हा समितीकडून मंजूरी मिळालेल्या प्रतिलेखाची अधिप्रमाणित प्रत अर्जदारालासुध्दा हस्तांतरित करण्यात यावी आणि त्याच वेळी, समितीने, मंजूर प्रतिलेख आणि दूरचित्रवाणी प्रसारण/ध्वनीक्षेपण यासाठींच्या साहित्याची/ इलेक्ट्रॉनिक प्रमाणित प्रत स्वत:कडे ठेऊन घ्यावी.

५. या सूचना, सर्व संबंधित आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या राज्य शाखांसह आपल्या राज्यातील, राजकीय पक्ष यांच्या निदर्शनास आणून देता येतील.

आपला विश्वासू,

( आर.के.श्रीवास्तव )
सचिव

प्रत रवाना-

मान्यताप्राप्त सर्व राष्ट्रीय आणि राज्य राजकीय पक्षाचे अध्यक्ष आणि सचिव यांना.

**भारत निवडणूक आयोग**
**निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली — ११०००१**

क्र. ३ / ईआर / २००९ /एसडीआर दिनांक : १९ मार्च, २००९

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,
सर्व राज्ये / संघराज्ये क्षेत्रे,

**विषय : दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क आणि रेडिओवरील राजकीय स्वरुपाची जाहिरात.**

दिनांक १८ मार्च,२००९ च्या समक्रमांकाच्या पत्राच्या अनुषंगाने, दूरचित्रवाणी वाहिन्या / केबल नेटवर्क / रेडिओ यावरील राजकीय जाहिरातींच्या प्रमाणनाकरिता अर्जातील मजकुरांच्या संबंधात पुढील स्पष्टीकरण आयोग देत आहे :

(एक) कोणत्याही राष्ट्रीय पक्षाच्या केंद्रीय कार्यालयाच्या किंवा दिल्लीतील मुख्यालयासह राज्य पक्षाच्या बहुविध भाषेत (हिंदी / इंग्रजी आणि प्रादेशिक भाषेमध्ये ) तशाच जाहिरातीचे प्रमाणन मागवण्यात आले असेल तर प्रत्येक भाषेतील जाहिरात लेखन सामग्री प्रतिलेखन प्रमाणनाबरोबर मुख्य निवडणुक अधिकारी दिल्ली या कार्यालयात समितीला सादर करण्यात यावे. याशिवाय , अशा प्रकरणांमध्ये हिंदी व इंग्रजी मधील जाहिरातीचे प्रादेशिक भाषेतील जाहिरातीमध्ये केलेले भाषांतर खरे असल्याबाबतचे न्यायालयात यथोचितरित्या कथन केलेले शपथपत्र देखील सादर करावे आणि त्यात असलेल्या कोणत्याही चुकीकरीता अर्जदार जबाबदार असेल.

(दोन) जर कोणत्याही राष्ट्रीय पक्षाने केंद्रीय कार्यालयाच्या किंवा दिल्लीतील मुख्यालयासह राज्य पक्षाने, कोणत्याही प्रादेशिक भाषेतील जाहिरातीचे (जाहिरातीच्या तेथील कोणत्याही हिंदी / इंग्रजी भाषांतरीशिवाय ), प्रमाणन मागण्याची इच्छा व्यक्त केल्यास राज्याशी संबंधित असलेल्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयातील समितीकडे प्रमाणन देण्यासाठीचा अर्ज सादर करता येईल.

(दो) राष्ट्रीय पक्षाच्या केंद्रीय कार्यालय आणि दिल्लीतील मुख्यालयासह राज्य पक्षाने अर्ज केल्यावर, मुख्य कार्यकारी अधिकारी, दिल्ली यांच्या कार्यालयातील समितीने दूरदर्शनवर / नभोवाणीवर प्रक्षेपित करण्याकरिता प्रमाणित केलेली कोणतीही जाहिरात, सर्व राज्ये आणि संघराज्य क्षेत्रांमध्ये भारतभर सर्वत्र दूरदर्शनवर / नभोवाणीवर प्रक्षेपित करण्यासाठी ग्राहय असेल. इतर राज्यातील समितीकडून अशा प्रकरणांच्या बाबतीत स्वतंत्र प्रमाणनाची आवश्यकता असणार नाही. तथापि, पक्षांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे, दिल्लीतील समितीकडून मिळविण्यात आलेली प्रमाणपत्राची एक प्रत सादर करावी. ज्यायोगे अशा जाहिराती दूरदर्शनवर/

नभोवाणीवर प्रक्षेपित करण्यासाठी प्रस्तावित करता येतील. दिल्लीतील समितीकडून निर्गमित केलेली प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रतिज्ञापनासह सादर करण्यात यावी आणि दूरदर्शन/नभोवाणीवर ही जाहिरात प्रक्षेपित करण्यापूर्वी राज्यातील संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला सादर करण्यात यावी.

२. वरील स्पष्टीकरण, राज्यातील सर्व प्राधिकरणांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. सदर प्रत ही मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयातील या प्रयोजनाकरिता बचाव समितीच्या कार्यासाठी देण्यात यावी.

आपला विश्वासू,

( के.एफ.विस्फ्रेड )
सचिव

प्रत माहितीसाठी : सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आणि समाजवादी पक्ष, जम्मू आणि काश्मिर राष्ट्रीय पँथर पक्ष, जनता दल (सेक्युलर) आणि जनता दल (युनायटेड), लोक जन शक्ती पक्ष आणि ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक.

**भारत निवडणूक आयोग**
**निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली — १०० ००१**

क्रमांक : ४९१/२०१० दिनांक ८ जून, २०१०

प्रति,
मुख्य निवडणूक अधिकारी
सर्व राज्ये आणि संघराज्ये

**विषय :- निवडणूक काळात "पेड न्यूज" म्हणजेच माध्यमातील विशिष्ट प्रकारच्या बातम्यांची जाहिरात तपासण्यासाठी उपाययोजना**

महोदय/महोदया,

उदधृत केलेल्या विषयावर तुमचे लक्ष वेधण्याचा मी निदेश देत आहे आणि आणखी असेही सांगत आहे की, "पेड न्यूज" च्या चालु घटना ज्या निवडणूकविषयक गंभीर गैरप्रकारांच्या संबंधात धोक्याचा इशारा देण्याच्या प्रमाणात असून या निवडणूका मुक्त व निर्भय वातावरणात घेण्याच्या संबंधात आयोगास काळजीचे कारण वाटत आहे. अनेक राजकीय पक्षांनी आणि प्रसारमाध्यम गटांनी त्याबाबतच्या चिंता आयोगाकडे व्यक्त केल्या आहेत. तेथील विविध व्यासपीठांवरुन आयोगाच्या अनेक हितसंबंधकांनी याबाबतचे मत व्यक्त केले आहे. आणि असे गैरप्रकार रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी मतैक्य झाले आहे. जे मुक्तपणे मतदान करणाऱ्या मतदारांवर अवाजवी दडपण आणतात, वेगवेगळया पध्दतीचा वापर करुन पैसे घेण्यासाठी प्रोत्साहन देतात आणि निवडणूक मतदान चालू असलेल्या ठिकाणाचे वातावरण बिघडवतात (शांतता भंग करतात ). पेड न्यूजची प्रथा लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ आणि १२३ (६) च्या तरतुदीपेक्षा वरचढ होण्याचा प्रयत्न करते. ज्यामुळे निवडणूक खर्चाची विहित आकडेवारी आणि निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा आणि अशी विहित केलेली मर्यादा वाढवतात तेव्हा निवडणूकीतीत भ्रष्ट प्रथेला खतपाणी घालण्याचा प्रयत्न ते करतात.

२. आयोगाने निदेश दिले आहेत की, कायद्याच्या विद्यमान तरतुदींचा वापर करुन अधिकाधिक दक्षता घेण्यात आल्याचे दिसून येईल, अशातऱ्हेने निवडणूकांच्या संदर्भात मुद्रण व इलेक्ट्रॉनिक माध्यमातील " पेड न्यूज " किंवा त्याच्या ऐवजी दूसरी जाहिरात प्रसिध्द करणाऱ्याला अव्टा करण्यात येत असते. " पेड न्यूज " ची प्रकरणे सर्वसाधारणपणे विशेषत: उमेदवार किंवा त्यांच्या पक्षाची स्तुती करण्याच्या संबंधात/ बातम्याच्या स्वरुपात किंवा अहवालाच्या स्वरुपात किंवा विरोधकांना बट्टा लावणाऱ्या बातम्यांच्या किंवा अहवालाच्या स्वरुपातील या दोन्ही जाहिरातीचा उद्देश हा मतदारांवर उगाचच प्रभाव पाडणे हा असतो. अशी बातमी प्रकाशन हे, उमेदवार/ पक्ष व वर्तमानपत्रांचे संपादक, प्रकाशक, वित्तपूरवठादार इ. च्या संगनमताचा परिणाम असू शकतो याचा परिस्थितीजन्य पुरावा म्हणून एकापेक्षा अधिक वर्तमानपत्रात नियतकालिकात येणाऱ्या त्याच किंवा त्याच प्रकारच्या बातम्या लेख/ वार्ताकन ( वृत्तपत्रसजावट( कॉस्मेटिक) फेरबदलांसह

) आणखी बळकट करतील.  तसेच, सर्वसाधारणपणे रोख रकमेच्या किंवा इतर प्रकारच्या स्वरुपातील रकमेचा देवाण-घेवाण (व्यवहार) पुरावा मिळत नाही.

३. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२७अ अन्वये कायदेशीर तरतूदीमध्ये प्रकाशकाला निवडणूक जाहिरात, पत्रक इ. वर प्रकाशकाचे स्वत:चे व मुद्रकाचे नाव आणि त्याच्या पत्ता छापणे अनिवार्य आहे आणि तसे न केल्यास दंड म्हणून दोन वर्षापर्यंतची कैद आणि/किंवा रु.२०००/- इतका दंड होऊ शकतो. भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ह नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या प्राधिकाराशिवाय इतर गोष्टीबरोबर, जाहिरात यांवर खर्च करण्यात मनाई करण्यात आली आहे. याबाबतीतील आयोगाच्या स्पष्ट सूचना क्र. ३/९/२००७/जेएस- दोन दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ मध्ये पाहता येतील. ( प्रत सोबत जोडजी आहे ) उक्त सूचनेमध्ये वृत्तपत्र इत्यादीमध्ये समाविष्ठ असलेली जाहिरात म्हणून ती घोषित केलेली किंवा विनिर्दिष्ट केलेल्या जाहिरातीचा समावेश असेल आणि अशा जाहिरातीसाठी रक्कम चुकती केल्याचे उघड झाले, परंतु " पेड न्युज " / त्या बदली न्यूजच्या प्रकरणात क्वचितच केवळ जाहिरातीच्या प्रयोजनासाठी बातमी म्हणून बाब क्वचितच उघड होत असली तरी, जाहिरातीचा उपयोगात आणण्याचा हेतू मात्र दडविला जातो. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२७ अ (१) च्या प्रयोजनार्थ " निवडणूक पत्रक किंवा पोस्टर" म्हणजेच कोणतीही मुद्रित पत्रक, हस्तपत्रके किंवा इतर कागदपत्रे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला किंवा उमेदवारांच्या गटाचे प्रचालन करण्यासाठी किंवा मतदारांच्या मनात त्यांच्याविषयी पूर्वग्रह दुषित करण्यासाठी वाटप केली जातात. "अशा प्रकारे "पेड न्यूज " सुध्दा " इतर कागदपत्रे " या प्रकारात मोडणाऱ्या "निवडणूक पत्रक व पोस्टर" यांमध्ये समावेश करण्यात यावे आणि त्यानुसार त्यावर कारवाई करण्यात यावी. तथापि, मुद्रित माध्यमात छापलेल्या बातमीतील खरेपणा/ विशिष्ट उमेदवाराला किंवा पक्षाला पूर्वग्रहदूषित त्याचा होणारा फायदा इतर उमेदवाराला व पक्षाला करण्याच्या कारणांची तपासणी करणे आवश्यक असेल.

४. वरील अन्वयेषणाच्या प्रयोजनार्थ आयोग असे निदेश देते की, निवडणूक कालावधीत बातम्याच्या जथ्यात बातम्यांचे वृत्तांकन करताना राजकीय जाहिरातीचा शोध घेण्यासाठी, प्रकाशित झालेल्या किंवा जिल्ह्यात सर्वत्र जाणाऱ्या सर्व बातमी पत्राची अचूक छाननी करणाऱ्यासाठी निवडणूकीनंतर लगेचच प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून जिल्हा स्तरीय समितीची स्थापना करण्यात यावी. बातम्याच्या स्वरुपातील बदली जाहिरातीच्या अंतर्भावासह कोणत्याही स्वरुपातील मुद्रित प्रसार माध्यमात देण्यात आलेला जाहिरातीनंतर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचे स्पष्ट नियत्रंण असावे, आणि निवडणुकांचे आव्हान करण्यात आले असेल तेथे उमेदवार/ राजकिय पक्षाला नोटीस बजावावे, अशा तऱ्हेने त्यावर करण्यात आलेला खर्च, संबंधित उमेदवार/ पक्षाच्या लेख्यात यथोचितरीत्या दाखवण्यात यावा.

५. त्याबरोबर जिल्हा समितीने, जिल्ह्यातील इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांवर प्रक्षेपित होणाऱ्या निवडणूक विषयक बातम्या/ ठळक वैशिष्ठ्य इत्यादीच्या संबंधात देखील लक्ष ठेवावे. दूरदर्शन/ रेडिओ चॅनेलवरील उमेदवाराचे भाषण/कार्यक्रम प्रमाणहीन असेल तेव्हा मतदारावर आणखी काही प्रमाणात विशिष्ट उमेदवारांच्या बाबतील निवडणूकीवर त्याचा प्रभाव पडू शकतो आणि तिच बातमी अन्य चॅनेलवर दिसत असेल तर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांने उमेदवारस त्याच्या वृत्तांकनास जाहिरात का समजण्यात येऊ

नये या बाबतची त्याची भूमिका स्पष्ट करण्यासाठी नोटीसही बजावण्यात यावी आणि सदर प्रकरण आयोगास कळवण्यात यावे.

६. एस.एल.बी. (सी) क्र. ६६७/२००४, ( माहिती व प्रसारण मंत्रालय विरुध्द/ मेसर्स जेमिनी टीव्ही प्रायव्हेट मर्या. आणि इतर ) या प्रकरणाचा भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या परिणाम स्वरूप आयोगाने यापूर्वीच १५ एप्रिल २००४ रोजी आदेश क्र.५०९ / ७५ / २००४ / जे.एस. – आय जारी केला आहे, ज्यात स्वतंत्र निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांच्याद्वारे देण्यात येणाऱ्या सर्व जाहिराती इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांत दाखल करण्यापूर्वी त्याअगोदर पाहणे त्यांची छाननी करणे आणि त्यांची पडताळणी करणे यासाठी समिती स्थापन करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. राजकीय आशयाच्या जाहिराती असून सुध्दा उपरोक्त पैशाच्या मोबदल्यातील बातम्यांच्या ( पेड न्यूज ) संबंधातील या घटना, समितीच्या छाननीतून पार होतात आणि तसेच उमेदवाराच्या खर्च पुस्तिकेतही त्याची नोद ( समावेश) करण्यास टाळाटाळ केली जाते. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी या समितीना बळकट बनवले पाहिजे जेणे करुन इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांमधील बातम्यांची सुध्दा छाननी होऊ शकेल, ज्यात राजकिय जाहिरात म्हणून ती दिसून येत नसली तरीही त्यात राजकीय जाहिरातीची छटा असते. अशा समितीच्या शिफारशी अनुसार मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी उमेदवारांना/ पक्षांना नोटिस जारी करव्यात.

७. उपरोक्त प्रमाणे पक्षांना/ उमेदवारांना बजावण्यात आलेल्या नोटिसांच्या सर्व प्रकरणांची माहिती आयोगाला देण्यात यावी .

८. पत्र मिळाल्यावर या पत्राची पोच देण्यात यावी आणि करण्यात आलेल्या कारवाईची माहिती आयोगास देण्यात यावी.

आपला विश्वासू,

**( तापस कुमार )**
**प्रधान सचिव**

**भारत निवडणूक आयोग**
**निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली — ११० ००१**

क्र. ४९१/प्रसार माध्यम धोरण-२०१० दिनांक : २३ सप्टेंबर २०१०

प्रति,

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय :- निवडणुकी दरम्यान (पेड न्यूजवर) म्हणजेच लक्ष ठेवण्यासाठी उपाययोजना प्रसारमाध्यमावरील बातम्यांमधील जाहिरातीवर लक्ष ठेवणे.**

उल्लेख केलेल्या विषया वरील, दिनांक ८ जून, २०१० च्या आयोगाच्या पत्र क्र. . ४९१/प्रसार माध्यमे/२००९ च्या अनुषगांने, मी येथे दिनांक ३० जुलै, २०१० च्या प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया क्र. पीआर/२/११ च्या अहवालची प्रत पाठवत आहे.

२. अहवालातील पुढील भाग विशेष लक्ष वेधण्यासाठी आणि आवश्यक कारवाईसाठी आहे :

( क.) प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया पेड न्यूजची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे- “ कोणत्याही प्रसारमाध्यमात ( मुद्रित व इलेक्ट्रॉनिक ) पैशाच्या मोबदल्यात किंवा वस्तूच्या मोबदल्यात प्रसिध्द होणारी कोणतीही बातमी किंवा विश्लेषण”

ख. ) पत्रासोबत जोडलेल्या अहवालाच्या पृष्ठ क्रमांक ८ ते १० मध्ये परिषदेने आपली स्वत:ची १९९६ ची मार्गदर्शक तत्वे उदधृत केली आहेत. मार्गदर्शक तत्त्वाचा परिच्छेद १ असे निर्देशित करतो की, “अयोग्य निवडणूक प्रचार मोहिमांत गुंतणे, एखाद्या उमेदवार/पक्ष/ किंवा निवडणूकी दरम्यानच्या घटना या संदर्भात अतिशयोक्तीपूर्ण अहवाल देणे या गोष्टीत वृत्तपत्रांनी सहभागी होणे अपेक्षित नसते प्रत्यक्ष प्रचार माहिमेवरील वृत्त सादर करताना, उमेदवाराने मांडलेला एखादा महत्वाचा मुद्दा आणि त्याच्या किंवा तिच्या विरोधकावर केलेला प्रति हल्ला, याबाबतची कोणतीही गोष्ट वृत्तपत्राने सोडून देता कामा नये “ त्याचप्रमाण, परिच्छेद ५ विशेष करून निर्देशित करतो की, “ वृत्तपत्राने एखाद्या विशिष्ठ उमेदवाराच्या/ पक्षाच्या प्रचारात गुंतणे अपेक्षित नाही, जर ते तशाप्रकारे गुंततील तर वृत्तपत्रांनी दुसऱ्या उमेदवार/ पक्षाला सुध्दा उत्तर द्यायचा हक्क म्हणून मूभा द्यायला हवी ” अशाप्रकारे उपरोक्त मार्गदर्शक तत्त्वांपेक्षा कोणतीही वेगळी कृती, ( कोणतेही विचलन) ही मोबदल्याचा बदल्यातील बातमीचे ( पेड न्यूजचे ) प्रथमदर्शनी तपास करावयाचे प्रकरण बनू शकेल.

३. अहवालाचा इतर भाग माहिती साठी आहे. कोणतीही असलल्यास आयोगाद्वारे विनिर्दीष्ट कार्यवाही करण्यात येईल.

४.		निवडणूक कालावधी मध्ये मोबदल्याचा बदल्यातील बातम्यांच्या (पेड न्यूजचे) छाननीसाठी घटीत करण्यात येणारी जिल्हा समिती पुढील अधिकाऱ्यांची मिळून बनलेली असेल.

( एक )	जिल्हा निवडणूक अधिकारी/ उप जिल्हा निवडणूक अधिकारी

( दोन )	जिल्हा निर्वाचन

( तीन )	केंद्रसरकारच्या माहिती व प्रसारण (एम.बी.) मंत्रालयातील अधिकारी ( जिल्ह्यात कोणताही असल्यास)

( चार )	पीसीआयने ( प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाने ) शिफारस केल्याप्रमाणे स्वतंत्र नागरिक/ पत्रकार.

५.		दिनांक ०८ जून, २०१० रोजी जारी करण्यात आलेल्या पत्राद्वारे देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषगांने उपरोक्त समिती पूरक मार्गदर्शक तत्त्वे म्हणून त्या नोंद घेईल आणि त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

आपला विश्वासू,

( तापस कुमार )
प्रधान सचिव.

**प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया**

**पेड न्यूजवरील अहवाल**

(भारतीय वृत्तपत्र परिषदेकडून प्राप्त झालेले पत्र पहा क्र.१७/७/०९-१०, दिनांक १६ ऑगस्ट, २०१०)

दिनांक : ३०.७.२०१०

"पेड न्यूज" या संकल्पनेला विशेष असे स्थान प्राप्त झाले आहे. आज ही बाब, वैयक्तिक पत्रकार व प्रसारमाध्यम कंपन्या यांच्या भ्रष्टाचाराच्या पलिकडे गेली आहे व ती बाब व्यापक रचनात्मक व मोठ्या प्रमाणावर संघटीत झाली आहे. या प्रक्रियेमुळे भारतीय लोकशाही धोक्यात आलेली आहे. यामुळे राजकीय नेते, विचारवंत, पत्रकार आणि प्रसारमाध्यमांचे मालक यांच्यासह समाजाच्या प्रमुख घटकांना मनस्ताप होत आहे. या सर्वांनी अशा गैरव्यवहारांच्या घातक परिणामांबद्दल आपली नाखुषी व चिंता व्यक्त केली आहे. दिवंगत श्री.प्रभाश जोशी, श्री.अजित भट्टाचारजी, श्री.बी.जी.वर्गिस आणि श्री.कुलदीप नायर यांसह अनेक मुरब्बी पत्रकारांची अशी इच्छा होती की, भारतीय वृत्तपत्र परिषदेने या बाबींवर लक्ष केंद्रित करावे व "पेड न्यूज" या संकल्पनेस कशारीतीने पायबंद घातला जाऊ शकेल याबाबत सूचना द्याव्यात. आंध्र प्रदेश कार्यकारी पत्रकार संघटना आणि दिल्ली पत्रकार संघटना यांसह निरनिराळ्या पत्रकारांच्या संघटनांनी या संकल्पनेची तपासणी केली, त्याबाबत सर्वेक्षण केले व या विषयावर चर्चा आयोजित केल्यात. भारतीय संपादक संघानेदेखील या संकल्पनेवर चर्चा केली आहे आणि या वाढत्या प्रवृत्तीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. दिनांक ८ जून, २०१० रोजी भारताच्या निवडणूक आयोगाने, निवडणूकांपूर्वी "पेड न्यूज" म्हणजेच बातम्यांच्या स्वरुपात जाहिरात करणे याबाबतची तपासणी करण्यासाठीच्या उपाययोजनांच्या संबंधात सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसाठी तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केलीत.

"राजकीय पेड न्यूज" ही संकल्पना, २००९ च्या सार्वत्रिक निवडणूकांत व त्यानंतरच्या निरनिराळ्या राज्यांतील विधानसभांच्या निवडणूकांत विशेषत: लक्षणियरीत्या दिसून आली. या संकल्पनेस निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांवरील "राजकीय बातम्या" व "बातम्या देणे" यासंबंधात पुर्ननिश्चिती करण्याद्वारे एक नवीन व आणखी विघातक स्वरुप प्राप्त झाले. असे अनेक " बातम्यांचे अहवाल" हे कदाचित आर्थिक व्यवहार घडवून आल्यानंतरच केवळ एखाद्या गुप्तरीतीने बहुधा नेहमीच प्रसिध्द केले गेलेत किंवा प्रसारित केले गेलेत. मोठया प्रमाणात असा समज आहे की, प्रसारमाध्यमे कंपन्या, त्यांच्या व्यवसायाचे आकारमान आणि त्यांचा कायदेशीरपणा लक्षात न घेता, जाहीरातदार असलेली राजकारणी मंडळी व निगम निकायांचे प्रतिनिधी यांच्याशी सलोखा झाल्यावर बातम्यांच्या जागेची विक्री करीत होते. "बातम्या" म्हणून बतावणी करुन प्रकाशनामधील जागा व आकाशवाणीवरील वेळ जाहिरातीद्वारे बळकवण्यात आली आहे.

बातमी ही, वस्तुनिष्ठ, उचित व तटस्थ असावी - ही बाब, निगम-निकाय,सरकारे, संघटना किंवा व्यक्ती यांच्याकडून प्रदान झाले आहे अशा जाहिरातींमधून माहिती देणे आणि मत व्यक्त करणे यांपासून वेगळी आहे. जेव्हा बातम्या व जाहिराती यांतील विभेद पुसट होत जातो जेव्हा, पैसे दिले आहेत अशा बातम्या म्हणून दिलेल्या जाहिराती दुप्पट होतात किंवा जेव्हा अग्रलेखांच्या जागांच्या विक्रीद्वारे एखाद्या विशिष्ट राजकारणी व्यक्तीच्या नावे "बातमी" प्रसिध्द केली जाते तेव्हा काय घडते?

अशा परिस्थितीत, वाचक किंवा दर्शक यांचा एखादा वर्ग हा, बातम्या अहवाल व जाहिराती/ माहिती पूर्ण जाहिराती (ॲडव्हरटोरिअल्स) यांच्यात क्वचित फरक करु शकतो. विपणन कार्यकारी अधिकारी हे, राजकीय व्यक्तींशी संपर्क साधण्यासाठी स्वेच्छेने किंवा अन्यथा पत्रकारांच्या सेवेचा वापर करतात. तथाकथित दर पत्रके किंवा एकत्रित प्रस्ताव वितरित केले जातात त्यात नेहमीच बातम्यांच्या बाबींच्या प्रसिध्दीच्या दराचा समावेश असतो आणि अशा बाबींमध्ये केवळ विशिष्ट उमेदवारांची स्तुतीच केलेली नसते तर त्यांच्या राजकीय विरोधकांवर टीकादेखील केलेली असते. जे उमेदवार, प्रसारमाध्यम संघटनांच्यावतीने अशा प्रथांचा अंगिकार करीत नाहीत त्यांच्या बद्दलचे वार्तांकन केले जात नाही. भारतातील प्रसार माध्यमांच्या शाखा या इच्छा असो वा नसो, ज्या उच्च प्रथांबाबत नैतिकता स्वीकारल्याचे दांभिकपणे ढोंग करुन लोकशाही प्रक्रिया व मानके धोक्यात येतील अशा त-हेने राजकारणातील धन-शक्तीच्या वापरात वाढ होण्यास हातभार लावणा-या अशा प्रथांमध्ये सहभागी होतात व त्यात भूमिका बजावतात. यामुळे भारतातील केवळ लोकशाहीच धोक्यात आली आहे असे नाही तर त्यामुळे देशाच्या नावलौकिकासदेखील बट्टा लागला आहे.

एकाचवेळी वेगवेगळया लेखकांच्या नामपंक्ती (बायलाइन्स) धारण करण्यात चढाओढ असलेल्या प्रकाशनांमध्ये छायाचित्रे व ठळक मथळ्यासह समान लेख दिसून आले आहेत. विनिर्दिष्ट वृत्तपत्रांच्या एकाच पृष्ठावर, एकाच निवडणुकीत दोन्ही उमेदवार जिंकण्याची शक्यता असल्याचा दावा करणाऱ्या प्रतिस्पर्धी दोन्ही उमेदवारांची स्तुती करणारे लेख प्रसिध्द करण्यात आले आहेत. अशा बातमी अहवालांचे प्रकाशन करणे हे आर्थिक व्यवहारांमुळे भाग पडले किंवा तो अहवाल विशिष्ट व्यक्ती किंवा राजकीय पक्षांद्वारे पुरस्कृत करण्यात आला आहे. याबाबत कोणताही निर्देश करण्यात आलेला नाही. जेंव्हा पेड न्यूजच्या साधार आरोपांना परिस्थितीजन्य पुराव्यासह सामोरे जावे लागते तेव्हा, भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या व्यक्तींची नेहमीची प्रतिक्रिया ही अशी ढोंगीपणाची असते की, पुरावा हा, परिस्थितीजन्य स्वरुपाचा असल्यामुळे प्रतिकूल असे काहीही घडलेले नाही. राजकीय पक्ष तसेच प्रसारमाध्यमे संघटनांच्या प्रतिनिधींची नमुनेदार प्रतिक्रिया म्हणजे हे आरोप सरसकटपणे अमान्य करणे ही आहे. तथापि, खाजगीमध्ये याच व्यक्ती असे कबूल करतात की, देशाच्या राजकीय क्षेत्रात पेडन्यूजचा कर्करोग खोलावर पसरला आहे आणि तो समूळ नष्ट करावयाची गरज आहे.

लोकशाही त्याचबरोबर भारताचे संविधान याच्या अनुच्छेद १९ मध्ये जतन केलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार यांना पेडन्यूजमुळे होणाऱ्या धोक्याची जाणीव होऊन दिनांक ९ जून,२००९ रोजी भारतीय वृत्तपत्र परिषदेने सदस्य आणि इतर यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर, मागील लोकसभा निवडणुकांच्या कालावधीत आढळून आलेल्या पेड न्यूजच्या घटनांची तपासणी करण्यासाठी श्री. परंजॉय गुहा थाकुर्ता व श्री.कालिनेकोलम श्रीनिवास रेड्डी यांचा समावेश असलेल्या एका उप समितीची नियुक्ती केली आहे. या दोन सदस्यांनी नवी दिल्ली, मुंबई व हैद्राबाद येथे समाजातील मध्यमवर्गीयांची भेट घेतली आणि परिषदेला पाठविण्यात आलेली अनेक पत्रे व निवेदने यांचा परामर्श घेतला. वृत्तपत्र परिषदेद्वारे इंदोर व नवी दिल्ली येथे अनुक्रमे दिनांक ३१ मार्च,२०१० आणि दिनांक २६ एप्रिल,२०१० रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन बैठकांमध्ये, सदर उप समितीच्या अहवालावर तपशीलवार चर्चा झाली. सदस्यांनी

अनेक सूचना दिल्या आणि त्यांनतर, भारतीय वृत्तपत्र परिषदेच्या अध्यक्षांनी, परिषदेच्या विचारार्थ अंतिम अहवाल तयार करण्यासाठी एका मसुदालेखन समितीची नियुक्ती केली. अध्यक्षांनी एक १२ सदस्य असलेल्या समितीची नियुक्ती केली असून त्यात श्री. एच.एन.कामा, ललित मंगोत्रा, यु.सी.शर्मा, वाय.सी.हलान, के. श्रीनिवास रेड्डी, कल्याण बरुआ, एस.एन.सिन्हा, अनिल जुगल, किशोर आगरवाल, कुंदन आर.एल. व्यास, परंजॉय गुहा थाकुर्ता, पी.जावडेकर आणि केशव राव यांचा समावेश होता.

सदर मसुदालेखन समितीने, वृत्तपत्र परिषदेच्या निरनिराळ्या बैठकांमध्ये व्यक्त केलेली मते विचारात घेतली आणि परिषदेने विचारार्थ ठेवण्याकरिता एक अहवाल तयार केला.

प्रस्तावना

**प्रतिकूल म्हणून रोखीच्या किंवा मूल्याच्या कोणत्याही प्रकाराने कोणत्याही प्रसार माध्यमात (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक) प्रसिध्द होणाऱ्या कोणत्याही बातम्या किंवा विश्लेषण अशी पेड न्यूजची व्याख्या करता येईल.**

पेड न्यूज ही एक गुंतागुंतीची घटना आहे आणि मागील सहा दशकांत तिचे वेगवेगळे प्रकार दिसून आले आहेत. यांमध्ये थेट पैसे देण्याऐवजी निरनिराळ्या प्रसंगी भेटवस्तू स्वीकारणे यापासून, विदेशातील व देशातील मेजवान्या, निरनिराळे आर्थिक आणि आर्थिकेतर लाभ यांचा समावेश आहे. भारतीय रोखे व विनिमय मंडळाद्वारे भारतीय वृत्तपत्र परिषदेच्या निदर्शनास आणून देण्यात आला आहे तो असा पेडन्यूजचा दुसरा प्रकार म्हणजे प्रसार माध्यमे कंपन्या व निगम निकाय यामध्ये झालेल्या खाजगी लेखी करार या स्वरुपाचा आहे. खाजगी लेखी करार हा, प्रसारमाध्यम कंपनी व इतर प्रसारमाध्यमेतर कंपनी यांच्यात झालेला एक औपचारिक करार आहे. तो करार म्हणजे जाहिरातीची जागा आणि अनुकूल वार्तांकन यांऐवजी, कंपनीचे विशिष्ट शेअर, प्रसारमाध्यम कंपनीला हस्तांतरित करण्याचे पत्र आहे.

पेडन्यूजची संकल्पना ही, जुनी, गुंतागुंतीची व व्यवस्थेत खोलवर रुजलेली असल्यामुळे आणि २००९ या वर्षीच्या निवडणुकांनंतर निदर्शनास आल्याप्रमाणे तिची पाळेमुळे कर्करोगासारखी शीघ्रपणे पसरत असल्याचे दिसल्याने मसुदा लेखन समितीला असे वाटते की, भारतीय वृत्तपत्र परिषदेने, मागील लोकसभा निवडणुकीत (२००९) दिसून आलेल्या पेड न्यूजवरच केवळ सुरुवातीला लक्ष केंद्रीत करावे. सचिवांपासून परिषद सदस्यांद्वारे कळवण्यात आल्यानुसार वृत्तपत्र परिषदेच्या निर्णयातून या निर्णयाचा उगम झाला आहे.

**निवडणुकीच्या कालावधीतील पेडन्यूज**

निवडणुकीच्या कालावधीतील पेड न्यूज संकल्पनेची तीन परिमाणे आहेत. पहिली बाब म्हणजे वाचक किंवा दर्शक यांना, ज्याला मत द्यावयाचे आहे किंवा ज्याच्या विरोधात मतदान करावयाचे अशा उमेदवाराचे व्यक्तिमत्व किंवा कार्य याबाबत अचूक माहिती मिळत नाही. यामुळे लोकशाहीचा मतितार्थ नष्ट होतो. दुसरी बाब अशी की, निवडणूक लढवणारे उमेदवार हे, लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५१ अन्वये भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे तयार करण्यात आलेल्या निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ यांचे उल्लंघन करुन, त्यांच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यात ही बाब कदाचित दर्शवत नाहीत. तिसरी बाब

म्हणजे, ज्यांना रोख रक्कम मिळाली आहे परंतु त्यांनी ही बाब त्यांच्या अधिकृत लेख्यांच्या विवरणपत्रात उघड केली नाही अशा वृत्तपत्रांनी व दूरदर्शन वाहिन्यांनी, इतर कायद्यांखेरीज कंपनी अधिनियम,१९५६ त्याचबरोबर आयकर अधिनियम,१९६१ यांचे उल्लंघन केले आहे.

निवडणुकीच्या कालावधीतील पेड न्यूजचे प्रदान व पावती हे एक गुप्त स्वरुपाचे कार्य आहे आणि जाहिरात एजन्सी, जनसंपर्क संस्था, राजकारणी व्यक्ती, पत्रकार, व्यवस्थापक यांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला असून ते संघटित झाले आहेत आणि काही प्रसारमाध्यम कंपन्यांचे मालक त्यात गुंतल्याचे मानले जाते. त्यामुळे व्यक्ती, पक्ष आणि संघटना यांवर जबाबदारी निश्चित केली असल्याचे सिध्द करणारा पुरावा शोधणे हे सहज शक्य नाही. तथापि, परिषदेने स्थापन केलेल्या उप समितीच्या सदस्यांसह बहुसंख्य व्यक्तींनी, वार्ताहार परिषदेच्या संबंधात मोठ्या प्रमाणावरील परिस्थितीजन्य पुरावा गोळा केला आहे त्यावरुन अनुकूल वार्तांकन, वृत्तांतलेखन व प्रसारण यांच्या बदल्यात आर्थिक मोबदला दिला गेल्याचे दिसून येते.

## संपादकीय व व्यवस्थापन वेगवेगळे करणे

उप समितीने संवाद साधलेल्या व्यक्तीच्या निरिक्षणांचा आणि त्यांनी सादर केलेल्या पुराव्यांचा आणि वृत्तपत्र परिषदेतील चर्चांचा विचार केला असता असे वाटते की, उमेदवार किंवा राजकीय पक्ष किंवा त्यांचे प्रतिनिधी आणि प्रसारमाध्यमे यांच्यात निवडणूक कालावधीत पेड न्यूज बाबतचे व्यवहार झाले आहेत. प्रसारमाध्यम कंपन्यांमधील संपादकीय कर्मचारीवर्ग आणि व्यवस्थापन कर्मचारी वर्ग यांच्यात सुस्पष्ट असे अंतर असावे आणि संपादकाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यातयावे सुरक्षित ठेवण्यात यावे असे वाटले होते.

## वृत्तपत्र परिषदेची भूमिका

भारतातील प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्याचे जतन करण्याच्या आणि वर्तमानपत्रे व वृत्त संस्थांचा दर्जा राखण्याच्या व त्यात सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी एक सांविधिक, अर्धन्यायिक संस्था म्हणून संसदेकडून भारतीय वृत्तपत्र परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. तथापि, तिच्याकडे समज देणे, ताशेरे ओढणे आणि प्रखर टिका करणे याबाबतचे केवळ मर्यादित अधिकार सोपवलेले आहेत. ती, चुकार किंवा गैरव्यवहारांमध्ये दोषी आढळणाऱ्यांना शिक्षा करु शकत नाही. शिवाय, परिषदेच्या महादेशाची व्याप्ती, मुद्रित माध्यमांच्या पलिकडे जाणारी नाही. परिषदेचे निर्देश बंधनकारक करण्यासाठी, वार्ताहर परिषद अधिनियम,१९७८ याच्या कलम १५ (४) मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. ते काम प्राथम्यक्रमाने हाती घ्यावयास हवे.

## लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५१

लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५१ च्या तरतुदीद्वारे केंद्राच्या आणि राज्यांच्या निवडणुकांचे विनियमन केले जाते. देशामध्ये मुक्त व नि:पक्षपणे निवडणुका होण्याची खात्री करणे, हा या अधिनियमाचा मुख्य हेतू आहे. म्हणून निवडणूक कालवधीतील "पेड न्यूज" मोबदल्यामुळे मुक्त व नि:पक्षपाती निवडणुका होण्यास धोका निर्माण झाल्यामुळे अशी शिफारस करण्यात आली आहे की, लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५१ याच्या

कलम १२३ मध्ये योग्यरीतीने सुधारणा करण्यात यावी, जेणेकरुन बातम्या प्रसिध्द करण्याकरिता दिलेले कोणतेही प्रदान भ्रष्ट व्यवहार किंवा एक निवडणूक विषयक गैरव्यवहार म्हणून घोषित करता येईल आणि तो एक दंडनीय अपराध ठरवला जाईल.

**प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया**

प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया पेडन्यूज घटनांच्या संबंधात एकतर स्वाधिकारे किंवा तक्रारी आल्यावर तपास करण्यासाठी राष्ट्रीय/राज्य/जिल्हा या स्तरांवरील व्यापक प्रतिनिधित्वासह माध्यम व्यावसायिकांची एक संस्था स्थापन करावी आणि अपील यंत्रणेने तपास केल्यानंतर भारताचा निवडणूक आयोग आणि इतर सरकारी प्राधिकरणांवर बंधनकारक असतील.

मुद्रणाच्या अस्वीकाराद्वारे जाहिरातीपासून बातम्या सुस्पष्टपणे वेगळ्या दर्शविण्याबाबतची प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची मार्गदर्शक तत्वे ही सर्व प्रकाशन संस्थांनी काटेकोरपणे अंमलात आणावीत. जेथवर बातमीचा संबंध आहे तेथवर, तिच्या सोबत नेहमी एक आभारपंक्ती असायला पाहिजे आणि बातमीचे अक्षर वळण अशा प्रकारे निश्चित करण्यात यावे की ती जाहिरातीपासून वेगळी दिसेल. १९९६ मध्ये ठरवण्यात आल्याप्रमाणे प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची मार्गदर्शक तत्वे येथे पुन्हा सादर केली आहेत आणि सर्व प्रसारमाध्यम संघटनांकडून त्यांचे पालन होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत.

एक) सार्वत्रिक निवडणूक ही, आपल्या लोकशाहीचे एक अत्यंत महत्वाचे वैशिष्ट आहे आणि प्रसारमाध्यमांनी निवडणूक क्षेत्रात निवडणूक लढविणाऱ्या पक्षांकडून होणाऱ्या निवडणूक प्रचाराचा योग्य व वस्तुनिष्ठ वृत्तांत प्रसारित करणे अत्यावश्यक आहे. प्रसारमाध्यमांनी स्वत:हून जबाबदारीची जाणीव ठेवण्यावर प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य हे, मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. म्हणून, निवडणूक प्रचाराच्या वस्तुनिष्ठ व योग्य वार्तांकनाच्या या तत्वास प्रसारमाध्यमांनी चिकटून राहणे आवश्यक आहे.

म्हणून, प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया निवडणुकांच्या दरम्यान प्रसारमाध्यमांनी अनुपालन करण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत :

१. निवडणुकाबद्दल आणि उमेदवारांबद्दल वस्तुनिष्ठ वृत्तांत देणे हे प्रसारमाध्यमांचे कर्तव्य असेल.

   निवडणुकांदरम्यान कोणताही उमेदवार/पक्ष किंवा घटने विषयी सदोष निवडणूक प्रचार, अतिशयोक्तिपूर्ण वार्तांकन यात वृत्तपत्रांनी सहभागी होणे अपेक्षित नाही. प्रत्यक्षात, दोन किंवा तीन अतिनिकटचे प्रतिस्पर्धी उमेदवार हे, सर्व प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेतात. प्रत्यक्ष प्रचाराचे वार्तांकन करताना एखाद्या वृत्तपत्राने, एखाद्या उमेदवाराने उपस्थित केलेला कोणताही महत्त्वाचा मुद्दा आणि त्याच्या किंवा/तिच्या प्रतिस्पर्ध्यावर केलेली कडक टीका या बाबी सोडून देऊ नये.

२. निवडणूक नियमांअन्वये वर्ण अथवा जातीय आधारावर प्रचार करण्यास बंदी आहे. म्हणून, प्रसारमाध्यमांनी धर्म, वंश, जात, जमात किंवा भाषा यांच्या आधारावर लोकांमध्ये आपसात शत्रुत्वाची किंवा द्वेषभावना पसरविण्याचा संभव असणारे वृत्त देणे टाळावे.

३. प्रसारमाध्यमांनी, कोणत्याही उमेदवाराचे वैयक्तिक चारित्र्य किंवा वागणूक किंवा कोणत्याही उमेदवाराच्या किंवा त्याच्या उमेदवारीच्या किंवा त्याच्या उमेदवारी परत घेण्याच्या संबंधात निवडणुकांमध्ये त्या उमेदवाराच्या भवितव्याला बाध पोहचेल अशा प्रकारच्या खोट्या अथवा गंभीर विधानांना प्रसिध्दी देण्यापासून दूर रहावे. प्रसारमाध्यमांनी कोणताही उमेदवार /पक्ष यांच्या विरुध्दची शहानिशा न केलेले आरोप प्रसिध्द करु नये.

४. प्रसारमाध्यमांनी एखादा उमेदवार/पक्ष यास पुढे आणण्याकरिता आर्थिक किंवा इतर प्रकारे कोणत्याही तऱ्हेचे प्रलोभन स्वीकारु नये कोणताही उमेदवार/पक्ष यांचेकडून किंवा त्यांच्यावतीने देऊ केलेले कोणतेही आतिथ्य किंवा इतर सुविधा यांचा स्वीकार करु नये.

५. प्रसारमाध्यमांनी कोणताही विशिष्ट उमेदवार/पक्ष यांच्या प्रसारास वाव देणे अपेक्षित नाही. जर तसे करावयाचे झाल्यास इतर उमेदवार/पक्ष यांना त्यावर उत्तर देण्याची मुभा देण्यात यावी.

६. प्रसारमाध्यमांनी एखादा सत्ताधारी पक्ष/शासन यांच्या कारागिरीसंबंधातील सरकारी राज्य कोषातील खर्चाने दिलेली कोणतीही जाहिरात स्वीकारु नये/प्रसिध्द करु नये.

७. वृत्तपत्रे, निवडणूक आयोगने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी किंवा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी वेळोवेळी काढलेल्या निदेशांचे/ आदेशांचे/ अनुदेशांचे पालन करतील.

**दोन ) मतदान पूर्व आणि मतदानोत्तर सर्वेक्षण, १९९६ बाबतची मार्गदर्शक तत्वे.**

मतदान पूर्व सर्वेक्षणांच्या इष्टतेच्या किंवा अन्यथा निकषाच्या प्रसिध्दीच्या प्रश्नावर आणि त्यामुळे साध्य होणारा हेतूबाबत विचार केल्यावर तो भारतीय वृत्तपत्र परिषदेचे असे मत बनले आहे की, वृत्तपत्रांनी त्यांचा मंच निवडणुकांचा विपर्यास आणि त्यात ढवळाढवळ करण्याकरिता वापरावयासाठी देऊ नये आणि हितसंबंधित राजकीय पक्षांद्वारे स्वत:चे शोषण होऊ देऊ नये.

१. म्हणून, आपल्या सारख्या प्रतिनिधीक लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियचे निर्णायक स्थान लक्षात घेता, वृत्तपत्र परिषदेने असा सल्ला दिला आहे आहे की, वृत्तपत्रांनी, आपल्या बहुमूल्य मंचाचा वापर निवडणुकांचा विपर्यास आणि त्यात ढवळाढवळ करण्यासाठी केला जाऊ नये म्हणून खबरदारी घ्यावी. आजकाल यावर भर देणे आवश्यक झाले आहे. कारण, अनभिज्ञ मतदारांची जातीयवादी, धार्मिक आणि मानववंशीय आधारावरील हेतूपुरस्सर किंवा अनाहूतपणे करण्यात येणाऱ्या प्रचाराद्वारे, त्याचप्रमाणे कथित मतदानपूर्व सर्वेक्षणासारख्या सुसभ्य मार्गांनी दिशाभूत करण्यासाठी आणि त्यांचा गैरसमज निर्माण करण्यासाठी हितसंबंधित व्यक्ती आणि गटांद्वारे मुद्रित प्रसार माध्यमांचा मोठया प्रमाणात गैरवापर करण्याचा प्रयत्न होऊ शकेल. दरम्यान ब-याच प्रकरणांत जातीयवादी आणि राजद्रोहात्मक प्रचारचा शोध लावणे अवघड नसते.परंतु काही वेळा बुध्दिपुरस्सरपणे नियोजनबध्द रीतीने मतदानपूर्व सर्वेक्षणाचा हा हेतूपुरस्सर करण्यात आलेला वापर उघड करणे सोपे नसते. म्हणून, वृत्तपत्र परिषद असे सुचविते की, जेव्हा केव्हा वर्तमानपत्र मतदान पूर्व सर्वेक्षणास प्रसिध्दी देतील तेव्हा असे सर्वेक्षण करणारी संस्था, व्यक्ती आणि संघटना ज्यांनी असे सर्वेक्षण करावयास सांगितले. निवडण्यात आलेल्या नमुन्याचा आकार आणि स्वरुप, निष्कर्ष काढण्यासाठी नमुने निवडण्यासाठी वापरण्यात आलेली पध्दत आणि निष्कर्षांतील संभाव्य चुकांची शक्यता या सर्व गोष्टींचा ठळक उल्लेख करुन त्या सोबत प्रास्ताविक जोडण्याची काळजी त्यांनी घ्यावी.

२. तसेच मागे पुढे मतदानाच्या तारखा असताना ज्याप्रसंगी प्रसारमाध्यमे आधी घेण्यात आलेल्या मतदानाच्या संदर्भात मतदानोत्तर सर्वेक्षण करतात असे दिसून येते. यामुळे अजून येथे मतदान घ्यायचे आहे अशा ठिकाणच्या मतदारांवर याचा परिणाम होऊ शकतो. निवडणुकीची प्रक्रिया शुध्द राहील हे सुनिश्चित करण्यासाठी आणि कोणत्याही बाह्य घटकांमुळे मतदारांच्या मनावर प्रभाव पडू नये या दृष्टीने हे आवश्यक आहे की, प्रसार माध्यमांनी शेवटचे मतदान होईपर्यंत मतदानोत्तर सर्वेक्षणास प्रसिध्दी देऊ नये.

३. म्हणून प्रेस कौन्सिल, वृत्तपत्रांना मतदानोत्तर जनमत आजमावण्याच्या संदर्भात पुढील मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याची विनंती करीत आहे:-

मार्गदर्शक तत्वे

मतदानोत्तर जनमत चाचणीत कितीही सत्यता असली तरीही कोणत्याही वृत्तपत्राने शेवटचे मतदान होईपर्यंत मतदानोत्तर जनमत चाचणी सर्वेक्षणास प्रसिध्दी देऊ नये.

**भारत निवडणूक आयोग**

निवडणुकांच्या रणधुमाळीत भारताच्या निवडणूक आयोगाने "पेड न्यूज" च्या संदर्भातील तक्रारी स्वीकरण्यासाठी एका विशेष कक्षाची स्थापना करावी आणि अशा तक्रारींच्या आधारे जीमुळे तात्काळ कारवाई करता येऊ शकेल अशी कार्यवाही हाती घ्यावी. वृत्तपत्र परिषदेशी चर्चा करुन भारताच्या निवडणूक आयोगाने स्वतंत्र पत्रकार/ नागरिक नामनिर्देशित करावा. तो भारताच्या निवडणूक आयोगाने विविध राज्यात आणि जिल्हयांत नेमलेल्या निरिक्षकाबरोबर राहील. अशा प्रकारे नामनिर्देशित केलेला पत्रकार/ नागरिक "पेड न्यूज" च्या घटना बाबत भारतीय वृत्तपत्र परिषद आणि भारताचा निवडणूक आयोग यांस अहवाल सादर करु शकेल.

**<u>स्वयं नियमन</u>**

"पेड न्यूज" च्या घटना रोखण्यासाठी स्वयं नियमन हा एक उत्तम पर्याय आहे. तथापि, स्वयं नियमन हा या समस्येवरील केवळ अंशत:च उपाय असू शकेल. कारण अशा अपराधी व्यक्ती नेहमीच असतीलच ज्यांनी कायद्याद्वारे अनिवार्य केलेली नाही अशी स्वेच्छा आचारसंहिता आणि नैतिक मानके यांचे पालन करण्यास नकार दिला आहे.

निवडणूका होण्याच्या ४८ तासांपूर्वी उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या प्रचाराशी संबंधित माहितीचे प्रसारण थांबविण्यासाठी दूरदर्शन वाहिन्याना मना करण्याच्या भारताचा सर्वोच्च न्यायालयाच्या निदेश मुद्रित माध्यमांपर्यंत वाढवता यावा आणि वाढविता येऊ शकतो किंवा कसे, या बाबत सर्व संबंधित हितसंबंधित व्यक्तीमध्ये आपसात चर्चा घडवून आणावी. कारण, सद्यस्थितीत असा कोणताही निर्बंध प्रसारमाध्यमांच्या या वर्गाला लागू केलेला नाही.

**<u>शिक्षण</u>**

परिषदेने असे सुचविले आहे की, मतदारांना बनावट वृत्तांकन आणि संयत व न्याय वृत्तांकन यांमध्ये भेद करण्यास मतदारांना शिक्षित करण्याचे प्रयतन करण्यात यावेत. हे काम भारतीय वृत्तपत्र परिषद, पत्रकार व वृत्तपत्रांचे मालक यांच्या विविध संघटनांच्या सहाय्याने माहिती व प्रसारण मंत्रालयाद्वारे पार पाडता येऊ शकते. वाचक आणि दर्शक यांना शिक्षित करण्यासाठी विविध शहरामध्ये चर्चासत्रे आणि

कार्यशाळा आयोजित करुन स्थानिक प्रेस क्लबांना सुध्दा यात सहभागी करुन घेता येईल. अशी चर्चासत्रे आणि कार्यशाळा यांच्यासाठी भारतीय वृत्तपत्र परिषद, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, वृत्तपत्र मालकांची संघटना, दूरचित्रवाणीचे प्रसारक आणि पत्रकारांच्या युनियन आणि संघटना यांच्याकडून मनुष्यबळ पुरविले जाऊ शकते. मतदार आणि नागरिक यांना शिक्षित करण्याची प्रक्रिया, निवडणुकां होण्यापूर्वी निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर लगेचच सुरु करण्यात यावी.

**माहिती व प्रसारण मंत्रालय**

केंद्रिय माहिती व प्रसारण मंत्रालयाने या मुद्दयावर विचारविनिमय करण्यासाठी आणि विशेषकरुन "पेड न्यूज" च्या घटनांना पायबंद घालण्यासाठी व्यवहार्य उपाय शोधण्यासाठी इतरा- बरोबरच भारतीय वृत्तपत्र परिषद, भारताचा निवडणूक आयोग, संपादकांचे प्रतिनिधी, पत्रकारांचे संघ व संघटना, राजकीय पक्ष आणि प्रसारमाध्यमांचे मालक यांना सहभागी करुन, राष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा चर्चासत्रे आणि जागरुकता निर्माण करणाऱ्या मोहिमा आयोजित कराव्यात.

केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्र्यानी 'पेड न्यूज' च्या वस्तुस्थितीबाबत व त्यावर कशाप्रकारे नियंत्रण ठेवण्यात यावे याबाबत चर्चा करण्यासाठी वर्तमानपत्रांचे मालक, संपादक आणि पत्रकार यांच्या राष्ट्रीय संघटनेबरोबर स्वतंत्र्य बैठक घेतली पाहिजे 'पेड न्यूज'ची वस्तुस्थिती जर तपासली गेली नाही तर, त्याचा कोणत्याही राजकीय पक्षाला लाभ होणार नाही याची राजकीय पक्षाला माहिती व्हावी याकरिता सर्व राजकीय पक्षांची बैठक देखील आयोजित करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रसार माध्यम कंपन्यांनी याची जाणीव ठेवावी की, 'पेड न्यूज' पासून बेकायदेशीरपणे मिळणारी प्राप्ती अगदी अल्पकालीकच ठरत नाही तर, परिणामत: वाचकांमध्ये व दर्शकांमध्ये विश्वसनीयता कमी करण्यासाठी देखील कारणीभूत ठरेल आणि म्हणून प्रसार माध्यमाच्या हितास हानीकारक ठरेल.

**संसद**

वर्तमानपत्रांमधील आणि दूरदर्शन वाहिन्यांवरील वृत्त वार्तांकनासाठी पैसे देण्याच्या प्रथेला आळा घालण्याकरिता आणि अशी प्रथा "निवडणूक कुप्रथा" म्हणून किंवा भ्रष्टाचाराचे कृत्य म्हणून घोषित करण्यासाठी व तो शिक्षापात्र अपराध ठरण्यात यावा याकरिता दोन्ही सभागृहांमधील संसद सदस्यांच्या लघु समितीने लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५१ मध्ये बदल सुचविण्याकरिता सुनावणी घेतली पाहिजे.

हे सर्व उपक्रम प्रामाणिकपणे राबविले गेले तर, त्यामुळे भारतीय प्रसार माध्यमांमधील अशी कुप्रथा संपूर्णपणे जरी थांबविता येणार नाही तरी त्या घटनांच्या प्रमाणात लक्षणीयरित्या घट होऊ शकेल.

शिफारशी

शासनाकडून पुढील शिफारशींची अंमलबजावणी करण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे.

१) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यात "पेडन्यूजची घटना" ही शिक्षापात्र निवडणूक कुप्रथा घोषित करण्याकरिता सुधारणा करण्यात यावी,

२) ‘पेड न्यूज’’च्या तक्रारी अभिनिर्णीत करण्याकरिता आणि त्याबाबत अंतिम न्यायनिर्णय देण्याकरिता भारतीय वृत्तपत्र परिषदेला संपूर्ण अधिकार प्रदान केले गेले पाहिजेत,

३) वृत्तपत्र परिषदेने केलेल्या शिफारशी बंधनकारक करण्यासाठी आणि इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांना सदर परिषदेच्या कक्षेत आणण्यासाठी वृत्तपत्र परिषद अधिनियम सुधारण्यात यावा, आणि

४) इलेक्ट्रॉनिक व अन्य प्रसार माध्यमातील प्रतिनिधींना समाविष्ट करुन घेण्यासाठी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची पुनर्रचना करण्यात यावी.

**<u>तळटीप :-</u>**

प्रेस कौन्सिलने परिषदेने असा निर्णय घेतला आहे की, उपसमितीचा अहवाल परिषदेच्या अभिलेखावर संदर्भ दस्तऐवज म्हणून ठेवता येईल.

प्रेस कौन्सिलने असाही निर्णय घेतला आहे की, श्रमिक पत्रकार अधिनियम सक्षम करण्याचा मुद्दा स्वतंत्रपणे विचारात घेण्यात यावा.

**<u>विशेष संदेशवाहकाद्वारे</u>**

**<u>भारत निवडणूक आयोग</u>**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली -११०००१

-----------------------------------------------------------------------------------------

क्रमांक ३/१/२०११/एस डी आर दिनांक ३ फेब्रुवारी,२०११

प्रति,

मा.सचिव,
विधि व न्याय मंत्रालय,
विधायी विभाग,
शास्त्री भवन, नवी दिल्ली

**विषय : लोक प्रतिनिधित्व अधिनियम आणि निवडणूक घेण्याबाबत <u>नियम, १९६१ यांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव.</u>**

महोदय,

आयोगाने वेळोवेळी पाठविलेल्या कायद्याच्या सुधारणेसाठीच्या प्रस्तावानुसार हे पत्र पाठविण्यात येत आहे. आयोग पुढील बाबींच्या संबंधात देखील सुधारणा करण्यासाठी इच्छुक आहे.

(एक) उमेदवारांनी खोटी शपथपत्रे दाखल केल्याच्या तक्रारींच्या संबंधात लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२५ क मध्ये सूधारणा करणे;

(दोन) भ्रष्टाचारी प्रथा किंवा निवडणूक अपराध या प्रकरात ‘पेड न्यूज’ ची भर घालणे;

(तीन) निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा वाढविणे.

**<u>कलम १२५ क ची सुधारणा :</u>**

कलम १२५ क मध्ये नामनिर्देशन पत्र सादर करण्याच्या संबंधात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे उमेदवारांनी खोटी शपथपत्रे दाखल करण्यासाठीच्या शिक्षेकरिता तरतूद करण्यात आली आहे. या कलमात सहा महिन्यापर्यंत कारावासाची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्हीची तरतूद केली आहे. लोकसेवकाकडे खोटी माहिती सादर केल्यास तो देखील भारतीय दंड संहितेच्या कलम १७७ खालील सहा महिन्यापर्यंत कारावास किंवा एक हजार रुपयांचा दंड यांसह शिक्षापत्र अपराध आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियमामध्ये कोणी आणि कोणत्या प्राधिकरणांकडे खोटे शपथपत्र सादर केल्यासंबंधीची तक्रार दाखल करावयाची आहे याविषयी विनिर्देशपूर्वक नमूद केलेले नाही. फौजदारी दंड संहितेच्या कलम १९५ अन्वये, संबंधितलोकसेवकाच्या किंवा तो प्रशासकीय दृष्टीने दुय्यम आहे अशा एखाद्या लोकसेवकाच्या केवळ

लिखित तक्रारीवर (खोटी माहिती दाखल करण्यासाठी). न्यायालय कलम १७७ अन्वये अपराधाची दखल घेईल. या तरतुदी लक्षात घेता, आयोगाने दिनांक ०२-०६-२००४ रोजी परिपत्रक निर्गमित केले असून (प्रत जोडली आहे) त्यात असे निदेश आहेत की, जर कोणत्याही उमेदवारामार्फत खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासंबंधी जर कोणतीही तक्रार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल झाल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी प्रथमदर्शनी, तक्रारीच्या योग्यतेविषयी समाधानी झाल्यास, संबंधित उमेदवाराच्या विरोधात खटला दाखल करण्यासाठी दंडाधिकारी न्यायालयाकडे याचिका दाखल करावी.

<u>२.२</u> अलाहाबाद उच्च न्यायालय, लखनऊ खंडपीठातील याचिकेमध्ये (२००५ ची रिट याचिका क्रमांक ३९६९ डॉ. सुब्रमण्यम स्वामी विरुध्द भारताचा निवडणूक आयोग व इतर) याचिका खारीज करताना उच्च न्यायालयाने असे निरीखण केले होते की, निवडणूक झाल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी त्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी कार्याधिकारी होते. खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याच्या संबंधात काही तक्रार असल्यास, संबंधित उमेदवार उच्च न्यायालयाच्या उक्त निरीक्षणावर विसंबून राहतो आणि निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवाराचा विवाद देखील स्वीकारतो. अशा प्रकारे अशा तक्रारी निकाली काढण्यात येतात.

<u>२.३</u> आयोग अशी शिफारस करतो की, नामनिर्देशन पत्राच्या संबंधात उमेदवारांकडून दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये खोटे निवेदन केल्यासंबंधात निवडणुकीची तारीख जाहीर झाल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या कालावधीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर पुष्टी देणाऱ्या पुराव्यांसह तक्रारदाराकडून कोणतीही तक्रार दाखल झाल्यास कलम १२५ क अन्वये उक्त पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल आणि त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी ही निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असेल. या ठिकाणी पुन्हा स्मरण करावेसे वाटते की, आयोगाने, २००४ मध्ये पाठविलेल्या प्रस्तावांच्या संचात खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याबद्दलच्या शिक्षेला कमीतकमी दोन वर्षाचा कारावास इतकी वाढ करता येईल असा प्रस्ताव सादर केला.

३.१ **"पेड न्यूज":** गेल्या वर्षाच्या निवडणुकीत पेड न्यूजच्या संबंधात भारतीय वृत्तपत्र परिषदेने तिच्या अहवालात अशी शिफारस केली होती की, पेड न्यूज ही एक गैरव्यवहाराची प्रथा होऊ शकते. या अहवालाची एक प्रत सोबत जोडली आहे.

३.२ आयोगाचा असा दृष्टीकोन आहे की, मुक्त व नि:पक्ष निवडणुकीच्या संदर्भात बाधा आणण्यासाठी "पेड न्यूज" भूमिका बजावते. सामान्यपणे, राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या कडून विभेदक जाहिरातींमधून दिलेल्या अहवालातील बातम्यांमध्ये सर्व सामान्य मतदार अधिक श्रेष्ठ मूल्यांसाठी जोडले जातात. पेड न्यूज म्हणजे अनेक बातम्यांच्या वृत्तांकनामधील बातम्या व प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातींमधील मुखवटा घालून स्वत:ची प्रतिमा उजळवण्यासाठी केलेला खोटा प्रयत्न आहे. यापेक्षा आणखी वाईट-गोष्ट म्हणजे या गैरव्यवहाराला अटकाव न करता उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांमधील बेहिशेबी पैशांचा उपयोग व निवडणूक खर्चाचा अहवाल न देणे या गोष्टींचा यात समावेश होतो. आयोग, "पेड न्यूज" कडे निवडणूक

लढवणारे उमेदवार व मतदार यांवर अत्यंत प्रतिकूल परिणाम करणारी एक फसवणूक यादृष्टीने पाहतो. या समस्येला खंबीरपणे तोंड देण्याची आवश्यक आहे.

३.३ म्हणून, आयोगाने अशी शिफारस केली आहे की, १९५१च्या अधिनियमाच्या भाग सातच्या प्रकरण तीन अन्वये निवडणूक अपराध म्हणून,किमान दोन वर्षाच्या कारावासाच्या जबरी शिक्षेसह, कोणलाही उमेदवाराच्या निवडणुकीच्या भवितव्यास मदत होण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीच्या भवितव्यावर बाधक रीतीने परिणाम होण्यासाठी “पेड न्यूज” प्रसिध्द करणे आणि प्रसिध्द करण्यास अपप्रेरणा देणे याबाबींचा अंतर्भात करण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यात सुधारणा करण्यात यावी.

**<u>निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा</u>** :

४.१ लोकसभा मतदारसंघासाठी २५ लाख रुपये आणि विधानसभा मतदारसंघासाठी १० लाख रुपये पर्यंतच्या निवडणूक खर्चाची विद्यमान कमाल मर्यादा आहे. काही लहान राज्यांबाबत कमाल मर्यादा किंचित कमी आहे. वर्ष २००३ मध्ये कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली होती. दिनांक ४ ऑक्टोबर, २०१० मध्ये मान्यताप्राप्त पक्षांसोबत आयोगाकडून घेण्यात आलेल्या एका बैठकीमध्ये अनेक पक्षांनी असे मत व्यक्त केले की, निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा वाढविण्यात यावी.

४.२ आता कमाल मर्यादेमध्ये सुधारणा करण्यात आली तेव्हा ती ७ वर्षांहून अधिक मंजूर झाली आहे. आयोगाचा असा दृष्टिकोन आहे की, पुढील कमाल मर्यादेची रक्कम सुधारित करण्याची वेळ आली असून २००३ मध्ये खर्चाच्या मर्यादेची शेवटची सुधारणा करतेवेळी मतदारांची संख्या जवळपास ६४६.५ दशलक्ष होती. २०१० च्या अंतिम मतदार यादी प्रमाणे, मतदारांची संख्या ७३० दशलक्ष पेक्षा अधिक होती. अर्हताप्राप्त झालेले दिनांक म्हणून ०१.०१.२०११ ला प्रकाशित झालेल्या अंतिम मतदार यादीच्या बाबतीत, मतदारांची संख्या ७४० दशलक्ष इतकी पार करणे अपेक्षित आहे. याप्रकारे २००३ पासून मतदारांची संख्या ही जवळपास १०० दशलक्षाने वाढली आहे. याशिवाय, या कालावधीमध्ये मूल्य निर्देशांकात १.६ च्या पटीने वाढ झाली आहे.

४.३ म्हणून, आयोग असे प्रस्तावित करतो की, निवडणुका घेण्याबाबतचा नियम, १९६१ याच्या नियम ९० अन्वये खर्चाच्या कमाल मर्यादेची केलेली तरतूद ही किंमत चलनवाढ निर्देशांकात झालेल्या वाढीला अनुसरुन वाढविण्यात यावी. विविध राज्यासाठी प्रस्तावित कमाल मर्यादा रक्कम, या पत्रासोबत जोडलेल्या विवरणामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**<u>भारत निवडणूक आयोग</u>**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१

---

क्रमांक:३/ईआर/२००४-जेएस-दोन दिनांक : २ जून, २००४

प्रति,
सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांचे,
मुख्य निवडणूक अधिकारी

विषय : उमेदवारांच्या पार्श्वभूमी संबंधातील मतदारांच्या माहितीच्या अधिकाराच्या संबंधात <u>दिनांक २७-०३-२००३ चा आयोगाचा आदेश.</u>

महोदय,

निवडणुका घेण्याबाबतचा नियम, १९६१ याच्या नियम ४ अ च्या तरतुदी आणि वर उल्लेख केलेला आयोगाचा आदेश यासंबंधात निर्देश देण्याचा आदेश मला आहे. उक्त नियम ४ अ नुसार, प्रत्येक उमेदवाराला, निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ याला जोडलेल्या नमुना २६ मध्ये एक प्रतिज्ञापत्र दाखल करावयाचे आहे आणि आयोगाच्या दिनांक २७-०३-२००३ च्या आदेशानुसार, उमेदवारांना, प्रलंबित प्रकरणे, त्यांच्या मत्ता (यात त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचाही समावेश आहे), त्यांची दायित्वे यासह शासकीय विभागांना प्रदेय असलेली देणी इत्यादींचाही समावेश आहे आणि त्यांची शैक्षणिक अर्हता यासंबंधात, आयोगाद्वारे विहित करण्यात आलेल्या प्रपत्रात, आणखी एक प्रतिज्ञापत्र दाखल करावयाचे आहे.

आयोगाला अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की, अनेक प्रकरणात उमेदवार प्रतिज्ञापत्रांत, विशेषत: त्यांच्या मत्तांशी संबंधित असलेल्या भागात, उमेदवार अचूक माहिती देत नाहीत. या संदर्भात, अशी नोंद घेता येईल की, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १२५ अ हे, कलम ३३ अ अनुसार दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती सादर करण्यासंबंधातील शिक्षार्थ तरतुदींचा परामर्श आणि भारतीय दंड संहितेचे कलम १७७ यात सर्वसाधारणपणे लोकसेवकाने खोटी माहिती देण्याकरिता असलेल्या शिक्षार्थ तरतुदींचा समावेश आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या **कलम १९५** अन्वये, संबंधित लोकसेवकाची लेखी तक्रार किंवा ज्याला असा लोकसेवक प्रशासकीयदृष्ट्या दुय्यम आहे अशा अन्य लोकसेवकाची लेखी तक्रार यांव्यतिरिक्त, भारतीय दंड संहितेच्या कलम १७७ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधची कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही.

खोटी माहिती दाखल करण्यासंबंधातील प्रकरणांचा परामर्श घेण्यासाठी, आयोगाने असा निर्देश दिला आहे की, ज्याबाबतीत कोणाही व्यक्तीद्वारे, कागदोपत्री पुराव्याचा आधार देऊन, कोणत्याही उमेदवाराद्वारे खोटी माहिती सादर केल्यासंबंधातील तक्रार सादर केली जाते त्याबाबतीत, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, योग्य प्राधिकाऱ्यासमोर औपचारिक तक्रारी दाखल करुन, संबंधित उमेदवाराच्या विरुध्द खटला दाखल करण्याची कार्यवाही सुरु करावी.

कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,

सही/-
(एस.आर.कार)
अवर सचिव

**<u>भारत निवडणूक आयोग</u>**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली

---

क्रमांक ४९१/प्रसार माध्यम/२००९ दिनांक : १८ मार्च, २०११

प्रति,
सर्व राज्ये / संघराज्यक्षेत्रे
यांचे मुख्य निवडणूक अधिकारी
(लक्षवेध : आसाम, केरळ, पुड्डुचेरी, तामिळनाडू व पश्चिम बंगाल)

विषय : निवडणूक कालावधीत "पेड न्यूज" म्हणजेच प्रसारमाध्यमातील बातम्यांच्या <u>स्वरुपातील जाहिराती रोखण्यासाठी उपाययोजना.</u>

महोदय,

उल्लेख केलेल्या विषयावर आयोगाची अनुक्रमे दिनांक ८ जून, २०१० व दिनांक २३ सप्टेंबर, २०१० ची पत्रे क्रमांक ४९१/प्रसारमाध्यम/२००९ याचा निर्देश देण्याबाबत आणि असे कळविण्याबाबत पुढील (क) येथे तरतूद करण्यात आलेल्या सदस्याव्यतिरिक्त, भारत सरकारच्या स्वतंत्र प्रसारमाध्यम विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्यात / केंद्रशासित प्रदेशात, भारतीय माहिती सेवेच्या (भामासे) नियुक्ती करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला, "पेड न्यूज" यासंबंधातील जिल्हा पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या (प्रप्रसंस) आदेशांविरुध्द असलेल्या अपिलांशी संबंधित असलेली प्रकरणे निकालात काढण्यासाठी, राज्य पातळीवरील समितीच्या सदस्य करण्यात यावे असे कळविण्याबाबत मला आदेश आहे.

म्हणून, राज्य पातळीवरील समितीला (दूरदर्शन वाहिन्या व केबल नेटवर्क यांवरील जाहिरातीकरिता प्रमाणनासाठी राजकीय पक्ष व संघटना यांच्याकडून आलेल्या अर्जांचा परामर्श घेण्यासाठी), आता, पुढीलप्रमाणे रचना असलेली राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती असे संबोधले जाईल :-

(क) अतिरिक्त / सह मुख्य निवडणूक अधिकारी - अध्यक्ष

(ख) राज्याच्या राजधानीत राहात असलेला कोणत्याही संसदीय मतदारसंघाचा निवडणूक निर्णय अधिकारी

(ग) माहिती व प्रसारण मंत्रालयातून मागणी करावयाचा अधिकारी म्हणून असलेली एक तज्ञ व्यक्ती.

(घ) वरील (क) यातील तज्ञ व्यक्तींपेक्षा स्वतंत्र असलेला, भारत सरकारच्या प्रसारमाध्यम विभागाचे प्रतिनिधित्व करणारा, राज्य / संघराज्यक्षेत्र यात नियुक्त करण्यात आलेला (अवर सचिव / उप सचिव पातळीवरील) भारतीय माहिती सेवेचा अधिकारी.

आपला विश्वासू,

सही/-
(यशवीर सिंग)
संचालक

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१

---

क्रमांक ४९१/प्रसार माध्यम/२०११ (जाहिरात) दिनांक : १६ ऑगस्ट, २०११

प्रति,

सर्व राज्ये / संघराज्यक्षेत्रे
यांचे मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय : निवडणूक कालावधीत, राजकीय पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते / पदाधिकारी यांच्या मालकीच्या दूरदर्शन / केबल वाहिन्यांवरील उमेदवारांच्या जाहिरातींचा परामर्शघेण्यासाठी मार्गदर्शक सूचना.**

महोदय / महोदया,

राजकीय पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते / पदाधिकारी यांच्या मालकीच्या दूरदर्शन / केबल वाहिन्यांवरील पेडन्यूज व जाहिराती यांसंबंधात आयोगाला वेगवेगळे निर्देश प्राप्त झालेले आहे असे कळविण्याचा मला आदेश आहे. वेगवेगळे राजकीय पक्ष, पत्रकार आणि इतर व्यक्ती यांच्याकडून तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. अशा घटनांचा परामर्श घेण्याच्या बाबतीत एकरुपता आणण्यासाठी आयोगाने पुढील मार्गदर्शक सूचना जारी करण्याचा आदेश दिला आहे :-

लोकसभा किंवा यथास्थिति, राज्य / संघराज्यक्षेत्र यांची विधानसभा त्यांच्या मुदत समाप्तिच्या नियत दिनांकापूर्वी सहा महिने, राज्य / केंद्रशासित प्रदेश यात प्रसार / खप असलेल्या / असलेली दूरदर्शन वाहिन्या / आकाशवाणी वाहिन्या / वर्तमानपत्रे यांची एक यादी आणि त्यांची प्रमाणदर पत्रके ही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून मिळवण्यात येतील आणि आयोगाकडे पाठवण्यात येतील.

जिल्हा पातळीवरील व राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (प्रप्रसंस) ही, उमेदवारांच्या संबंधातील सर्व राजकीय जाहिरातींचे उघडपणे किंवा गुप्तपणे संनियंत्रण करील आणि जरी उमेदवार हे, वाहिनी / वृत्तपत्र यांना कोणतीही रक्कम, जी “पेडन्यूजच्या” प्रकरणा व्यतिरिक्त अन्य बाब आहे याबाबत प्रदान करीत नसले तरीसुध्दा, उमेदवारांच्या निवडणूक खर्च लेख्यातील प्रमाण दरपत्रकावर आधारित असलेल्या काल्पनिक खर्चाचा समावेश करण्याबाबत, उमेदवारांना नोटीसा देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सूचना देईल. यात कलावंत प्रचारक (स्टारप्रचारक) किंवा इतर व्यक्ती यांद्वारे उमेदवाराकडून किंवा उमेदवाराच्या वतीने, त्याच्या निवडणूक-विषयक भवितव्यावर प्रभाव पाडण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रसिध्दीचादेखील समावेश आहे. सदर नोटीशीची एक प्रत ही निवडणूक खर्च निरीक्षक यांना देखील चिन्हांकित करण्यात येईल.

संसदीय किंवा विधानसभा मतदारसंघाच्या पोट निवडणुकीच्या बाबतीत, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे पोटनिवडणुकीची घोषणा झाल्यानंतर, त्वरित प्रमाण दरपत्रक मिळवण्यात येईल आणि प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (प्रप्रसंस) ही, त्यानंतर योग्य ती कार्यवाही करील.

"पेडन्यूजच्या" बाबतीत असल्याप्रमाणेच, मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी हे, निवडणूक प्रचारमोहिमेचा प्रारंभ होण्यापूर्वी, वरील मार्गदर्शक सूचनांबाबत राजकीय पक्ष आणि प्रसारमाध्यम संस्था यांना संक्षिप्त माहिती देतील.

प्रमाण दरपत्रक लागू करण्याच्या संबंधातील कोणत्याही तांत्रिक शंकेच्या बाबतीत, सदर बाब ही, डीएव्हीपी, माहिती व प्रसारण, मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे सल्ल्याकरिता, विचारार्थ सोपविण्यात यावी.

या निदेशांचे, आयोगाच्या यापूर्वीच्या दिनांक ८ जून २०१०, दिनांक २३ सप्टेंबर २०१० आणि दिनांक १८ मार्च, २०११ रोजीच्या परिपत्रकांसोबत परीपालन करण्यात यावे.

हे सर्व संबंधितांच्या माहितीकरिता त्वरित निदर्शनास आणून द्यावे.

आपला विश्वासू,

सही/-
(यशवीर सिंग)
संचालक

# <u>भारत निवडणूक आयोग</u>

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली- ११०००१

---

क्रमांक ४९१/पेड न्यूज/२०१२/माध्यम                                   दिनांक : १५ मार्च, २०१२

<u>आदेश</u>

ज्या ठिकाणी संसदेच्या किंवा विधानसभेच्या निवडणुका किंवा पोटनिवडणूका घेण्यात आल्या त्या ठिकाणी आयोगाने राज्य / संघराज्य क्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी आणि इतर यांच्याकडून "पेड न्यूज" च्या तक्रारी आणि संदर्भ मागवण्याचे काम केले आहे. यासंबंधातील तक्रारी राजकीय पक्ष, पत्रकार आणि सामान्य नागरिक यांच्याकडून देखील प्राप्त झाल्या आहेत.

आयोगाचे पत्र क्रमांक ४९१/माध्यम /२००९, दिनांक ८ जून, २०१० आणि क्रमांक ४९१/प्रसार माध्यम धोरण/२०१०, दिनांक २३ सप्टेंबर,२०१० पहा. यामध्ये सर्व राज्य / संघ राज्यक्षेत्रांमध्ये जिल्हा स्तरीय प्रसार माध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्याचे निदेश देण्यात आले होते. दिनांक १८ मार्च, २०११ च्या पुढील पत्रात सर्व राज्याच्या व संघ राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना राज्यस्तरीय प्रसार माध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समिती देखील स्थापन करण्याचे निदेश देण्यात आले होते. त्यानुसार दिनांक १६ जून, २०११ च्या आयोगाच्या आदेशानुसार भारताच्या निवडणूक आयोगाने एक समिती स्थापन केली होती. त्याच समितीने राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी प्रसार माध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समिती यांच्याकडून प्राप्त झालेल्या "पेड न्यूज" च्या तक्रारी / संदर्भ यांचे परिक्षण करण्याच्या दृष्टीने पुढील घटकांच्या सहकार्याने बळकटीकरण करण्यात आले आहे.

१) अपर महा संचालक (बातमी), बातमी सेवा विभाग, ए आय आर, नवी दिल्ली.
२) अपर महा संचालक, डी ए व्ही पी, नवी दिल्ली.
३) प्रधान सचिव / सचिव (निवडणूक खर्चाचे प्रभारी)
४) प्रधान सचिव (विधि)
५) प्रधान सचिव (प्राप्त झालेले संदर्भ असतील तेथील राज्य / संघराज्यक्षेत्राचे प्रभारी)
६) प्रधान सचिव (सी सी आणि बी ई विभागाचे प्रभारी)
७) संचालक, प्रधान सचिव / उप सचिव (प्रसार माध्यम विभाग) आमंत्रक.

अनुक्रमांक १ आणि अनुक्रमांक २ मधील सदस्य हे संबंधित मंत्रालये/ विभागाकडून नामनिर्देशनाच्या स्वरुपात घेण्यात आलेले आहेत.

पूर्वोक्त समितीची भूमिका पुढीलप्रमाणे असेल :-

१. राज्यस्तरीय माध्यम, प्रमाणन आणि संनियंत्रण समितीकडून मिळालेल्या संदर्भाचे परीक्षण करणे.
२. पेड न्यूज संबंधात विशेषत: कोणत्याही इतर राज्य / संघ राज्यक्षेत्राकडून न येता आयोगाकडे प्रत्यक्ष मिळालेल्या संदर्भावर परीक्षण आणि शिफारस करणे.
३. भारताच्या निवडणूक आयोगाच्या धोरणास पुष्टी देण्यासाठी सहाय्यकारी योजना तयार करणे. अ)पेड न्यूज, ब) पक्ष आणि उमेदवाराकडून प्रस्तावित केलेल्या मोहिमांसाठी इलेक्ट्रॉनिक आणि

मुद्रित माध्यमाच्या वापरासंबंधीचे प्रश्न. क) मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यम इत्यादी या दोन्हीकडून करावे किंवा करु नये, यासारख्या प्रश्नांवर भारताच्या निवडणूक आयोगास धोरण ठरवण्यासाठी पुष्टी देणे.

४. संघ राज्यक्षेत्र / राज्य शासन यामधील मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून आयोगाला विचारार्थ पाठविलेली कोणतीही अन्य प्रकरणे ज्यात माध्यम संनियंत्रणाची आवश्यकता असेल.

आदेशानुसार

सही/-
(यशवीर सिंग)
संचालक

**<u>भारत निवडणूक आयोग</u>**

<u>निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली-११०००१</u>

---------------------------------------------------------------------------------------

क्र. ४९१/पेड न्यूज/२०१२/माध्यम दिनांक: २७ ऑगस्ट, २०१२

प्रति,

सर्व राज्याचे/ संघराज्य क्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :- निवडणुकांच्या कालावधीतील पेड न्यूज अर्थात माध्यमातील बातम्यांच्या विशिष्ट प्रकारातील जाहिरातीची तपासणी करण्यासाठी उपाययोजना व संबंधित बाबी- सुधारित मार्गदर्शकतत्वे-यासंबंधात.**

महोदय / महोदया,

उद्धृत केलेल्या विषयाकडे आपले लक्ष वेधण्याचा व आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, स्वतंत्रपणे निवडणूक लढणारे उमेदवार किंवा राजकीय पक्षांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये जाहिराती देण्यापूर्वी अशा सर्व जाहिरातीचा पूर्वआढावा घेण्यासाठी, छाननी व पडताळणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्याच्या आवश्यकतेबाबत एसएलपी (C) क्रमांक ६६७९/२००४ (माहिती व प्रसारण मंत्रालय विरुध्द मेसर्स जेमिनी टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड व इतर) यावरील भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा परिणाम म्हणून आयोगाने, क्रमांक ५०९/७५/२००४-जेएस-१, दिनांक १५ एप्रिल, २००४ हा आदेश निर्गमित केला आहे. पेड न्यूजच्या प्रकरणांवर नियंत्रण ठेवण्याचे अतिरिक्त काम हाती घेण्यासाठी **<u>निवडणूक कालावधीमध्ये प्रत्येक जिल्ह्यात</u>** माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यासाठी आयोगाने पुढील मार्गदर्शकतत्वे निर्गमित केली आहेत. पहा आयोगाची समक्रमांकाची दिनांक ८ जून, २०१०, दि. २३ सप्टेंबर, २०१०, दि. १८ मार्च, २०११ व दिनांक १६ ऑगस्ट, २०११ ची पत्रे.

दिनांक ८ जून, २०१० व त्यानंतरच्या दिनांकाच्या "पेड न्यूज" वरील आदेशांच्या फेरबदलामध्ये आपणास पुढीलप्रमाणे कळवण्याचा मला आदेश आहे :

**<u>१. जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती</u>**

प्रत्येक जिल्ह्यात पुढीलप्रमाणे सदस्यांचा समावेश असलेली जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती तयार करण्यात येईल. :-

(क)संसदीय मतदारसंघाचे जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी,

(ख) सहायक निवडणूक निर्णय अधिकारी (उपविभागीय दंडाधिऱ्यापेक्षा निम्न-दर्जाचा नसलेल्या)

(ग) केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाचे कर्मचारी (जिल्ह्यातील कोणतेही असल्यास)

(घ) भारतीय वार्ताहर परिषदकडून शिफारस करण्यात येईल असे त्रयस्थ नागरीक / पत्रकार

(ड) जिल्हा जनसंपर्क अधिकारी/ जिल्हा माहिती अधिकारी/ समकक्ष-सदस्य सचिव

**<u>१.१.१</u>** उपरोक्त सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जाहिरातींचे प्रमाणन करण्याच्या प्रयोजनार्थ, संसदीय मतदारसंघाचा निवडणूक निर्णय अधिकारी/ जिल्हा निवडणूक अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी (उपविभागीय दंडाधिकाऱ्यापेक्षा निम्न –दर्जा नसलेला) हे, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचे सदस्य असतील. तथापि, "पेड न्यूज" इत्यादींच्या प्रकरणांच्या छाननीसाठी, जिल्हा माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे "ग" "घ" "ड" वर देण्यात आल्याप्रमाणे तीन अतिरिक्त सदस्य असतील.

**<u>१.१.२</u>** जर केंद्र सरकार माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या कर्मचाऱ्यांची जिल्ह्यामध्ये पदस्थापना करण्यात आली नसेल तर, जिल्हा निवडणूक अधिकारी हा, जिल्ह्यामध्ये पदस्थापित असलेल्या. एक केंद्र सरकारी अधिकारी किंवा एक राज्य शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष पसंतीने नियुक्ती करु शकेल.

**<u>१.१.३</u>** प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने जर (एमसीएमसी) माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती मध्ये समाविष्ट करावयाची नावे दिली नाहीत तर, जिल्हा निवडणूक अधिकारी स्वत:, जो इच्छुक आहे आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या मते, ज्याची तटस्थेबाबतची पार्श्वभूमी व पूर्वीतिहास योग्य आहे अशा एकतर त्रयस्त्र वरिष्ठ नागरिकाची किंवा पत्रकाराची नियुक्ती करील.

**<u>१.१.४</u>** सदस्य सचिव (जिल्हा जनसंपर्क अधिकारी / जिल्हा माहिती अधिकारी किंवा समकक्ष) हा, प्रांतीक राज्य नागरी सेवेमधील असावा.

**<u>१.२</u>** समितीला दोन विभिन्न ठराविक कार्ये असतील:

(एक) **जाहिरातींचे प्रमाणन करणे**-ज्याकरिता माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचे दोन विशिष्ट सदस्य, म्हणजे निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, प्रमाणनाकरिता अशा जाहिराती विचारात घेतील व त्यांवर निर्णय देतील.

(दोन) एखाद्या संनियंत्रण करणाऱ्या व्यवस्थेमार्फत सर्व सदस्यांकडून **<u>पेड न्यूजच्या संबंधातील तक्रारींची /मुद्यांची तपासणी करणे</u>.**

**<u>१.३</u>** माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही, जाहिरातींचे प्रमाणन करण्याचे व पेड न्यूजची तपासणी करण्याचे कार्ये पार पाडण्याशिवाय, लोकप्रतिनिधित्व अधिनियमा अन्वये विनियमांची संबंधित माध्यमाच्या अंमलबजावणीत सहाय देखील करील. म्हणून समितीच्या कार्यामध्ये पुढील कार्याचा समावेश असेल:

**<u>१.३.१</u>** माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही, खाली दिलेल्या बाबींसाठी सर्व माध्यमांचे (उदा. वर्तमानपत्रे, छपाई माध्यम, इलेक्ट्रॉनिक माध्यम, केबल जाळे (केबल नेटवर्क) अंतर्जाल (इंटरनेट), भ्रमणध्वनी जाळे (मोबाईल नेटवर्क, इत्यादी) स्कॅन करील:

(क) पेड न्यूजची संशयास्पद प्रकरणे निवडणूक खर्च निरीक्षकांनी ती तिच्याकडे पाठविलेल्या पेड न्यूजची प्रकरणे देखील सक्रीयतेने विचारात घेईल. ती उमेदवाराने अशा चॅनेलला/ वर्तमानपत्राला कोणतीही रक्कम प्रत्यक्षपणे प्रदान केली आहे वा नाही किंवा कसे एकतर हे लक्षात न घेता किंवा त्या आधारे त्यांच्या निवडणूक खर्चाच्या प्रकाशित साहित्यावरील प्रत्यक्ष खर्च किंवा लेख्यात डीआयपीआर दरावर (डीआयपीआर दर नसतील तर डीएव्हीपी दर वापरता येतील), आधारित **<u>काल्पनिक खर्च</u>** समाविष्ट करण्याकरिता उमेदवारांना नोटीस देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळविल अशा नोटीशीची एक प्रत खर्च निरीक्षकालादेखील चिन्हांकित करण्यात येईल)

(ख) इलेक्ट्रॉनिक माध्यमातील राजकीय जाहिरातींचे संनियंत्रण ( जर असे प्रक्षेपण/ प्रसारण हे, केवळ समितीकडून प्रमाणन करण्यात आल्यानंतर केले असेल तर त्याच्या तपासणीसाठी)

(ग) खर्च संनियंत्रण करण्याच्या दृष्टीकोनातून एकतर उघडपणे वा गुप्तपणे, उमेदवारांशी संबंधित, अन्य माध्यमातील राजकीय जाहिरातींचे संनियंत्रण (यामध्ये, उमेदवाराच्या निवडणूक विषयक माहितीवर अधिक भर देण्यासाठी उमेदवाराद्वारे त्याच्या वतीने किंवा मुख्य प्रचारकाच्या (प्रचारकांच्या ) द्वारे किंवा इतरांद्वारे प्रसिध्दी करणे वा जाहिरात करणे किंवा आवाहन करणे यांचादेखील समावेश असेल)

(घ) छपाई माध्यमातील जाहिराती (माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही जर अशी जाहिरात उमेदवाराच्या संमतीने वा माहितीने दिली आहे याबाबत तपासणी करील व अशा प्रकरणात जाहिरातीचा खर्च हा उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) निवडणूक खर्चाच्या हिशेबात मोजण्यात येईल. तथापि, जर अशी जाहिरात ही उमेदवाराच्या अधिकाराने देण्यात आली नसेल तर, भारतीय दंड संहिता याच्या कलम १७१ ज चे उल्लंघनाबद्दल अशा प्रकारच्या खटल्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

(ड) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ क अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जर कोणतेही निवडणूक पत्रक, भित्तिपत्रक, हस्तपत्रक व अन्य साहित्य यावर प्रकाशकाचे व मुद्रकाचे नाव व पत्ता असेल तर, त्याची तपासणी (जर कोणत्याही छापील साहित्याच्या दर्शनी भागावर मुद्रकांची वा प्रकाशकांची नावे व पत्ते नसतील तर, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ च्या प्रयोजनाकरिता **पेड न्युज ही, अन्य दस्तऐवजांच्या प्रवर्गवारीत देखील येते.**

**<u>१.३.२</u>** अशी समिती ही, निवडणूक विषयक जाहिरातीवर उमेदवाराकडून करण्यात आलेला खर्च किंवा “न्यूज” प्रकाशित करण्यासाठी केलेला प्रत्यक्ष खर्च याबाबत उमेदवाराकडून सादर करण्यात आलेली आवश्यक कागदपत्रे साधार असल्याने दाखविण्यात आले असेल त्याबाबतचा अथवा पेड न्यूजच्या निर्धारित प्रकरणांमध्ये समितीकडून परिगणित करण्यात आलेल्या अशा काल्पनिक खर्चाच्या बाबतीतील प्रत्येक उमेदवाराच्या संबंधीचा एक दैनिक अहवाल विहित नमुन्यात (विहित केलेल्या निवडणूक खर्चाच्या मार्गदर्शक तत्वांच्या जोडपत्र १२ नुसार) लेखांकन चमूला सादर करील व त्याची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला व खर्च निरीक्षकाला पाठविल.

**<u>१.३.३</u>** माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही, माध्यमाचे संनियंत्रण करण्यासाठी एक योग्य यंत्रणा निर्माण करील व त्याकरीता पुरेसे मनुष्यबळ व पायाभूत सुविधा यासह सुसज्ज ठेवील.

## <u>२. राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती</u>

**<u>२.१</u>** राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीमध्ये पुढीलप्रमाणे अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

(क) मुख्य निवडणूक अधिकारी, अध्यक्ष,

(ख) भारताच्या निवडणूक आयोगाकडून नियुक्त करण्यात आलेला कोणताही निरीक्षक,

(ग) समितीने स्वीकृत करावयाचा एक तज्ञ,

(घ) वरील (ग) मधील तज्ञाव्यतिरिक्त भारत सरकारच्या माध्यम विभागाचे

प्रतिनिधित्व करणारा राज्य / संघराज्य क्षेत्रातील पदस्थापित (अवर सचिव/ उप सचिव दर्जाचा) भारतीय माहिती सेवेतील (आयआयएस) अधिकारी,

(ड) भारतीय वार्ताहर परिषदेने नामनिर्देशित केल्यानुसार त्रयस्थ नागरीक किंवा पत्रकार (कोणताही असल्यास)

(च) माध्यमाचा प्रभारी असलेला अतिरिक्त / सह मुख्य निवडणूक अधिकारी (सदस्य सचिव)

<u>**२.१.१**</u> जर समितीमध्ये समाविष्ट करावयाची नावे भारतीय वार्ताहर परिषदेने दिली नाहीत तर, मुख्य निवडणूक अधिकारी स्वत: जो इच्छूक आहे व मुख्य निवडणूक अधिकाऱ्याचे मते ज्याची तटस्थेतेबाबतची पार्श्वभूमी व पूर्वेतिहास योग्य आहे अशा एकतर त्रयस्थ वरिष्ठ नागरीकाची किंवा पत्रकाराची नियुक्ती करील.

<u>**२.२**</u> राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीला दोन विभिन्न ठराविक कार्ये असतील :

(एक) पूर्वोक्त आयोगाचा आदेश दिनांक १५ एप्रिल, २००४ अनुसार **जाहिरातीच्या प्रमाणनावरील** जिल्हा व अतिरिक्त / सह मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या दोन्ही समित्यांच्या अपिलावर निर्णय देणे.

(दोन) जिल्हा माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णयाच्या विरुध्द केलेल्या अपिलावरील किंवा ज्या प्रकरणात ती अशा उमेदवारांना नोटीशी देण्यासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याना निदेश देईल असे स्वाधिकारे हाती घेऊ शकेल अशा प्रकरणातील **पेड न्यूजच्या सर्व प्रकरणांची तपासणी करणे.**

<u>**२.२.१ जाहिरातींच्या प्रमाणनावरील अपील हे,**</u> दिनांक १५ एप्रिल, २००४ च्या उपरोक्त आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने (क) (ख) (ग) वरील सदस्यांनी हाताळणे आवश्यक आहे तर पेड न्यूजची प्रकरणे हाताळण्यासाठी (घ), (ड) आणि (च) यावरील सदस्य जादा घेण्यात आले आहेत.

<u>**२.२.२** प्रमाणनासंबंधी</u> असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जिल्हा व अतिरिक्त/ सह मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या दोन्ही समित्यांकडील अपील हे, दिनांक १५ एप्रिल, २००४ च्या आयोगाच्या आदेशानुसार मुख्य निवडणूक अधिकारी अध्यक्ष असलेल्या राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे करावे लागेल व ती समिती ते निकालात काढील आणि आयोगाकडे यासंबंधात कोणतीही निर्देश करणे आवश्यक असणार नाही.

<u>**३ प्रमाणनाबाबतची अतिरिक्त / सह मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची समिती**</u> :

आयोगाच्या दिनांक १५ एप्रिल, २००४ च्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या <u>**जाहिरातीच्या प्रमाणनासाठी**</u> अतिरिक्त/ सह मुख्य निवडणूक अधिकारी अध्यक्ष असलेली समिती ही, उपरोक्त आदेशात नमूद केल्याप्रमाणे पुढेही कार्य करील व तिला "पेड न्यूज"ची प्रकरणे हाताळण्याचा कोणताही अधिकार असणार नाही.

<u>**४ पेड न्यूजवरील राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णयाच्या विरुध्द अपील**</u>

<u>**४.१**</u> पेड न्यूजच्या बाबतीतील राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णया विरुध्द कोणतेही अपील हे, भारताच्या निवडणूक आयोगाकडे करण्यात येईल. राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही तिला तसे आवश्यक वाटत असेल तर, सल्ल्याकरीता आयोगाकडे त्याबाबत निर्देशदेखील करील. जेथेजेथे पेड न्यूज प्रकरणांच्या तक्रारी या, थेटपणे आयोगाकडे करण्यात येतील तेथे

तेथे आयोग प्रारंभीच्या विचारविनिमयासाठी अशी प्रकरणे राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे पाठविल.

**<u>५ पेड न्यूजबाबत मार्गदर्शक तत्त्वे :</u>**

पेड न्यूजच्या संबंधात, पुढील मार्गदर्शक तत्त्वांचे अनुपालन करण्यात यावे.

**<u>५.१</u>** लोकसभा किंवा यथास्थिति राज्य / संघराज्य क्षेत्र विधानसभा, यांच्या नेहमीच्या कालावधी समाप्त होण्याच्या नियत दिनांकाच्या सहा महिन्यांपूर्वी, राज्यात/ संघराज्य क्षेत्रात प्रक्षेपित होणाऱ्या / प्रसारण होणाऱ्या दूरदर्शन (चॅनल) वाहिन्या / रेडीओ (चॅनल) वाहिन्या / वर्तमानपत्रे यांची एक यादी व त्यांचे प्रमाण दरपत्रक, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून प्राप्त करण्यात येईल व जाहिरातींचे दर निश्चित करण्यासाठी सर्व राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीला पुरविण्यात येईल.

**<u>५.२</u>** लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या पोटनिवडणूकीच्याबाबतीत, असे प्रमाण दरपत्रक हे, पोटनिवडणूक जाहीर झाल्यावर तात्काळ संबंधीत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून प्राप्त करण्यात येईल.

**<u>५.३</u>** प्रमाण दरपत्रक लागू करण्याच्या संबंधात कोणतीही शंका उद्धवल्यास ती बाब, सल्ल्याकरीता, डीआयपीआर किंवा डीएव्हीपी, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे विचारार्थ पाठविण्यात येईल.

**<u>५.४</u>** मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी हे, निवडणूक प्रचार मोहीम सुरु होण्यापूर्वी वरील मार्गदर्शक तत्त्वांविषयी राजकीय पक्ष व माध्यमगृहांना थोडक्यात माहिती देतील. माध्यमांना या बाबतची स्वयं-विनियमन करण्यास माध्यमांना सांगण्यात येईल. या मार्गदर्शकतत्त्वांबद्दल सामान्य जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी या आदेशाला व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल. स्वयं-विनियमन करण्यासाठी अशा संक्षिप्त माहितीवर जोर देण्याची गरज असेल.

**<u>५.५</u>** संशयास्पद पेड न्यूज वा जाहिरात किंवा अपील यांची प्रकरणे ही काटेकोर कालमर्यादेत विचारार्थ घ्यावयाची आहे ती पुढीलप्रमाणे :-

**<u>५.५.१</u>** <u>जिल्हा</u>ज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्देशावर, निवडणूक निर्णय अधिकारी हा अशी न्यूज किंवा त्यासमानचे साहित्य प्रकाशित करण्याकरीता केलेल्या अशा खर्चाचे स्पष्टीकरण देण्यासाठी / तो उघड करण्यासाठी किंवा असा खर्च प्रमाण दरानुसार का परिगणित करण्यात येऊ नये व उमेदवाराच्या खर्चात का मोजण्यात येऊ नये असे नमूद केलेली नोटीस प्रकाशित / प्रसारित / प्रक्षेपित केल्याबद्दलची तक्रार प्राप्त झाल्याच्या ९६ तासांच्या आत उमेदवारांना देईल. जेव्हा राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्वाधिकारे किंवा तक्रारींच्या आधारे, प्रकरणे हाती घेईल तेव्हा हीच समान कालमर्यादा लागू असेल.

**<u>५.५.२</u>** जिल्हा / राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती, अशा उत्तरावर शीघ्रतेने निर्णय देईल व उमेदवाराला / पक्षाला आपला अंतिम निर्णय कळवील. नोटीस बजावण्याच्या ४८ तासांच्या आत उमेदवाराकडून जिल्हा माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीला कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही अशा बाबतीत, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचा निर्णय अंतिम असेल.

**<u>५.५.३</u>** जर राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचा निर्णय उमेदवाराला स्वीकार्य नसेल तर, तो/ ती, असा निर्णय प्राप्त झाल्याच्या ४८ तासांच्या आत राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण

समितीकडे अपील करील व त्याची जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीला त्याबाबतची माहिती देईल.

<u>**५.५.४**</u> राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती, अपील प्राप्त झाल्याच्या ९६ तासांच्या आत प्रकरण निकालात काढील व निर्णय उमेदवाराला कळवील व त्याची एक प्रत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीला देईल.

<u>**५.५.५**</u> उमेदवार, या समितीकडून आदेश प्राप्त झाल्याच्या ४८ तासांचे आत, राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णयाच्या विरुध्द भारताच्या निवडणूक आयोगाकडे अपील करु शकेल. भारताच्या निवडणूक आयोगाचा निर्णय हा अंतिम असेल.

<u>**५.६**</u> ही संपूर्ण प्रक्रिया सामान्यपणे निवडणूक कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

६. काही प्रकरणात असे दिसून आले आहे की, पेड न्यूजवरील नोटीसा मोठ्या प्रमाणात देण्यात आल्या आहेत परंतु त्यावरील पुढील कारवाई प्रलंबित आहे माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने याबाबत खात्री करुन घ्यावी की, प्रत्येक प्रकरणावर योग्य विचारविमर्थ करण्यात आला आहे व जी "पेड न्यूज" ची संशयास्पद प्रकरणे असल्याचे आढळून आली आहेत, केवळ अशी प्रकरणे उमेदवाराला नोटीस देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात आलेली आहेत. क्षुल्लक प्रकरणे हाती घेण्यात आलेली नाहीत हे पाहताना, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती याची खात्री करुन घेईल की, प्रत्यक्ष "पेड न्यूज" ची तपासणी करताना कोणताही निष्काळजीपणा होणार नाही.

७. जेव्हा "पेड न्यूज" च्या अशा संशयास्पद प्रकरणांवर ही, एकतर जिल्हा स्तरावर / मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या स्तरावर / आयोगाच्या स्तरावर, यथास्थिति एक पेड न्युज म्हणून निर्णय देण्यात आला असेल तेव्हा असा प्रत्यक्ष/ काल्पनिक खर्च हा, संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा भाग म्हणून समजण्यात येईल. याबाबतची योग्य ती माहिती, त्याला / तिला किंवा त्याच्या / तिच्या प्रतिनिधीला देण्यात येईल.

८. जेव्हा जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय समितीने किंवा भारताचा निवडणूक आयोगाने हे एक पेड न्यूजचे प्रकरण आहे, असा निर्णय दिला असेल तेव्हा अशी प्रकरणे ही, संबंधित माध्यमाच्या संबंधात पुढील कारवाई करण्यासाठी भारतीय वार्ताहर परिषदेला कळविण्यात येतील.

आपला विश्वासू,

(राहूल शर्मा)
अवर सचिव

## <u>भारत निवडणूक आयोग</u>

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१

------------------------------------------------------------------------------------------------

क्र.४९१/पेड न्यूज / २०१२ प्रसारमाध्यम दिनांक : ९ ऑक्टोबर,२०१२

**प्रति,**

सर्व राज्ये / केंद्रशासित प्रदेश

यांचे मुख्य निवडणूक अधिकारी

विषय : निवडणूक कालावधीत पेड न्यूज रोखण्यासाठी उपाययोजना म्हणजेच प्रसारमाध्यमांमध्ये बातम्यांच्या स्वरूपात जाहिरात आणि <u>संबंधित बाबी याविषयी सुधारित मार्गदर्शक सूचना</u>

२०१२ वरील उल्लेखित विषयावर आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, उक्त पत्राच्या परिच्छेद ५.५.२ यामध्ये अंशत: फेरफार करुन उमेदवार नोटीस प्राप्त झाल्यावर ४८ तासांच्या आत जिल्हा / राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडून प्राप्त झालेल्या नोटिशीला उत्तर देईल. जर उमेदवाराकडून करारनिविष्ट कालावधीत कोणतेही उत्तर मिळाले नाही तर प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचा निर्णय अंतिम असेल. जिल्हा / राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती उत्तरावर शीघ्रतेने विशेषत: उत्तर आल्यावर ४८ तासांच्या आत निर्णय घेईल, आणि त्याचा अंतिम निर्णय उमेदवार / पक्ष यांना कळवील.

आपला विश्वासू

(राहुल शर्मा)

अवर सचिव

**<u>शीघ्र डाकेने</u>**

**<u>भारत निवडणूक आयोग</u>**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१

---

क्र.४९१/पेड न्यूज / २०१२/ प्रसार माध्यम                    दिनांक : १५ ऑक्टोबर,२०१२

**प्रति,**

सर्व राज्ये / केंद्रशासित प्रदेश

यांचे मुख्य निवडणूक अधिकारी

विषय : निवडणूक कालावधीत पेड न्यूज रोखण्यासाठी उपाययोजना म्हणजेच प्रसार माध्यमांमध्ये बातम्यांच्या स्वरूपात जाहिरात आणि संबंधित बाबी <u>यांविषयी सुधारित मार्गदर्शक सूचना.</u>

महोदय / महोदया,

आयोगाच्या दिनांक २७ ऑगस्ट, २०१२च्या पत्राचा निर्देश करण्यास आणि आयोगाच्या दिनांक २१ नोव्हेंबर,२००८ रोजीच्या आदेशात निर्दिष्ट केल्यानुसार जाहिरातींच्या प्रमाणनात (प्रत सोबत जोडली आहे),

दूरदर्शन वाहिन्या / केबल नेटवर्क आणि आकाशवाणी, यात खाजगी एफएम वाहिन्या यांचादेखील समावेश आहे. यांशिवाय, आधीच सूचना देण्यात आल्याप्रमाणे सिनेमागृहात प्रदर्शित करावयाच्या जाहिरातींचा देखिल समावेश असेल. आपणास असे मला कळवण्याचा आदेश आहे.

आपला विश्वासू,

(राहुल शर्मा)

अवर सचिव

**<u>विशेष संदेशवाहक / ई-मेल /फॅक्स यांद्वारे</u>**

**<u>भारत निवडणूक आयोग</u>**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१

-----------------------------------------------------------------------------------------------

क्र.४९१/पेड न्यूज / २०१३/ प्रसार माध्यम दिनांक : १२ फेब्रुवारी,२०१३

**प्रति,**

श्रीमती ॲनी जोसेफ,
महासचिव,
न्यूज ब्रॉडकास्टर्स असोशिएशन,
ज्यूरीस हाऊस, तळमजला,
२२-इंदर एनक्लेव्ह, पश्चिम विहार,
नवी दिल्ली - ११००८७

विषय : निवडणूक कालावधीत पेड न्यूज रोखण्यासाठी उपाययोजना म्हणजेच प्रसारमाध्यमांमध्ये बातम्यांच्या स्वरूपात जाहिरात यासंबंधात.

महोदया,

"पेडन्यूज" ही अगदी अलिकडील संकल्पना असून तील एक निवडणूक विषयक गंभीर गैरप्रकार म्हणून उदयास येत आहे, याबाबीकडे आपले लक्ष वेधण्याचा मला आदेश आहे. पेड न्यूज याची " मोबदला म्हणून रोख रक्कम किंवा वस्तू या स्वरुपात एक किंमत म्हणून कोणत्याही प्रसारमाध्यमात (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक) आढळून येणाऱ्या कोणत्याही बातम्या किंवा विश्लेषण" अशी व्याख्या करण्यात आली आहे. यामुळे मुक्त व नि:पक्षपातीपणे निवडणुका पार पाडण्याच्या संदर्भात आयोगाला काळजी वाटते आहे. प्रसारण माध्यमातील मोठया वर्गासहीत, अनेक राजकीय पक्ष व प्रसारमाध्यम गट यांनी सुद्धा त्यांना अशाचप्रकारे काळजी असल्याचे आयोगाला कळविले आहे. अनेक हितसंबंधित व्यक्तींनी निरनिराळया कार्यक्रमांत आयोगाशी संवाद साधला असून, निवडणुकांमध्ये मतदारांवर गैरवाजवी प्रभाव टाकणारे आणि धनशक्तीचा वापर करण्यास उत्तेजन देणारे आणि नि:पक्षपाती असणाऱ्या क्षेत्रात शांतता भंग करणारे असे गैरप्रकार थांबवण्यासाठी, आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत एकमत आहे. हा गैरप्रकार रोखण्यासाठी आयोगाने निरनिराळया उपाययोजना केल्या आहेत. आयोगाने जारी केलेली पेड न्यूजवरील दिनांक २७ ऑगस्ट,२०१२ रोजीच्या एक सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना पुस्तिकासुद्धा आपल्या तात्काळ संदर्भासाठी या सोबत जोडण्यात आली आहे.

या निवडणूक गैरप्रकारात प्रसारमाध्यम संस्थाना (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक या दोन्ही) सहभागी होण्यास प्रतिबंध करणे हे देखील आवश्यक आहे. भारतीय वृत्तपत्र परिषद (भावृप) ही देखील आयोगासोबतच महत्त्वाची हितसंबंधीत संस्था आहे आणि मुद्रण प्रसारमाध्यमावर नियंत्रण ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पेड न्युज सिध्द झालेल्या प्रकरणांत आयोग उमेदवारांच्या संबंधात योग्य

ती कार्यवाही करीत असते आणि निवडणूक गैरव्यवहारात गुंतलेल्या मुद्रण प्रसारमाध्यम संस्थांची नावे आवश्यक कार्यवाहीकरिता भारतीय वृत्तपत्र परिषदेस कळवीत असते.

आयोगाने असा विचार केला आहे की, प्रसारण माध्यमात गुंतलेल्या पेड न्यूजच्या प्रकरणांबाबत एकदा का आमच्या छाननी समितीद्वारे पुष्टी देण्यात आली की, ही बाब सदर प्रकरणे तशाच प्रकारे आपल्या संघाकडे निर्णयार्थ सोपवण्यात येऊ शकतात. प्रसारण माध्यमाच्या संबंधात, भारतीय वृत्तपत्र परिषदेसारख्या अन्य कोणत्याही प्राधिकरणाच्या अभावामुळे दिसून येत आहे.

वृत्तप्रसारक संघाच्या (एनबीए) सहकार्याने प्रसारण माध्यमातील पेड न्यूजच्या घटनांना पायबंद लावण्याबाबत आयोगास आशा आहे. याबाबत आम्ही पुढील कार्यवाही करण्यापूर्वी आपल्याकडून त्वरित प्रतिसाद मिळाल्यास संतोष होईल.

आपला विश्वासू,

(पद्मा आंगमो )
उप सचिव

**<u>भारत निवडणूक आयोग</u>**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१

राहुल शर्मा ई-मेल : rahulsharma.eci@gmail.com

अवर सचिव दूरध्वनी/फॅक्स:011-23052070

**क्र. 491/प्रसारमाध्यम धोरण/2013 दिनांक /10 ऑक्टोबर 2013**

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,
दिल्लीचे एनसीटी,
दिल्ली.

**विषय:- <u>राजकीय स्वरुपाच्या जाहिराती संबंधात स्पष्टीकरण</u>**

महोदय,

उल्लेखित विषयावरील आपल्या दिनांक 09-10-2013 रोजीच्या पत्राच्या संदर्भासाठी आणि आपण विचारणा केलेल्याबाबी बाबत पुढीलप्रमाणे परिच्छेद निहाय उत्तर देण्यासाठी मला आदेश आहे.

<u>बाब क्रमांक १ व २ स्पष्टीकरण</u>

सार्वजनिक ठिकाणी राजकीय जाहिराती मोहीम सामग्रीचे दृकश्राव्य (ऑडीओ-व्हिज्युअल) लावताना आयोगाच्या विद्यमान आदेशान्वये पदनिर्देशित समितीचे आवश्यक प्रमाणन असले पाहिजे.

<u>बाब क्रमांक ३ चे स्पष्टीकरण</u>

जर दिल्लीच्या एनसीटी मध्ये नोंदणीकृत पक्ष/ गट / संघटना / संघ यांची मुख्यालय नसतील परंतु त्यांची दिल्ली मध्ये जाहिरातींचे टेलीकॉस्ट / ब्रॉडकास्ट करण्याची इच्छा असेल तर दिल्लीच्या एनसीटी प्रकरणात जर पक्ष निवडणूक लढवित असल्यात राज्यातील प्रसार माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीव्दारे जाहिरातीच्या प्रमाणनाचा विचार करण्यात आला पाहिजे.

याबाबत आपल्या पत्राच्या अनुषंगाने इतर बाबींचया संबंधातील प्रमाणनाबाबत आपणांस लवकरच कळवण्यात येईल.

आपला विश्वासू,

(राहुल शर्मा )

**जोडपत्र**

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्य प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती (एमसीएसी) / तज्ञ अभीक्षकयांदारे, जिल्हा प्रसार माध्यम, प्रमाणन व सनियंत्रण समित्यांना कळवण्यात आलेल्या प्रकरणांसह तक्रारी | पेड न्युजची संशयित प्रकरणे म्हणून जिल्हा प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीव्दारे निर्णय देण्यात आलेली प्रकरणे आणि उमेदवारांना नोटीस देण्यासाठी शिफारशी | पेड न्युज नसल्याचे आढळून आलेली प्रकरणे / तक्रारी | ज्या प्रकरणात उमेदवाराला निर्णय अधिका-यांकडून नोटीसा देण्यात आल्याती प्रकरणे | ज्या उमेदवारांनी रक्कम खर्च केल्याचे व अशी रक्कम त्यांच्या लेख्यात दर्शविल्याचे मान्य केले अशी प्रकरणे | ज्यात उमेदवारांनी ठरलेल्या कालावधीत नोटीशीला उत्तर दिले नाही अशी प्रकरणे | ज्यात उमेदवारांनी मान्य करण्याचे नाकारले व स्पष्टीकरण दिले अशी प्रकरणे | नोटीशीला देण्यात आलेले स्पष्टीकरण /उत्तर विचारात घेऊन प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीव्दारे पेड न्युज नसलेली प्रकरणे म्हणून निर्णय झालेली प्रकरणे | (नोटीशीला देण्यात आलेला युक्तीवाद / उत्तर विचारात घेऊन / किंवा उत्तर प्राप्त झाले नाही तर ) पेड न्युज म्हणून जिल्हा प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीवदारे निश्चित झालेली प्रकरणे | ठरलेल्या कालावधीत जिल्हा प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या अंतिम निर्णयाविरुध्द राज्य प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडे उमेदवाराने केलेले अपील | राज्य प्रसारमाध्याम प्रमाणन व सनियंत्रण समितीव्दारे पेड न्युज म्हणून निर्णय झालेली प्रकरणे | राज्य प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्राण समितीव्दारे पेड न्युज नसलेली म्हणून निर्णय झालेली प्रकरणे | पेड न्युजची पुष्टी दिलेली प्रकरणे (५) + (९)-१२ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

**संशयित पेड न्युज / पुष्ठी दिलेली पेड न्युज यांचे प्रतिवेदन प्रपत्र (प्रत्येक आठवडयाच्या अखेरच्या दिवशी सादर करण्यात यावे.)**

टीप:-

(१) = (२) + (३)

(२) सर्वसाधारण (४) च्या समानच असले पाहिजे (काही वेळा एखाद्या उमेदवाराला त्याच्याशी संबंधित असलेल्या पेड न्युजच्या अनेक प्रकरणाकरिता एकच नोटीस दिलेली असते, (४) मधील नोटीशींच्या संख्यामध्ये ज्यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत अशा प्रकरणांची संख्या दर्शविण्यात यावी आणि ज्यांना नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत अशा उमेदवारांची संख्या दर्शवू नये )

(४)= (५)+(६)+(७)

ज्यात उमेदवारांनी ठरलेल्या कालावधीत नोटीशीला उत्तर दिले नाही अशा प्रकरणांत (६) )जिल्हा प्रसारमाध्यमात व संनियंत्रण समितीचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवाराच्या लेख्यात खर्चाचा समावेश करण्याच्या संबंधात निवडणूक निर्णय अधिका-याकडून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

त्याचप्रमाणे, जर निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत उमेदवाराने, जिल्हा प्रसारमाध्यम व सनियंत्रण समितीने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द, राज्य प्रसार माध्यम व सनियंत्रण समितीकडे अपील केले नाही तर, असे मानण्यात येईल की, त्याने जिल्हा प्रसार माध्यम व सनियंत्रण समितीचा निर्णय स्विकारला आहे आणि सदर रक्कम त्याच्या लेख्यात दर्शविण्यात येईल.

(६) +(७)= (८) + (९)

(१०)=(११)+(१२)

(१)= (३)+(५)+(६)+(८)+(९)

(२) पुष्टी दिलेल्या पेड न्युजची एकूण प्रकरणे = (५)+(९) =(१२)

| अनुक्रमांक | पेड न्युज प्रकरणात ज्याला नोटीस देण्यात आली त्या उमेदवाराचे व पक्षाचे नांव | बातमीच्या मुद्याचे शीर्षक | वृत्तपत्राचे ब्रॉडकास्ट माध्यमाचे नाव आणि प्रकाशनाचा दिनांक व वृत्तपत्राचा पृष्ठ क्रमांक /जेथे बाब दिसून येते, त्या कार्यक्रमाची वेळ | हिशोबात दर्शविण्यात आलेल्या डीआयपीआर डीएव्हीपी दरांनुसार उक्त बातमी बाबीचा खर्च |
|---|---|---|---|---|
| | | | | |

# <u>भारत निवडणूक आयोग</u>

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१

---

क्र. ४९१ /एसएम/२०१३/दळणवळण दिनांक :२५ ऑक्टोबर, २०१३

प्रती,

१) सर्व राज्यांचे व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

२) सर्व राष्ट्रीय / राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे अध्यक्ष / महासचिव.

विषय :- **निवडणूक मोहिमे अंतर्गत सोशल मीडियाचा वापर करण्याच्या संबंधात आयोगाच्या सूचना.**

महोदय,

निवडणूक मोहीमेकरिता सोशल मीडियाचा वापर करण्याकडे आणि सामाजिक प्रसारमाध्यमातील निवडणूक कायदयाचे विवक्षित उल्लंघनाकडे देखील आयोगाचे लक्ष वेधले. निवडणुकीतील पारदर्शकता व समान संधी देण्यासाठीच्या हितासाठी विनियमन होणे आवश्यकता आहे.

(सोशल मिडीया) लोकांमध्ये परस्पर क्रियांच्या साधनांचा निर्देश करते ज्यामुळे लोक वास्तविक समूह (व्हर्च्युल कम्युनिटिस) व नेटवर्क यातील माहिती घेवून कल्पनांची निर्मिती करतात त्यात सहभाग घेतात आणि / किंवा त्याची देवाण घेवाण करतात. ते दर्जा/ आटोका, वारंवारता, उपयोग्यता, तात्कालिकता आणि स्थायीपणा अशा अनेक बाजुंत पारंपारिक / औद्योगिक प्रसारमाध्यमापासून वेगळे आहे. वेब आणि सोशल मीडिया यांचा प्रसार अनेक वर्षांपासून वाढला आहे आणि ज्याप्रमाणे निवडणूक कालावधीत इतर प्रसारमाध्यमाचे विनियमन करण्यात येते त्याचप्रमाणे सोशल मीडियाचे विनियमन करण्यात यावे अशा राजकीय व सामाजिक गटांकडून मागण्या होत आहेत.

सोशल मीडियाचे स्थूलमानाने पाच वेगवेगळे प्रकार आहेत.

(क) सहयोगात्मक प्रकल्प (उदाहरणार्थ विकीपिडीया).

(ख) ब्लॉग्ज्स व सूक्ष्म ब्लॉग्ज्स (उदाहरणार्थ व्टिटर )

(ग) कंटेट कम्युनिटीज (उदाहरणार्थ यु टयुब)

(घ) सोशल नेटवर्कींग साईटस (उदाहरणार्थ फेसबुक )

(ड) व्हर्चुअल गेम वर्ल्डस (उदाहरणार्थ ॲप्स )

निवडणूक मोहिमेशी संबंधित असलेल्या कायदेशीर तरतुदी, या इतर कोणत्याही प्रसारमाध्यमाचा वापर करणा-या निवडणूक मोहीमेच्या कोणत्याही इतर स्वरुपाला ज्या पध्दतीने लागू होतात त्याच पध्दतिने सोशल मीडियाला लागू होतात. सोशल मीडिया हे प्रसारमाध्यमाचे सापेक्षतेने नवीन स्वरुप असल्यामुळे, सर्व संबंधितांना पुढील सूचनांव्दारे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. :-

## अ. उमेदवारांकडून त्यांच्या सोशल मीडिया खात्यांबाबत द्यावयाची माहिती.

उमेदवारांनी नामनिर्देशने पत्रे दाखल करावयाच्या वेळी नमुना-२६ मध्ये प्रतिज्ञापत्रे दाखल करणे आवश्यक आहे. सविस्तर सूचना व ज्या नमुन्यात प्रतिज्ञापत्रे दाखल करावयाची आहेत तो नमुना सोबत जारी करण्यात आला आहे. पहा आयोगाचे पत्र क्रमांक ३/४/२०१२/ एसडीआर दिनांक २४ ऑगस्ट, २०१२ या नमुन्याच्या परिच्छेद ३ नुसार असे बंधनकारक आहे की, उमेदवाराचा ई मेल-आयडी असल्यास या नमुन्यातून आयोगाला कळवण्यात यावा. आयोगाला असे आवश्यक वाटते की, उमेदवाराचे अधिप्रमाणित सोशल मीडिया खाते हे देखील आयोगला कळवण्यात यावेत. ही माहिती पुढीलप्रमाणे उक्त परिच्छेद ३ मध्ये सादर करण्यात यावी.

“माझा संपर्क दूरध्वनी क्रमांक------------------- असा आहे / असे आहेत.

“ माझा ई-मेल आयडी --------------------------------असा आहे, आणि माझे सोशल मीडिया खाते (असल्यास ) ------------------------- असे आहे.”

## ब. राजकीय जाहिरातींचे पूर्व -प्रमाण

भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील (एसएलपी) विशेष अनुज्ञा विनंती अर्जाच्या संदर्भात दिलेला (दिवाणी) एन. ६६७९ / २००४, दिनांक १३ एप्रिल, २००४ आदेशानुसार, आयोगाने या विषयासंबंधात त्याचा आदेश क्रमांक ५०९/७५/२००४/जेएस-१/४५७२ दिनांक १५-४-२००४ यात तपशीलवार सूचना दिल्या आहेत. या आदेशात, असे नमूद करण्यात आले की, दूरदर्शन वाहिन्या आणि / किंवा केबल नेटवर्क यांवर जाहिरात देण्याचा प्रस्ताव करणा-या प्रत्येक नोंदणीकृत / राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावरील राजकीय पक्षाला आणि निवडणूक लढवणा-या प्रत्येक उमेदवाराला, प्रसिध्दी करण्यापूर्वी, इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमावर सर्व राजकीय जाहिरातांच्या पूर्व प्रमाणनाकरिता भारतीय निवडणूक आयोग / पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा लागेल. सदर आदेशात त्यानंतर फेरबदल करण्यात आला आणि एकत्रीकृत करण्यात आला. पहा आयोगाचा आदेश दिनांक २७-८-२०१२, ज्यात जिल्हा व राज्य स्तरावरील प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समित्यांवर इतर कार्ये म्हणजेच पेड न्यूज इत्यादी विरुध्द कार्य करणे, अशा कार्यांसोबत, अशा जाहिरातींच्या पूर्व-प्रमाणनाच्या जबाबदा-या सोपवण्यात आल्या होत्या. सामाजिक प्रसारमाध्यम वेबसाईटस या देखील व्याख्येनुसार इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यम असल्यामुळे, आयोगाच्या आदेश क्रमांक ५०९/ ७५ /२००४ / जेएस-१/४५७२, दिनांक १५-४-२००४ यात समाविष्ट असलेल्या सूचना यादेखील त्यांत योग्य ते फेरबदल करुन, सामाजिक प्रसारमाध्यम वेबसाईटससहित सर्वच वेबसाईटसना लागू होतील आणि त्या पूर्व-प्रमाणनाच्या कक्षेत असतील म्हणून आपणास कोणत्याही इंटरनेट आधारित प्रसारमाध्यम / वेबसाईट ज्यांत सामाजिक प्रसारमाध्यम वेबसाईटसचाही समावेश आहे. त्यामध्ये त्याच नमुन्यात आणि पूर्वोक्त आदेशात निर्दिष्ट केलेल्या त्याच कार्यपध्दतीचे अनुसरण करुन सक्षम प्राधिका-याकडून पूर्व-प्रमाणनाशिवाय राजकीय पक्ष / उमेदवार यांव्दारे, कोणत्याही राजकीय जाहिराती देण्यात येत नाहीत, याबाबत खात्री करुन घेण्यासाठी, विनंती करण्यात येत आहे.

**क.सामाजिक प्रसारमाध्यम वेबसाईटसह इंटरनेटव्दारे प्रचार करण्याबाबतचा खर्च.**

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७, पोटकलम (१) अनुसार, प्रत्येक उमेदवाराने, निवडणुकीच्या संबंधात, त्यांच्याकडून किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती नामनिर्देशन दाखल केल्याचा दिनांक व निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याचा दिनांक यांत दोन्ही दिनांकाचा समावेश असून, झालेल्या खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशोब ठेवणे आवश्यक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने २००५ मध्ये कॉमन कॉज विरुध्द भारत सरकार सामाईकवाद / भारत संघराज्य यात असा आदेश दिला की, राजकीय पक्षांनी देखील निवडणूकींच्या खर्चाचे विवरणपत्र भारतीय निवडणूक आयोगाला सादर करावे आणि अशी विवरणपत्रे विधानसभा निवडणुका झाल्यानंतर ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणुका झाल्यानंतर ९० दिवासांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. हे उघड आहे की, सामाजिक प्रसारमाध्यमातील कोणत्याही जाहिरातीद्वारे निवडणूक मोहिमेवरील खर्च हा, निवडणुकांच्या संबंधातील सर्व खर्चाचा एक भाग आहे.

कोणत्याही संदिग्धता काढून टाकण्याकरिता याव्दारे असा निदेश देण्यात येत आहे की, उमेदवार व राजकीय पक्ष हे अचूक हिशोब ठेवण्यासंबंधी आणि खर्चाचे विवरणपत्र सादर करण्यासंबंधीचा तसेच प्रचार करण्याबाबतच्या सर्व खर्चाचा समावेश करतील यात सामाजिक प्रसारमाध्यमावरील जाहिरातींवर झालेल्या खर्चाचा देखील समावेश आहे. इतर बाबीसहित यामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी इंटरनेट कंपन्या व वेबसाईट यांना केलेल्या प्रदानांचा आणि तसेच प्रचाराशी संबंधित कार्यात्मक खर्च सृजनशील मजकूर विकसित करण्यावर झालेला कार्यात्मक व्यवहार खर्च, वेतनांवरील व्यवहार खर्च आणि अशा उमेदवारांकडून आणि राजकीय पक्षांकडून त्यांचा सामाजिक प्रसारमाध्यम खाते इत्यादी सांभाळण्याकरिता सेवानियुक्त केलेल्या कार्यकर्त्यांच्या पथकरात प्रदान केलेल्या मजुरीचा देखील समावेश असेल.

ख. **सोशल मीडियासह इंटरनेटवरील मजकुराशी संबंधित आदर्श आचारसंहिता लागू करणे.**

आयोगाकडून निवडणुका जाहीर करण्यात आल्याच्या दिनांकापासून निवडणुका पूर्ण होईपर्यंत, राजकीय पक्ष व उमेदवार यांच्यासंबंधात निवडणुकांच्या कालावधीत अमलात असणारी आयोगाची आदर्श आचारसंहिता असते. असे स्पष्ट करण्यात येते की, आदर्श आचार संहितेच्या तरतुदी व वेळोवेळी आयोगाव्दारे देण्यात आलेल्या संबंधित सूचना या देखील इंटननेटवर सामाजिक प्रसारमाध्यम संकेतस्थळासहित उमेदवारांकडून आणि राजकीय पक्षांकडून नोंद करण्यात आलेल्या मजकुराला लागू होईल.

ग. जेथवर उमेदवार व राजकीय पक्ष यांव्यतिरिक्त इतर व्यक्तीव्दारे नोंद करण्यात आलेल्या मजकुराचा संबंध आहे. तेथवर आयोग, सदर बाबीचा जोवर तिचा संबंध आहे तोवर किंवा ती राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्या निवडणूक प्रचारकार्याशी संयुक्तरित्या जेथवर जोडता येईल तेथवर व्यवहारीक मार्गाने

या बाबीचा परामर्श घेण्यासाठी, आयोग, दळणवळण व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाशी विचारविनिमय करुन, सदर बाबीसंबंधी विचार करीत आहे.

या सूचना, त्वरित आवश्यक कार्यवाहीकरिता उमेदवार, राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे व निवडणूक निरीक्षक यांच्यासहित सर्व संबंधीताच्या निदर्शनास कृपया आणून देण्यात याव्यात

आपला विश्वासू,

सही/-

( राहुल शर्मा )

(अवर सचिव)

दूरध्वनी 011- 23052070

ई-मेल : rahulsharma.eci @ gmail.com

## बिहारच्या सार्वत्रिक निवडणूक, २०१० मधील पेड न्यूज प्रकरणांची स्थिती.

| अनु.क्र. | राज्याचे /संघराज्य क्षेत्राचे नाव | पेड न्यूज प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| १ | बिहार | १५ |

## २०११ मधील सार्वत्रिक निवडणुकीतील पेड न्यूज प्रकरणांची स्थिती.

| अनु.क्र. | राज्याचे /संघराज्य क्षेत्राचे नाव | ज्यांत उमेदवारांना नोटिसा देण्यात आल्या अशा प्रकरणांची संख्या | पेड न्यूजची पुष्टी दिलेली प्रकरणे |
|---|---|---|---|
| १ | केरळ | ६५ | ६५ |
| २ | पुड्डुचेरी | ३ | ३ |
| ३ | आसाम | ४२ | २७ |
| ४ | पश्चिम बंगाल | १५ | ८ |
| ५ | तामिळनाडू | ११ | २२ |

## २०१२ मधील सार्वत्रिक निवडणुकीतील पेड न्यूज प्रकरणांची स्थिती.

| अनु.क्र. | राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे नाव | ज्यांत उमेदवारांना नोटिसा देण्यात आल्या अशा प्रकरणांची संख्या | पेड न्यूजची पुष्टी दिलेली प्रकरणे |
|---|---|---|---|
| १ | उत्तर प्रदेश | ९७ | ९७ |
| २ | उत्तराखंड | ६० | ३० |
| ३ | पंजाब | ३३९ | ५२३ |
| ४ | गोवा | ६३ | ९ |
| ५ | मणिपूर | काही नाही | काही नाही |
| ६ | गुजराथ | ४९५ | ४१४ |
| ७ | हिमाचल प्रदेश | १९० | १०४ |

**<u>२०१३ मधील सार्वत्रिक निवडणुकीतील पेड न्यूज प्रकरणांची स्थिती.</u>**

| अनु.क्र. | राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे नाव | ज्यांत उमेदवारांना नोटिसा देण्यात आल्या अशा प्रकरणांची संख्या | पेड न्यूजची पुष्टी दिलेली प्रकरणे |
|---|---|---|---|
| १ | त्रिपुरा | काही नाही | काही नाही |
| २ | मेघालय | काही नाही | काही नाही |
| ३ | नागालँड | काही नाही | काही नाही |
| ४ | कर्नाटक | ९३ | ९३ |
| ५ | मिझोराम | काही नाही | काही नाही |
| ६ | छत्तीसगड | ३५ | ३२ |
| ७ | राजस्थान | ११० | ८१ |
| ८ | मध्यप्रदेश | २७९ | १६५ |
| ९ | दिल्ली येथील एनसीटी | ८० | २५ |

# <u>पेड न्यूज वरील वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफ ए क्यू)</u>

**प्रश्न : <u>पेड न्यूज याचा अर्थ काय ?</u>**

**उत्तर :** प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया द्वारे पेड न्यूजची करण्यात आलेली व्याख्या – "मोबदला म्हणून रोख स्वरुपात किंवा वस्तु स्वरुपात किंमत देऊन कोणत्याही प्रसारमाध्यमात (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक) प्रसिध्द होणारी कोणतीही बातमी किंवा विश्लेषण" असा आहे.

प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने केलेली व्याख्या आयोगाने सर्वसाधारणपणे स्वीकारली आहे.

**प्रश्न : <u>जाहीरात व बातमी यांत काय फरक आहे ?</u>**

**उत्तर :** प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची मार्गदर्शक सूचना असे नमूद करतात-- मुद्रण अस्वीकार करुन बातमीला जाहिरातीपासून स्पष्टपणे सीमांकित करण्यात यावे, याची सर्व प्रकाशनांकडून काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. जेथवर बातमीचा संबंध आहे तेथवर, त्यात नेहमी सुत्रोल्लेख (क्रेडीट लाईन) असलीच पाहिजे आणि त्याची दर्शनी बाजूवर (टाईपफेस) मांडणी करण्यात यावी की, ती जाहिरात व तिच्यात (बातमीत) भेद दर्शवील. याशिवाय, जाहिरात ही प्रचालन करण्यासाठी आहे तर बातमी ही माहिती देण्यासाठी आहे.

**प्रश्न: <u>कोणत्या कारणामुळे भारताच्या निवडणूक आयोगाला पेड न्यूजची तपासणी करावी लागली?</u>**

**उत्तर :** निवडणूक प्रक्रियेच्या कारणास्तव आयोगाला पेड न्यूजच्या प्रश्नाचा अनुभव आला. राजकीय पक्ष व प्रसारमाध्यम गट यांनी पेड न्यूजच्या विरोधात कडक उपाययोजना करण्याकरिता आयोगाकडे विनंती केली होती. संसदेनेदेखील या बाबीवर चर्चा केली. सर्व राजकीय पक्षांनी ४ ऑक्टोबर, २०१० व पुन्हा ९ मार्च, २०११ रोजी आयोगासोबत झालेल्या बैठकीय पेड न्यूजच्या विरोधात कडक उपाययोजना करण्यात याव्यात याकरिता, सर्वसामान्य मत व्यक्त केले होते.

**प्रश्न : <u>पेड न्यूजचे प्रतिकूल परिणाम काय आहेत ?</u>**

**उत्तर :** १. निवडणुकीच्या स्पर्धाक्षेत्रात, पेड न्यूज जनतेची दिशाभूल करते, मतदारांवर गैरवाजवी दडपण आणते आणि माहिती मिळण्याच्या हक्काला बाधा आणते.

२. पेड न्यूज, निवडणूक खर्च कायदे कमाल मर्यादा यांवर, अप्रकट खर्चाद्वारे, कुरघोडी करते.

३. पेड न्यूज, राजकीय पक्ष व उमेदवार यांदरम्यानच्या समजूतदारपणाच्या नातेसंबंधाच्या वातावरणामध्ये विघ्न आणते.

**प्रश्न : <u>पेड न्यूजवर नियंत्रण कसे ठेवावे ?</u>**

**उत्तर :** १. प्रसारमाध्यमे व राजकीय कार्यकर्ते यांनी स्वत: शिस्त लावणे.

२. निवडणूक क्षेत्रातील येऊ घालेल्या संकटाला पायबंद घालण्यासाठी विद्यमान कार्यतंत्राचा काटेकोरपणे वापर करणे.

३. सदर विषयाबाबत जनता व हितसंबंधित व्यक्ती यांना जागृत करणे.

**प्रश्न : <u>पेड न्यूजला निवडणूक विषयक अपराध ठरविण्याकरिता भारताच्या निवडणूक आयोगाने कोणत्या उपाययोजना केल्या?</u>**

**उत्तर :** आयोगाने, कोणत्याही उमेदवाराच्या निवडणूकविषयक अपेक्षेला चालना देणे किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणूकविषयक अपेक्षेवर बाधक रीतीने परिणाम करणे यांकरिता पेड न्यूज प्रसिध्द करणे किंवा प्रसिध्द करण्यासाठी प्रोत्साहन देणे या बाबींसाठी, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या भाग-सात च्या प्रकरण तीन अन्वये, किमान दोन वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेसह निवडणूकविषयक अपराध ठरवण्यात येईल, अशी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यात दुरुस्ती करावी, असा प्रस्ताव मांडला आहे.

**प्रश्न : पेड न्यूजला पायबंद घालण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे कोणते कार्यतंत्र विकसित करण्यात आले आहे?**

**उत्तर :** आयोगाने पेड न्यूजसाठी प्रसारमाध्यमांचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा पातळीवर व राज्य पातळीवर, प्रसारमाध्यमाना प्रमाणन व संनियंत्रण समितीची (प्रप्रसंस) नियुक्ती केली आहे. या समित्या बातम्याच्या वार्ताकनाच्या वेषामधील राजकीय जाहिरातींचे स्थान निश्चित करण्यासाठी सर्व वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे यांची छाननी करतात आणि संबंधित उमेदवारांच्या विरुध्द आवश्यक ती कार्यवाही करतात.

**प्रश्न : जिल्हा पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती म्हणजे काय? आणि तिची कार्ये कोणती?**

**उत्तर :** जिल्हा प्रसारमाध्यम प्रमाणक व संनियंत्रण समिती ही, संनियंत्रणाच्या व्यवस्थेद्वारे पेड न्यूज संबंधातील तक्रारी / बाबी यांची तपासणी करते. ही समिती, सर्व प्रसारमाध्यमांचे म्हणजेच मुद्रण प्रसारमाध्यमे, इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे, केबल नेटवर्क इत्यादींचे पृथक्करण / तपासणी करते. पेड न्यूजच्या संशयित बाबींत, सदर समिती, उमेदवारांना, उमेदवाराने त्याच्या / तिच्या स्वत:च्या निवेदनानुसार वाहिनीला / वृत्तपत्राला प्रत्यक्षात कोणतीही रक्कम प्रदान केली किंवा नाही, हे लक्षात न घेता त्यांच्या निवडणूक खर्च लेख्यात प्रसिध्द केलेल्या मजकुरावरील प्रत्यक्ष खर्च किंवा त्यांच्या निवडणूक खर्च लेख्यात डीआयपीआर /डीएव्हीपी यांवरील आधारित काल्पनिक खर्च समाविष्ट करण्याकरिता, उमेदवारांना नोटिसा देण्यासाठी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सूचना देते. जिल्हा प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही, उमेदवाराकडून समयबध्द पध्दतीने आलेल्या उत्तरावर निर्णय घेते आणि उमेदवाराला / पक्षाला स्वत:चा अंतिम निर्णय कळविते.

**प्रश्न : राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती म्हणजे काय? आणि तिची कार्ये कोणती?**

**उत्तर :** राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (प्रप्रसंस) ही, जिल्हा पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णयाविरुध्द असलेल्या पेड न्यूजच्या सर्व प्रकरणांची तपासणी करते आणि जी प्रकरणे ती स्वाधिकारे सुरु करते. ज्यांत सदर समिती संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास, उमेदवारास नोटीस देण्याचा आदेश देते. राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती ही, अपील प्राप्त झाल्यावर ९६ तासांच्या आत प्रकरण निकालात काढील आणि उमेदवाराला निर्णय कळवील आणि निर्णयाची एक प्रत जिल्हा पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीला पाठवील.

**प्रश्न : राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णयाच्या विरोधात कोठे अपील करता येईल ?**

**उत्तर :** उमेदवार, जिल्हा पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णयाच्या विरोधात, राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे आणि राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन समितीच्या निर्णयाच्या विरोधात भारताच्या निवडणूक आयोगाकडे अपील करु शकेल.त्यावरील आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

**प्रश्न : जिल्हा पातळीवरील आणि राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम, प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या निर्णयाविरुध्द अपील करण्याकरिता किती कालमर्यादा आहे ?**

**उत्तर :** जर जिल्हा पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचा निर्णय उमेदवाराला स्वीकार्य नसेल तर, तो / ती, निर्णय प्राप्त झाल्यावर, ४८ तासांच्या आत जिल्हा पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीला तसे कळवून, राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे अपील करु शकेल. उमेदवार, राज्य पातळीवरील प्रसारमाध्यम प्रमाणन समितीच्या निर्णयाच्या विरुध्द, या समितीचा आदेश प्राप्त झाल्यापासून ४८ तासांच्या आत, आयोगाकडे अपील करू शकेल. आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

**प्रश्न : पेड न्यूजचा निर्णय झालेल्या प्रकरणात प्रसारमाध्यमांच्या विरोधात कोणती कार्यवाही करण्यात येईल ?**

**उत्तर :** प्रकरणांबाबत "पेड न्यूज" म्हणून निर्णय झाल्यावर, आयोग, मुद्रण प्रसारमाध्यम व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यम यांची प्रकरणे अनुक्रमे पीसीआय आणि राष्ट्रीय प्रसारण मानक प्राधिकरण यांच्याकडे सदर बाबीसंबंधात आवश्यक कार्यवाही करण्याकरिता, निर्णयार्थ सोपवतो.

**प्रश्न : पेड न्यूजच्या संबंधात न्यायनिर्णय देण्यासाठी कोणते निकष आहे ?**

**उत्तर :** केवळ उदाहरणे असू शकतील, परंतु अधिप्रमाणित स्त्रोताकडून कोणतीही गोष्ट सिध्द करुन दाखविण्यात येणार नाही किंवा परिपूर्ण यादी मिळणार नाही. काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत:

**क.** एकाच वेळी निरनिराळ्या लेखकांची नामपंक्ति (बाय-लाईन्स) असणाऱ्या किंवा लेखकांच्या नावांशिवाय, स्पर्धात्मक प्रकाशनांत दिसून येणारे छायाचित्रे व शीर्षके यांसह तंतोतंत जुळणारा लेख.

**ख.** विनिर्दिष्ट वृत्तपत्राच्या एकाच पृष्ठावर एकच निवडणूक दोघेही जिंकण्याच्या शक्यतेचा दावा करणाऱ्या प्रतिस्पर्धी उमेदवारांची स्तुती करणारे लेख.

**ग.** एका उमेदवाराला त्याची स्तुती करणाऱ्या, समाजाच्या प्रत्येक शाखेचा पाठिंबा मिळत आहे आणि तो मतदारसंघातील निवडणूक जिंकेल असे नमूद करणारी बातमी.

**घ.** अशा छोट्या घटना ज्यांत उमेदवाराला अतिशयोक्तिपूर्ण / वारंवार वृत्तव्याप्ती देण्यात येते आणि / किंवा विरोधकांच्या बातम्यांना अजिबात वृत्तव्याप्ती देण्यात येत नाही.

**ङ.** पेड न्यूजवरील प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया प्रकरणाचा निर्णय आणि भारताच्या निवडणूक आयोगाच्या प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचे यापूर्वीचे निर्णय यांचा मार्गदर्शनाचे स्त्रोत म्हणून उपयोग होऊ शकेल.

## जाहिराती व प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती यांच्या प्रमाणनावरील वारंवार विचारले जाणारे प्रश्न ( एफएक्यू )

**प्रश्न :-** **जाहिरातीचे प्रमाणन म्हणजे काय ?**

**उत्तर :** निवडणुकीच्या कालावधीत कोणत्याही नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे किंवा संघटनेच्या / संघाच्या कोणत्याही गटाद्वारे किंवा कोणत्याही निवडणूक लढवणा-या उमेदवाराद्वारे दूरदर्शन वाहिन्या आणि केबल नेटवर्क व सामाजिक प्रसारमाध्यमे यांवर प्रसारण करण्यापूर्वी एखाद्या समितीद्वारे राजकीय जाहिरातींना मिळालेली मान्यता.

**प्रश्न :-** **प्रमाणनाकरिता असलेल्या समित्यांचे प्रकार कोणते व त्यांची कार्ये कोणती ?**

**उत्तर:** 1. स्वतंत्र उमेदवाराकडून राजकीय जाहिरातींच्या प्रमाणनाच्या, समितीत पुढील अधिका-यांचा समावेश असेल :

(एक) (लोकसभा मतदारसंघाचा) निवडणूक निर्णय अधिकारी.

(दोन ) (उप विभागीय दंडाधिका-यापेक्षा निम्न दर्जा नसलेला ) सहायक निवडणूक निर्णय

अधिकारी.ही समिती, संबंधित लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणा-या स्वतंत्र उमेदवाराकडून किंवा त्या लोकसभामतदारसंघात असलेल्या विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवणा-या उमेदवारांकडून केबल नेटवर्क किंवा दूरदर्शन वाहिनीवर दाखववायाचे प्रस्तावित केलेल्या जाहिरातीच्या प्रमाणनाकरिता अर्ज दाखल करुन घेते. वरील दोन अधिकारी हे, इतर काही सदस्यांसोबत यापूर्वीच जिल्हा स्तरावरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचे सदस्य आहेत ज्यांचा अशा प्रमाणनात सहभाग नाही.

2. राज्य स्तरावरील प्रसारमाध्यम प्रमाणन समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :

(एक) अपर/ सह मुख्य निवडणूक अधिकारी- अध्यक्ष.

(दोन) राज्याच्या राजधानीत स्थित असलेल्या कोणत्याही लोकसभा मतदारसंघाचा निवडणूक निर्णय अधिकारी.

(तीन) अधिकारी असलेली एक तज्ञ व्यक्ती जी माहिती व प्रसारण मंत्रालयातून मागून घ्यावयाचा वर्ग-1 च्या पदापेक्षा निम्न पदावरील नसेल. ही समिती, त्या राज्यात / संघराज्यक्षेत्रात स्वत:चे मुख्यालय असलेल्या सर्व मान्यताप्राप्त व नोंदणीकृत राजकीय पक्षांकडून त्या

राज्यात/ संघराज्य क्षेत्रात स्वत:चे नोंदणीकृत कार्यालये असलेल्या संघटना, संघ यांच्याकडून प्राप्त झालेले प्रमाणनाचे अर्ज दाखल करुन घेते.

3. राज्य स्तरावरील अपील समितीत पुढीलप्रमाणे सदस्य असतील :

(एक) मुख्य निवडणूक अधिकारी- अध्यक्ष.

(दोन) भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे नियुक्त करण्यात आलेला कोणताही निरीक्षक.

(तीन) समितीद्वारे स्वीकृत करुन घ्यावयाची एक तज्ञ व्यक्ती.राज्य स्तरावरील अपील समिती ही, अपर/ सह मुख्य निवडणूक अधिकारी अध्यक्षपदी असलेल्या राज्यस्तरीय समितीद्वारे आणि मतदारसंघ स्तरीय समितीद्वारे प्रमाणन देण्याच्या किंवा नाकारण्याच्या निर्णयाच्या संबंधातील , कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या, तक्रारी/ गा-हाणी/ अपील, दाखल करुन घेते.

4. दिल्लीत असलेल्या समितीत पुढील अधिका-यांचा समावेश असेल :

(एक) सह मुख्य निवडणूक अधिकारी- अध्यक्ष

(दोन ) दिल्लीतील कोणत्याही लोकसभा मतदारसंघाचा निवडणूक निर्णय अधिकारी.

(तीन ) अधिकारी असलेली एक तज्ञ व्यक्ती जी माहिती व प्रसारण मंत्रालयातून मागून

घ्यावयाचा, वर्ग-1 च्या पदापेक्षा निम्न पदावरील अधिकारी नसेल. ही समिती, दिल्लीच्या एनसीटी मध्ये स्वत:ची मुख्यालये असलेल्या सर्व मान्यताप्राप्त व नोंदणीकृत राजकीय पक्षांकडून , दिल्लीच्या एनसीटी मध्ये स्वत:ची मुख्यालये असलेल्या संघटना किंवा संघ यांच्याकडून प्राप्त झालेले प्रमाणनाचे अर्ज दाखल करुन घेते.

**प्रश्न :-** **प्रमाणनाच्या अर्जासाठी किती कालमर्यादा आहे ?**

**उत्तर:** मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य स्तरावरील पक्ष, नोंदणीकृत व नोंदणी न झालेला पक्ष आणि निवडणूक लढवणारा प्रत्येक उमेदवार यांकरिता, जाहिरात प्रसारणाच्या प्रस्तावित प्रारंभाच्या दिनांकापूर्वी तीन दिवसांच्या आत इतकी कालमर्यादा असेल. कोणत्याही इतर संघटना/ संघ यांच्याबाबतीत, प्रसारणाच्या दिनांकापूर्वी सात दिवसांच्या आत इतकी कालमर्यादा असेल.

**प्रश्न:-** **प्रमाणनाच्या अर्जासोबत कोणती कागदपत्र जोडणे आवश्यक आहे ?**

**उत्तर:-** अर्जासोबत इलेक्ट्रॉनिक नमुन्यातील प्रस्तावित जाहिरातीच्या योग्यरीतीने साक्षांकित केलेल्या प्रतिलेखासह तिच्या दोन प्रती जोडण्यात याव्यात. याव्यतिरिक्त प्रमाणनाच्या अर्जात पुढील तपशिलाचादेखील समावेश असेल:-

१. जाहिरातीच्या निर्मितीचा खर्च .

२. समावेश करावयाच्या अशा जाहिरातींचीविभागणीसह आणि अशा प्रत्येक समावेशनासाठी आकारावयाचा प्रस्तावित दर यांसह, एखाद्यी दूरदर्शन वाहिनी किंवा केबल नेटवर्क यांवर अशा जाहिरातींच्या प्रस्तावित प्रसारणाचा अंदाजे खर्च.

३. एखादा उमेदवार/ अनेक उमेदवार/ अनेक पक्ष यांच्या निवडणुकीच्या संभाव्य लाभाकरिता जाहिरात देण्यात आली आहे किंवा कसे याबाबत निवेदन.

४. जर जाहिरात ही, एखाद्या राजकीय पक्ष किंवा एखादा उमेदवार यांव्यतिरिक्त कोणत्याही अन्य व्यक्तीकडून देण्यात आली असेल तर, ती व्यक्ती शपथेवर असे सांगेल की, ती जाहिरात कोणताही राजकीय पक्ष किंवा एखादा उमेदवार यांच्या लाभाकरिता नाही आणि उक्त जाहिरात ही, कोणताही राजकीय पक्ष किंवा एखादा उमेदवार यांद्वारे पुरस्कृत केली नाही किंवा कमिशन किंवा पैसे प्रदान करुन देण्यात आलेली नाही.

५. धनादेश किंवा धनाकर्ष यांद्वारे सर्व प्रदानकरण्यात येईल त्याबाबतचे विवरण.

**प्रश्न:-** **जिल्हा स्तरावरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती म्हणजे काय आणि तिची कार्ये कोणती ?**

**उत्तर:** (एक) जिल्हा स्तरावरील प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीची रचना-

क) (लोकसभा मतदारसंघाचा) जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी.

ख) (उप-विभागीय दंडाधिका-यापेक्षा निम्न दर्जा नसलेला) सहायक निवडणूक निर्णय अधिकारी.

ग) (जिल्ह्यात कोणताही असल्यास) केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयातील अधिकारी.

घ) पीसीआयद्वारे शिफारस करण्यात येईल असा त्रयस्त नागरिक/ पत्रकार.

ङ) डीपीआर ओ /जिल्हा माहिती अधिकारी/समतुल्य-सदस्य सचिव.

(दोन ) कर्तव्ये :

१. समितीद्वारे प्रमाणन करण्यात आल्यानंतरच केवळ, प्रसारण/प्रक्षेपण करण्यात आले आहे याची तपासणी करण्यासाठी, इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमातील राजकीय जाहिरातींची छाननी करणे.

२. एकतर उघडपणे किंवा गुप्तपणे खर्चाचे संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने उमेदवारांच्या संबंधातील इतर प्रसार माध्यमातील राजकीय जाहिरातींचे संनियंत्रण करणे, यात उमेदवाराकडून किंवा उमेदवाराच्या वतीने, किंवा मुख्य प्रचारकाद्वारे (प्रचारकाद्वारे) किंवा इतरांद्वारे उमेदवाराच्या निवडणूकविषयक दृष्टीकोनावर परिणाम करण्याच्या अशा प्रसिध्दीचा किंवा जाहिरातींचा किंवा अपिलाचा देखील समावेश असेल.

३. जर उमेदवाराच्या संमतीने किंवा त्याला माहित असताना मुद्रण प्रसारमाध्यमातील कोणतीही जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे, त्याबाबतीतील जाहिरातीचा खर्च हा उमेदवाराच्या ( उमेदवारांच्या) निवडणूक खर्चाच्या हिशेब घेण्यात येईल. त्याचे संनियंत्रण करणे. तथापि जर जाहीरात ही, उमेदवाराच्या प्राधिकारात देण्यात आली नसेल तर, भारतीय दंड संहितेच्या कलम 171 ज याच्या उल्लंघनाकरिता प्रकाशकाविरुध्द खटला सुरु करण्याची कारवाई करता येईल.

४. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, 1951 च्या कलम 127 अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जर काणेत्याही निवडणूकविषयक पत्रकावर, भित्तिपत्रकावर , हस्तपत्रकावर आणि इतर कागदपत्रांवर प्रकाशकाचे आणि मुद्रकाचे नाव व पत्ता छापला असल्याची तपासणी करणे.

५. निवडणूकविषयक जाहिरात देण्यासाठी उमेदवाराकडून झालेला खर्च किंवा बातमी प्रसिध्द करण्यासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च यांच्या संबंधात, विहित नमुन्यात प्रत्येक उमेदवाराच्या संबंधात खर्च लेखांकन पथकाला दैनंदिन अहवाल सादर करणे व त्याची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकारी व खर्च निरीक्षक यांना पाठवणे.

**प्रश्न :-** **जर एखादी जाहिरात प्रसारित करण्यास योग्य वाटली नाही तर, मतदारसंघ /जिल्हा किंवा राज्य स्तरावरील प्रसारमाध्यम प्रमाणन समितीला, अशा जाहिरातीला प्रमाणन देण्यास नकार देण्याचा अधिकार आहे काय?**

**उत्तर:** होय, जर एखादी जाहिरात प्रसारित करण्यास योग्य वाटली नाही तर, अशा जाहिरातीला प्रमाणन देण्यास नकार देण्याचा वरील समितीला अधिकार आहे.

**प्रश्न:-** **कोणती समिती, प्रादेशिक भाषेतील राष्ट्रीय पक्षाच्या जाहिरातीला प्रमाणित करील?**

**उत्तर:** जर दिल्ली येथे मुख्यालय असलेल्या कोणत्याही राष्ट्रीय पक्षाची किंवा राज्यस्तरावरील पक्षाची कोणत्याही प्रादेशिक भाषेतील जाहिरातीला प्रमाणन मिळवण्याची इच्छा असेल तर, ( प्रादेशिक भाषा ज्याच्याशी संबंधित आहे त्या ) संबंधित राज्याच्या राज्यस्तरावरील समितीला अर्ज सादर करावा लागेल.

**प्रश्न:-** **एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या बहुविध भाषांमधील एकाच जाहिरातीच्या बाबतीत कोणती समिती प्रमाणन करील ?**

**उत्तर:** जर एखादा राष्ट्रीय पक्ष हिंदी/ इंग्रजी व प्रादेशिक भाषांमध्ये एकाच जाहिरातीकरिता प्रमाणन मिळवण्याचा प्रयत्न करीत असेल तर, प्रत्येक भाषेच्या प्रमाणित प्रतिलेखनासह प्रत्येक भाषेतील जाहिरातीचा मजकूर, प्रादेशिक भाषेतील भाषांतरे ही, हिंदी/ इंग्रजी भाषेतील जाहिरातीचा यथार्थ अनुवाद आहेत आणि त्यातील कोणत्याही चुकीकरिता अर्जदार हा जबाबदार असेल असे, निश्चयपूर्वक सांगणा-या प्रतिज्ञापत्रासह , दिल्लीतील समितीकडे सादर करण्यात यावीत. दिल्ली येथील समितीकडून देण्यात आलेले प्रमाणपत्र हे, प्रादेशिक भाषांतील जाहिरातींकरिता पुरेसे असेल. पक्षाने , दिल्ली येथून देण्यात आलेल्या प्रमाणपत्राची एक प्रत, संबंधित इतर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-याकडे, दिल्ली येथील समितीद्वारे देण्यात आलेल्या मूळ प्रतीचीच सत्य प्रत आहे अशा प्रतिज्ञापनासह, प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

**प्रश्न:-** **वरील समितीच्या आदेशाविरुध्द कोठे अपील करता येईल ?**

**उत्तर:** कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवार, वरील समितीच्या आदेशाविरुध्द, राज्य स्तरावरील अपील समितीकडे अपील करु शकेल.

**<u>प्रश्न:-</u>** **राज्य स्तरावरील अपील समितीच्या आदेशाविरुध्द केलेले अपील कोणाकडे दाखल करता येईल ?**

**<u>उत्तर:</u>** सर्वोच्च न्यायालय.

**<u>प्रश्न :-</u>** **वरील समित्यांचे निर्णय हे कायदेशीररीत्या बंधनकारक आहेत किंवा कसे ?**

**<u>उत्तर:</u>** होय, सर्वोच्च न्यायालयाने, त्यांचा दिनांक 13 एप्रिल, 2004 चा दिलेला आदेश पहा, राजकीय जाहिरातींच्या प्रमाणनाकरिता समित्यांची स्थापना करण्यासाठी आयोगाला प्राधिकार दिलेला आहे.

## <u>पेड न्यूजवरील शिफारस</u>

(प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाकडून (पीसीआय) प्राप्त झालेले पत्र क्रमांक १७/१६/१०-११/भावृप/पीसीआय, दिनांक २९.१०.२०१२ पहा.)

१) निवडणूक कालावधीतील पेड न्यूज घटनेच्या तीन बाजू आहेत. (एक) वाचक किंवा दर्शक यांना ज्या उमेदवाराला मत द्यावयाचे आहे किंवा ज्याच्या विरोधात मतदान करावयाचे आहे त्या उमेदवाराचे व्यक्तिमत्व किंवा कार्य याबाबत अचूक माहिती मिळत नाही. ही बाब लोकशाहीचे मूलभूत तत्वच नष्ट करते. (दोन) निवडणूक लढवणारा उमेदवार ही बाब कदाचित त्यांच्या निवडणूक विषयक खर्च खात्यात दर्शवित नाहीत त्यामुळे लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ अन्वये भारताच्या निवडणूक आयोगाने तयार केलेल्या. निवडणूक घेण्यासंबंधीचे नियम, १९६१ याचे उल्लंघन होते. (तीन) ज्या वृत्तपत्रांना व दूरदर्शन वाहिन्यांना रोख रक्कम प्राप्त झाली, परंतु त्यांनी ही बाब त्यांच्या खात्यांच्या अधिकृत विवरणपत्रात दर्शविली नव्हती त्यांनी इतर कायद्यांशिवाय कंपनी अधिनियम १९६१ तसेच आयकर अधिनियम, १९६१ यांचे उल्लंघन केले आहे.

२) प्रसारमाध्यम कंपन्यांमधील व्यवस्थापन व संपादकीय कर्मचारीवर्ग यांमध्ये स्पष्ट फरक करण्यात यावा आणि संपादकांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवून संरक्षक उपाय करण्यात यावे, असे वाटले होते.

३) निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्यासंबंधातील प्रचलित प्रक्रियेत "पेड न्यूज" संबंधातील तक्रारी स्वीकारण्याकरिता एका विशेष कक्षाची स्थापना करावी आणि अशा तक्रारींच्या आधारावर तात्काळ कार्यवाही करता येईल अशी प्रक्रिया सुरू करावी.

४) भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या निदेश जो, निवडणूक होण्यापूर्वी ४८ तास अगोदर, उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या संबंधातील निवडणूक प्रचार मोहिमेशी संबंधित माहितीचे प्रसारण थांबवण्याबाबत दूरदर्शन वाहिन्यांना हूकूम करतो, तो निदेश मुद्रण प्रसारमाध्यमाकरिता लागू करण्यात यावा किंवा कसे याबाबत सर्व चिंतायुक्त हितसंबंधित व्यक्तींमध्ये एक वाद चर्चा घेण्यात यावी कारण सध्या प्रसारमाध्यमाच्या या कलमास असा निर्बंध लागू होत नाही.

५) परिषद असे सूचित करते की, खोटे वृतांकन आणि संतुलित व न्याय्य वृत्तांकन यामधील फरक करण्याबाबत मतदारांना शिक्षण देण्याकरिता प्रयत्न करण्यात यावेत.

६) केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाने, सदर बाबींवर विचारविमर्श करण्यासाठी आणि विशेषत: "पेड न्यूज" घटनेस पायबंद घालण्याकरिता उपयुक्त तोडगा काढण्यासंबंधी सर्व हितसंबंधित व्यक्तींचा समावेश करुन जाणीवजागृती निर्माण करणाऱ्या मोहिमा आयोजित कराव्यात.

७) संसदेच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांच्या एका लहानशा समितीने, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यात बदल सुचविण्याकरिता एक सुनावणी घ्यावी.

**शिफारशी**

एक) पेड न्यूजची घटना ही शिक्षापात्र निवडणूक गैरप्रकार ठरविण्याकरिता लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांत सुधारणा करण्यात यावी.

दोन) भारतीय वृत्तपत्र परिषदेला "पेड न्यूज" च्या तक्रारीसंबंधात अभिनिर्णय करण्यासाठी व सदर बाबींसंबंधात अंतिम न्यायनिर्णय देण्यासाठी संपूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले पाहिजेत.

तीन) वृत्तपत्र परिषद अधिनियमाच्या शिफारशी बंधनकारक करण्यासाठी आणि इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांना त्याच्या कक्षेत आणण्याबाबत वृत्तपत्र परिषद अधिनियमात सुधारणा करण्यात यावी,आणि

चार) इलेक्ट्रॉनिक व इतर प्रसारमाध्यमे यांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यासाठी भारतीय वृत्तपत्र परिषदेची पुर्नरचना करण्यात यावी.

ही निरीक्षणे व शिफारशी यांचा पुनरच्चार करताना, परिषदेला असे वाटले की, तातडीच्या प्रकरणात तक्रार करणाऱ्या व्यक्तीला, प्रतिवादीच्या विरुध्द त्याने केलेला आरोप सिध्द करणे शक्य झालेले नव्हते. तद्नुसार त्याबाबत निर्णय घेण्यात आला.

## बिहार विधानसभा निवडणूक (२०१०)

## प्रकरणांवरील प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया चौकशी समितीचे अभिप्राय

"पेड न्यूज" ची घटना ही एक गंभीर बाब आहे, कारण ती मुक्त पत्रकारितेच्या कार्यपध्दतीवर बाधक परिणाम करणारी ठरते. प्रसारमाध्यम हे, जनतेला अचूक व सत्य माहिती देण्याकरिता, सार्वजनिक न्यासाचे एक संग्रहस्थान म्हणून कार्य करते. तथापि, जेव्हा पेड न्यूज ही बातमीचा आशय म्हणून सादर करण्यात येते तेव्हा, ती जनतेची दिशाभूल करु शकते व त्यामुळे योग्य मत तयार करण्यासाठी जनतेच्या निर्णयशक्तीला बाधक होऊ शकते. पेड न्यूजची घटना प्रसार माध्यमांच्या मुक्त कार्यपध्दतीवर आणि मुक्त व न्याय्य निवडणूक प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम करुन भारतीय लोकशाहीला दुहेरी धोका निर्माण करु शकते. अशाप्रकारे जनतेच्या अचूक व निःष्पक्ष माहितीच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची तातडीची गरज आहे. सर्व हितसंबंधित व्यक्तींशी योग्य विचारविनिमय करून, परिषदेने पेड न्यूजची मोबदला म्हणून रोख रक्कम किंवा वस्तु स्वरुपातील मूल्य म्हणून कोणत्याही प्रसारमाध्यमांत (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक) दिसून येणारी कोणतीही बातमी किंवा विश्लेषण अशी व्याख्या केली होती.

भारतीय निवडणूक आयोगाने, भारतीय वृत्तपत्र परिषदेच्या शिफारशीनुसार, पेड न्यूजला पायबंद घालण्याकरिता अनेक उपाययोजना केल्या आहेत. भारतीय निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधित्व अधिनियमाच्या कलम १२७ क (३) (ख) च्या कक्षेची व्याप्ती वाढवली असून त्यामध्ये "निवडणूक पत्रके व भित्तिपत्रके" यांत "इतर कागदपत्रे" यांच्या व्याख्येन्वये "पेड न्यूज" चा समावेश करण्यास निश्चित

केले आहे. अशाप्रकारे जर जाहिरात ही, उमेदवाराच्या संमतीने असेल तर, त्यासंबंधीचा त्याच्या/ तिच्या निवडणूक खर्चात हिशेब दाखवावयाचा आहे. निरनिराळ्या हितसंबंधित व्यक्तींकडून प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यात आलेले असूनदेखील (पेड न्यूज) ही घटना चालूच आहे आणि तातडीच्या उपाययोजना करण्यात आल्या नाहीत तर, भारतीय जनताच अंतिम पराभवाचे धनी होईल.

## संशयित पेड न्यूजची उदाहरणे

- साधारण एकाचवेळी निरनिराळ्या लेखकांच्या नामपंक्ती नमूद करुन स्पर्धा असलेल्या प्रकाशनांमध्ये छापून येणारे छायाचित्र व ठळक मथळे दिलेले समान लेख
- विनिर्दिष्ट वृत्तपत्रांच्या एकाच पृष्ठावर एकच निवडणूक जिंकण्याची शक्यता असल्याचा दावा करणाऱ्या प्रतिस्पर्धी दोघा उमेदवारांची स्तुती करणारे लेख
- एका उमेदवाराला समाजाच्या प्रत्येक समूहाचा पाठिंबा मिळत आहे व तो मतदार संघातील निवडणूक जिंकेल असे नमूद करणाऱ्या, वृत्तपत्रातील बातम्या.
- कोणतीही नामपंक्ती न देता एका उमेदवाराला अनुकूल असलेल्या वृत्तपत्री बातम्या.
- एखादा पक्ष/उमेदवार, राज्यात/मतदारसंघात इतिहास घडवून आणण्यासाठी सिध्द आहे असे नमूद करणारे मुख्य ठळक मथळा प्रसिध्द करणारे, परंतु या ठळक मथळ्याशी संबंधित कोणतीही बातमी न देणारे वृत्तपत्र.
- वृत्तपत्र बातमीचे प्रत्येक वाक्य पक्षाच्या उमेदवाराच्या बाजुने लिहून एखादा पक्ष/उमेदवार याच्याकडून केल्या गेलेल्या चांगल्या कार्याने राज्यातील दुसरा पक्ष/उमेदवार यांचे निवडणूकविषयक भवितव्य सीमांकित केले असल्याचे वृत्त देणारी बातमी.
- निश्चित आकाराच्या वृत्तपत्र बातम्यांची उदाहरणे आहेत, ज्या द्विस्तंभ छायाचित्र देऊन १२५-१५० शब्दांच्या मजकूर असलेल्या आहेत. वृत्तपत्र बातम्या अशा साचेबंद नमुन्यात व आकारात क्वचितच लिहिण्यात येतात, तर जाहिराती नेहमीच अशा नमुन्यात देण्यात येतात.
- विनिर्दिष्ट वृत्तपत्रांत, एका वृत्तपत्राच्या एकाच पृष्ठावर बहुविध फॉंट प्रकार व बहुविध मुद्राक्षर शैली (ड्रॉप केस स्टाईल्स) दिसून आलीत. हे असे घडले, कारण सर्वच म्हणजेच मांडणी, फॉंटस, मुद्रण, छायचित्रे याबाबी ज्या उमेदवारांनी वृत्तपत्राच्या पृष्ठांतील (स्लॉटस्) वृत्तकक्षाकरिता पैसे मोजले होते, त्यांच्याकडून पुरविण्यात आल्या होत्या.

*****